म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नाव

सं. ५ — ९०१-३८०२

॥ श्रीः ॥

# ब्राह्मणांना केलेल्या सवालांस उत्तर.

## १ यज्ञोपवीत.

मुंबई येथील हिंदुयूनियनूक्लबाच्या आश्रयाखालीं होणाऱ्या हेमतव्याख्यानमालेंतील चालू सालचें जें पहिलें व्याख्यान झालें त्याचा विषय " ब्राह्मण ह्मणविणारास सवाल. " असा आहे आणि व्याख्यात्यानीं आपल्या व्याख्यानात ब्राह्मणाना बरेच सवाल केलेले असून ठिकठिकाणीं श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माचा व ब्राह्मणवर्गाचा शक्य तितका उपहास केलेला आहे. ह्या व्याख्यानात योजिलेल्या भाषेला मुळींच धरबध नाहीं, सबब त्याला उत्तर देण्याचेंही काहीं कारण नाहीं असें काहीं धर्मशील लोकाचें ह्मणणें आहे; तें जरी योग्य आहे तरी व्याख्यानात दर्शविलेलीं मतें एका व्यक्तीचीं नसून एकदर सुधारकपक्षाचीं आहेत आणि ह्या मताना श्रुतिस्मृतींचा आधार असल्याचें व्याख्यानात दर्शविलें आहे तेव्हा ह्या व्याख्यानाला सप्रमाण उत्तर जर न दिलें तर त्यांत दर्शविलेलीं विधानें खोटीं नाहींत असें काहीं सामान्य लोकांना वाटण्याचा संभव असून परपरागत चालत आलेल्या धर्माचारासबधानें त्याच्या अतःकरणांतील श्रद्धा कदाचित् कमी होण्याचा सभव आहे ह्यास्तव, सांप्रतची वस्तुस्थिति लक्ष्यात घेतली असता झालेल्या व्याख्यानासबधानें उदासीन रहाणें मला योग्य वाटत नसल्यामुळें काहीं धर्मशील विद्वज्जनांच्या मर्जीविरुद्ध वागणें जरी मला नाइलाजास्तव भाग पडत आहे तरी ते मला क्षमा करितील अशी आशा धरून ता० १४ जानेवारी १८९९ रोजीं झालेल्या व्याख्यानाचा विचार करण्यास मी आरभ करितों

" १ मुंजीची निशाणी, २ बायकांची मुंज, ३ चातुर्वर्ण्य, ४ गणाना त्वा, ५ अष्टका, ६ ब्राह्मण ह्या सहा विषयांची थोडक्यांत मांडणी आजच्या ब्राह्मण ह्मणविणारापुढें " व्याख्यात्यानीं केलेली असून पहिल्या तीन विषयाचे त्यानीं अनुक्रमें तीन, दोन व दोन असे पोटविषय केलेले आहेत. पैकीं शास्त्राच्या मतें मुंजीची निशाणी कोणती ?, जानवें ह्मणजे काय ? आणि पूर्वींच्या ब्राह्मणांचें जानवें सुताचें होतें काय ? असे पहिल्या विष-

याचे तीन विभाग आहेत. आता “ शास्त्राच्या मतें मुर्जाच [illegible] कोणती ? ” ह्या धर्मविषयक प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं धर्मसंबधानें शास्त्र ह्या शब्दाचा अर्थ काय आहे तो पाहूं:—

**पुराणन्यायमीमांसा धर्मशास्त्राङ्गमिश्रिताः । वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्य च चतुर्दश ॥**

ह्या याज्ञवल्क्यस्मृतींतील वचनावरून पुराणें, न्याय, मीमांसा, स्मृत्या, व्याकरणादि वेदांग, आणि चार वेद हीं चौदा मिळून धर्मशास्त्र होय, असें ठरतें. इतिहास व श्रुतीला विरुद्ध नसलेले आगमग्रंथ ह्यांचा अंतर्भाव स्मृतींत व पुराणांत करावा लागतो इतिहास व पुराणें ह्यांचा उल्लेख श्रुतींतूनही केलेला आढळतो तेव्हा पुराणें हीं अगदीं अलीकडे झालीं आहेत अशी कल्पना करून धर्मशास्त्रासंबंधानें तीं अधारभूत मानण्याचें कारण नाहीं असें जें काहीं आधुनिक लोकांचें ह्मणणें पुढें येत असतें तें योग्य नाहीं हें उघड आहे अथर्ववेद मागून झाला असेंही काहीं लोक ह्मणत असतात , परंतु, तेंही अयोग्यच आहे यजुर्वेदामध्यें वैश्वसृजचयनयागसंबंधीं जे इष्टकोपधानाचे मंत्र आहेत त्यांत—

**ऋचो यजूंषि सामानि । अथर्वाङ्गिरसश्च ये । सर्वास्ताः । इतिहासपुराणं च ।**

अशीं वाक्यें आहेत. ह्यांत अथर्ववेदाचा उल्लेख केला आहे. इतकेंच नव्हे, परंतु, इतिहास व पुराण ह्यांचाही उल्लेख केलेला आहे व **इतिहासपुराणं च** ह्या वेदवाक्याचा अर्थ “ **इतिहासो भारतादिः । पुराणं ब्राह्मपाद्येत्यादि** ( इतिहास ह्मणजे भारत वगैरे आणि पुराण ह्मणजे ब्रह्मपुराण, पद्मपुराण वगैरे. ) ” असा भाष्यकारांनी केला आहे. धर्मशास्त्रप्रणेता ह्या नात्यानें मनूचा उल्लेख यजुर्वेदांत व सामवेदांत केलेला आढळतो आणि मनुस्मृतींतील

**स्वाध्यायं श्रावयेत्पित्र्ये धर्मशास्त्राणि चैव हि । आख्यानानीतिहासश्च पुराणानि खिलानि च ॥ २३२ ॥**

ह्या तृतीयाध्यायांतर्गत वचनांतही इतिहास व पुराणें ह्यांचा उल्लेख केलेला आढळतो.

**इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् । बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रतरिष्यति ॥**

ह्या स्मृतिवचनांत वेदाचा अर्थ समजण्याला इतिहास व पुराणें यांची अवश्यकता सांगितली आहे आणि मनुस्मृतींतील बाराव्या अध्यायांत—

**धर्मेणाधिगतो यैस्तु वेदः सपरिबृंहणः । ते शिष्टा ब्राह्मणा ज्ञेयाः श्रुतिप्रत्यक्षहेतवः ॥**

असें जें शिष्ट ब्राह्मणांचें लक्षण सांगितलें आहे त्यांतही ब्राह्मणाचे अंगीं शिष्टत्व येण्यास इतिहास, पुराणें वगैरेंसहवर्तमान वेदाचें ज्ञान अवश्य सांगितलें आहे.

वेदामध्यें गृह्यसूत्राचा उल्लेख केलेला आहे आणि आश्वलायन गृह्यसूत्रांत भारत व महाभारत यांचा उल्लेख केलेला आहे व महाभारतांत पुराण शब्द अनेक ठिकाणीं आलेला असून एके ठिकाणीं तर वायुपुराणाचा स्पष्ट उल्लेखच आहे. असित, देवल, पराशर, व्यास, वैशंपायन इत्यादि ऋषि स्मृतिप्रणेते आहेत व त्यांचा उल्लेख वेदामध्यें आहे असो. धर्मशास्त्र

ह्मणजे काय ह्याचा बोध होण्यास येवढी वाटाघाट पुरेशी होईल असें मला वाटतें सबब आता ती जास्त करीत बसत नाहीं.

" शास्त्राच्या मतें मुंजीची निशाणी कोणती ? " ह्या सदराखालीं व्याख्यात्यानी जीं विधानें केलीं आहेत तीं साहसाचीं आहेत " आश्वलायनानें जानव्याचा उल्लेख कोठेंही केलेला नाहीं " असें ह्याचें पहिलें विधान आहे परंतु,

**मलापकर्षणस्नाने गात्राभ्यंगे तथैव च ।**
**उपवीतं पृथक्कुर्यादन्यत्र नरकं व्रजेत् ॥**

असें आश्वलायनमुनींचेच वचन असून तें आचारार्क, संस्कारकौस्तुभ, निर्णयसिंधु वगैरे सारख्या धर्मशास्त्रग्रंथातून घेतलेलें आहे व त्याचा अर्थ—मलापकर्षणस्नान आणि अभ्यंग ह्याशिवाय उपवीत वेगळें केलें असता पुरुषाला नरकप्राप्ति होते असा आहे आज ब्राह्मण ह्मणविणाऱ्या जाति मुंजीची व अर्थातच ब्राह्मणपणाची निशाणी जानवें मानितात ती चूक नव्हे काय ? ' असा व्याख्यात्यानीं दुसरा प्रश्न केला आहे. परंतु,

**मन्त्रपूतं स्थितं काये यस्य यज्ञोपवीतकम्। नोद्धरेच्च तत' प्राज्ञो य इच्छेच्छ्रेय आत्मनः ॥ सकृदुद्धरणात्तस्य प्रायश्चित्तीयते द्विजः ।**

असें भृगुस्मृतींत सांगितलें आहे हीं वचनें निर्णयसिंधुप्रभृति धर्मशास्त्रग्रंथातून घेतलीं आहेत व " अभिमन्त्रित केलेलें यज्ञोपवीत ज्यानें धारण केलेलें आहे तें त्यानें तेथून कधींही आपल्या कल्याणाची इच्छा असल्यास बाहेर काढू नये कारण, तें एकदा जरी बाहेर काढिलें तरी ब्राह्मण प्रायश्चित्तास पात्र होतो " असा ह्या वचनाचा अर्थ आहे. " जानवें ह्मणजे काय ? " ह्या सदराखालीं उपवीत हें पूर्वीचें उपवस्त्र होतें असें ह्यानीं विधान केलें आहे पण तें चुकीचें आहे.

**निवीतं मनुष्याणां प्राचीनावीतं पितॄणामुपवीतं देवानाम् ।**

अशी श्रुति तैत्तिरीय संहितेंत आहे व ह्या श्रुतींत निवीत, प्राचीनावीत आणि उपवीत असे शब्द आहेत ते वस्त्रवाचक नाहींत आणि निवीत ह्मणजे मनुष्याचें वस्त्र, प्राचीनावीत ह्मणजे पितराचें वस्त्र व उपवीत ह्मणजे देवाचें वस्त्र असा त्याचा अर्थही नाहीं. यज्ञोपवीत धारण करण्याचे जे तीन भिन्न भिन्न प्रकार आहेत त्याचीं हीं नावें आहेत.

" जर उपवस्त्राची ऐपत नसली तर तीन सूत्रें लटकवूनही अगदीं गरीबास आपआपला यज्ञ उरकिता येत असे " असें ह्यानीं ह्याच सदराखालीं दुसरें एक विधान केलेलें आहे; पण, तेंही चुकीचें आहे, वरचें अंग झाकण्यापुरतें वस्त्र घेण्याची ऐपत नसल्यास तीन सूत्रें लटकावून यज्ञ उरकिता येत असे असें ज्याअर्थी ह्या व्याख्यात्यानीं विधान केलें आहे त्याअर्थी जानवें ह्मणजे काय हेंच ह्या व्याख्यात्याना कळलें नाहीं असें दिसतें वरचें अंग झाकण्यापुरतें दोनचार हात फडकें दोनतीन आण्यालाही सध्या मिळेल; परंतु,सुताचीं दोन अथवा तीन जानवीं तितके पैसे खर्च करून निदान मुंबईंत तरी मिळतील किंवा नाहीं ही शंकाच आहे.

**कार्पासकं सदा दद्याच्छुचिक्षेत्रे**

विशोधितम् । जीवभर्तृकया नार्या ब्राह्मण्या सूत्रकं कृतम् ॥

असे बृहस्पतिस्मृतींत सांगितलें असून त्याचा अर्थ– " सभर्तृका ब्राह्मणस्त्रीनें शुद्ध ठिकाणीं सूत काढून तयार केलेलें आणि मन्त्रानी शुद्ध केलेलें कापसाचें यज्ञोपवीत सर्वदा धारण करावें. " असा आहे. यज्ञोपवीत करावें कसें हें प्रकरण धर्मशास्त्रग्रंथांत ज्या ठिकाणीं सांगितलें आहे त्या ठिकाणीं तें तयार करणाऱ्यांमध्यें सभर्तृका स्त्रीशिवाय इतराचाही उल्लेख केलेला आहे आणि स्वतः तयार करून यज्ञोपवीत धारण करणें उत्तम असेंही सांगितलें आहे शिवाय, " भुक्त्वा निर्मितमुत्सृजेत् " असेंही भृगुस्मृतींत ह्मटलें आहे व " भोजन झाल्यानंतर तयार केलेलें जानवें टाकून द्यावें. " असा त्याचा अर्थ आहे. तेव्हां यज्ञोपवीत तयार करण्याचा हा प्रकार लक्ष्यांत घेतला ह्मणजे दोन चार हात फडकें विकत घेण्याची ज्याला ऐपत नसेल त्यानें सुताचें जानवें घालण्याचा पूर्वी प्रघात होता असें विधान करणें साहसाचें होईल. ह्यांत ऐपतीचा प्रश्न मुळींच नाहीं जानव्याचें सूत अखंड एकत्र असावें लागतें ही गोष्ट तरी ह्या व्याख्यात्याना ठाऊक असेल असा माझा समज होता; परंतु, ज्याअर्थी तीन सूत्रें लटकवून यज्ञ उरकितां येत असे, असें ह्या सुधारक चमूंत विद्वान् गणले जाणाऱ्या व्याख्यात्यांनीं विधान केलें आहे त्याअर्थी तो माझा समज खोटा ठरला हें उघड आहे ह्याच सदराखालीं ह्यांनीं " जानवें घोड्याकडून धुवविण्यास अडचण कोणती ? " असा प्रश्न केला आहे आणि ह्या प्रश्नाला ' सुप्रसिद्ध ' ह्मणून एका श्लोकाचा आधार दिलेला आहे. परंतु, ज्या ठिकाणीं ह्यांचा हा सुप्रसिद्ध श्लोक पठित आहे त्याच ठिकाणीं ह्याच सुप्रसिद्ध श्लोकाचे पूर्वीं एक अत्यंत सुप्रसिद्ध श्लोकार्ध पठित आहे तें ह्यांच्या दृष्टीं पडूं नये ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. पूर्वीच्या श्लोकार्धासहवर्तमान ह्यांचा सुप्रसिद्ध श्लोक —

**अभ्यङ्गे चोदधिस्नाने मातापित्रोर्मृतेहनि । तैत्तिरीयास्तथा काण्वा ये च वाजसनेयिनः ॥ कण्ठादुत्तार्य सूत्रं तु कुर्वीरन्क्षालयन्द्विजाः ।**

असा आहे व त्याचा अर्थ—विहित अभ्यंग, समुद्रस्नान आणि मातापितराच्या मृत्यूचा दिवस इतक्या प्रसंगीं तैत्तिरीय, काण्व आणि वाजसनेयी ब्राह्मणानीं जानवें कंठांतून काढून मग स्नान करावें असा आहे. विहित अभ्यंगस्नान आणि मलापकर्षण स्नान ह्यावांचून यज्ञोपवीत कंठांतून बाहेर काढिलें असतां पुरुष नरकांत पडतो अशा अर्थाचें आश्वलायन मुनींचें वचन पूर्वी सांगितलेंच आहे.

" अगदीं पूर्वीच्या ब्राह्मणाचें जानवें सुताचें होतें काय ?" ह्या सदराखालीं " गळ्यातलें सुताचें जानवें कोणी तोडिलें तर त्याचें ब्राह्मणपण गेलें, बाकी पूज्य लोपलें, असें शातपणें ह्मणण्यास शास्त्राचा आधार आहे काय ? असल्यास कोणता ? " असा व्याख्यात्यानीं सवाल केला असून शास्त्राचा आधार सांगितला आहे व

तैत्तिरीय आरण्यकात ( अनुवाक १ प्रपाठक २)' अजिनं वासो वा ' असें दोनच प्रकारचे यज्ञोपवीत सांगितलें आहे ; ह्यांत सुताच्या यज्ञोपवीताचा पत्ता बिलकूल लागत नाहीं " हा मजकूर तसा प्रश्न करण्याला आधारभूत ह्मणून ह्यांनीं प्रथम लिहिला आहे ; त्याचा विचार करू.

तैत्तिरीय आरण्यकाचें प्रपाठक एकदर दहा आहेत पैकीं १, ४, ५ आणि ६ हे प्रपाठक खेरीज करून बाकी राहिलेल्या सहा प्रपाठकांची गणना उपनिषदांत केलेली आहे तेव्हा ' **अजिनं वासो वा** ' हीं पदें उपनिषदांत गणल्या जाणाऱ्या प्रपाठकांतील आहेत. यजुर्वेदांतील प्रत्यक्ष मंत्रभागातच अथर्ववेद, इतिहास व पुराणें ह्यांचा उल्लेख असल्याचें पूर्वीं सप्रमाण सिद्ध केलेच आहे. यजुर्वेदाची प्रशंसा अप्रत्यक्ष रीतीनें " **ऋचां त्वः पोषमास्ते पुपुष्वान्** " ह्या ऋग्वेदसंहितेंतील ऋचेंत केलेली आहे. शंका असेल त्यानें ह्या ऋचेवरील यास्कमुनींचें निरुक्त अवलोकन करावें. तात्पर्य, यजुर्वेदांतील मंत्रभागात अथर्ववेद, इतिहास व पुराणें यांचा उल्लेख आहे. ऋग्वेदांतील मंत्रभागांत यजुर्वेदाची प्रशंसा आहे, यजुर्वेदांत स्मृतिशास्त्रप्रणेते या नात्यानें मन्वादिकांचा उल्लेख आहे आणि मनुस्मृतींत इतिहास व पुराणें यांचा निर्देश केलेला आहे. तेव्हा सूत्ररूप यज्ञोपवीत असल्याबद्दलचीं प्रमाणें श्रुति, स्मृति, इतिहास, पुराणें वगैरेंपैकीं कोणत्याही ग्रंथसमूहांतून जरी दिलीं तरी तीं अर्लीकडलीं आहेत किंवा पलीकडली आहेत असें ह्मणण्याचा जो अर्लीकडे (पश्चिमेकडे उगवलेल्या अपूर्व ज्ञानरवीच्या किरणांनींच डोळस बनलेल्या काही लोकांचा ) प्रघात पडलेला आहे तो योग्य आहे असें ह्मणता येणार नाहीं.

१ **नव वै त्रिवृत्** अशी एक श्रुति, स्मृतिमुक्ताफलनामक धर्मशास्त्रग्रंथांत दिलेली आहे व तिचें तात्पर्य—यज्ञोपवीत ह्मणजे नवगुणित तीन पदरी—असें आहे व आपल्या गळ्यात जीं जानवीं असतात त्यांनाही तीन [illegible] प्रत्येक पदर नवगुणित असतो हें जानवें घालणाऱ्या प्रत्येक द्विजाला माहीतही आहे **परमहंसोपनिषदा**मध्यें सन्यासप्रकरणीं पुढील मजकूर आढळतो:—

**२, ३ असौ स्वपुत्रमित्रकलत्रबन्ध्वादीञ्छिखायज्ञोपवीतं स्वाध्यायं च सर्वकर्माणि संन्यस्यायं ब्रह्माण्डं च हित्वा कौपीनं दण्डमाच्छादनं च स्वशरीरोपभोगार्थाय च लोकस्योपकारार्थाय च परिग्रहेत्तच्च न मुख्योऽस्ति कोऽयं मुख्य इति चेदयं मुख्यः । न दण्डं न शिखां न यज्ञोपवीतं नाच्छादनं चरति परमहंसः ..।**

ह्याचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—

पुत्र, मित्र, भार्या, बंधु वगैरे शिखा आणि यज्ञोपवीत, वेदाध्ययन, वर्णाश्रमविहित सर्व कर्में आणि हें ब्रह्मांड ह्यांचा त्याग करून जो लंगोटी, दंड व वस्त्र स्वशरीराकरिता आणि लोकोपकाराकरितां स्वीकारितो •तो

मुख्य परमहंस नव्हे. मुख्य परमहंस कोणता हें समजण्याची अपेक्षा असेल तर हा मुख्य होय मुख्य परमहंस दंड, शिखा, यज्ञोपवीत आणि वस्त्र ह्यापैकीं काहीच घेत नाहीं. इ०

ह्यात यज्ञोपवीत आणि वरचें आंग झांकण्याकरिता असलेलें वस्त्र ह्या दोहोंचाही उल्लेख दोन वेळां केलेला आहे आणि गौण व मुख्य अशा दोन्ही प्रकारच्या परमहंसांमध्यें यज्ञोपवीताचा त्याग सांगितलेला आहे तेव्हा, सन्यासाश्रमावाचून इतर आश्रमामध्यें सूत्ररूप यज्ञोपवीत अवश्य असल्याचें अर्थात्च सिद्ध आहे **शिखायज्ञोपवीते** असे सामासिक पद ह्या श्रुतीमध्यें आहे; ह्यावरून शिखा व यज्ञोपवीत हीं दोन्हीं द्विजत्वाचीं लक्षण असल्याचे सिद्ध होत असून शिखा ज्याप्रमाणे हवी तेव्हा काढून हवी तेव्हा चिकटविता येत नाहीं त्याचप्रमाणें यज्ञोपवीतही हवें तेव्हां खुंटीवर ठेवून हवें तेव्हा गळ्यात अडकविता येणार नाहीं असो **शिखायज्ञोपवीत** ह्या पदाचें स्पष्टीकरण शंकरानंदांनी असें केले आहे **शिखायज्ञोपवीते प्रसिद्धे त्रैवर्णिककर्मकारणे ।** ( ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य ह्यांना विहित असलेलीं कर्मे होण्यास कारणीभूत असलेलीं शिखायज्ञोपवीतें प्रसिद्धच आहेत. )

जाबालोपनिषदांतील सन्यासप्रकरणात असा मजकूर आहे:—

**४ अथ हैनमत्रिः पप्रच्छ याज्ञवल्क्य पृच्छामि त्वा याज्ञवल्क्यायज्ञोपवीती कथं ब्राह्मण इति स होवाच याज्ञवल्क्य इदमेवास्य तद्यज्ञोपवीतं य आत्मा ।**

ह्याचें तात्पर्य येणेप्रमाणे:—

नंतर अत्रिमुनींनीं याज्ञवल्क्यांना विचारिलें " हे याज्ञवल्क्यमुने, यज्ञोपवीतत्याग केलेला सन्यासी ब्राह्मण कसा ? हा आपणाला माझा एक प्रश्न आहे " हें ऐकून घेऊन याज्ञवल्क्य ह्मणाले " जो आत्मा तेंच ह्या परमहंसाचें यज्ञोपवीत होय. यज्ञोपवीत ह्या शब्दाचें स्पष्टीकरण शंकरानंदांनीं असें केलेले आहे—

**यज्ञस्य श्रौतस्य च स्मार्तस्य च विविधस्य तपोयोगस्वाध्याय ज्ञानादिरूप सामीप्येन विशेषेण नित्यसंयोगेनतं प्राप्तं यज्ञोपवीतम् ।**

( यज्ञ ह्मणजे तप, योग, स्वाध्याय, ज्ञान वगैरे जीं नानाप्रकारचीं श्रौतस्मार्त कर्मे त्यांच्याशीं नित्य संयोगानें जे संबद्ध असतें तें यज्ञोपवीत होय. ) परमहंसाला यज्ञोपवीताचा त्याग ह्या उपनिषदात सांगितला आहे. ह्यावरून परमहंसावाचून इतर आश्रम्यांना यज्ञोपवीत अवश्य असल्याचें सिद्ध होत आहे. ज्याच्यापाशीं यज्ञोपवीत नाहीं तो ब्राह्मण कसा ? अशीच शंका ह्या ठिकाणीं अत्रिमुनींना आली असल्यामुळें यज्ञोपवीत ह्या शब्दाचा अर्थ ह्या ठिकाणीं " त्रिवृ सूत्रमय यज्ञोपवीत असाच घेतला पाहिजे; नाहीं तर, " ज्याच्यापाशीं शरीर आच्छादन करण्याला वस्त्र नाहीं तो ब्राह्मण कसा ?" असा त्यांच्या प्रश्नाचा विपरीत अर्थ होऊं लागेल.

५ याच उपनिषदाच्या सहाव्या खंडात परमहंसदीक्षेचा विधि सांगितलेला आहे त्यात

**शिखां यज्ञोपवीतं चेत्येतत्सर्वं भूः स्वाहेत्यप्सु परित्यज्यात्मानमन्विच्छेत् ।**

असा मजकूर असून त्याचा अर्थ—शिखा, यज्ञोपवीत हें सर्व भूः स्वाहा ह्या मन्त्रानें उदकांत टाकून आत्मसाक्षात्काराच्या यत्नास लागावें—असा आहे ह्या ठिकाणींही शिखा व यज्ञोपवीत हे दोन्ही शब्द अगदीं शेजारीं शेजारीं आहेत हे लक्ष्यात ठेवण्यासारिखें आहे

६ आरुणीउपनिषदामध्येंही परमहंससंन्यास सांगितलेला आहे. त्यांत पहिल्याच खंडांत असा मजकूर आहे,

**तं होवाच प्रजापतिस्तव पुत्रान्भ्रातृन्बन्ध्वादीञ्छिखां यज्ञोपवीतं च...विसर्जयेद्दण्डमाच्छादनं च परिग्रहेच्छेषं विसृजेदिति ।**

ह्याचे तात्पर्य येणेंप्रमाणें:—

ब्रह्मदेव त्या अरुणीला ह्मणाले "तू आपल्या पुत्राचा, भ्रात्याचा, बंधुप्रभृतींचा, शिखेचा व यज्ञोपवीताचा त्याग करून दंड आणि आच्छादन ह्यांचा स्वीकार कर आणि बाकीं सर्व टाकून दे"

ह्या ठिकाणीं शिखा व यज्ञोपवीत ह्या दोहोंचा परमहंससंन्यासदीक्षेला त्याग सांगितलेला आहे ह्यावरून इतर तिन्ही आश्रम्यांना यज्ञोपवीताचा त्याग करितां येत नाहीं हें उघड आहे. शिखा व यज्ञोपवीत हे शब्द ह्या ठिकाणींही शेजारीं शेजारींच आहेत हें लक्ष्यांत ठेवण्यासारिखें आहे आणि यज्ञोपवीताचा त्याग सांगून आच्छादनाचा ह्मणजे वस्त्राचा स्वीकार सांगितला आहे, ह्यावरूनही यज्ञोपवीत ह्या शब्दाचा येथें अर्थ सूत्ररूप यज्ञोपवीत असाच असल्याचें सिद्ध आहे शंकरानंदानीं येथील यज्ञोपवीत शब्दाचें स्पष्टीकरण असें केलें आहे:—

**यज्ञोपवीतं च प्रसिद्धं नवगुणितं ब्राह्मणादीनाम् ।**

( ब्राह्मणादिकांना अवश्य असलेलें जें नवगुणित त्रिवृसूत्र तें यज्ञोपवीत हें प्रसिद्धच आहे )

दुसऱ्याही खंडांत ह्याच विषयाचें स्पष्टीकरण केलेलें असून त्यांतही परमहंसदीक्षा घेणाऱ्यानें उपवीताचा भूमीवर अथवा उदकांत त्याग करावा असें सांगितलें आहे व मूळांतील पदें **उपवीतं भूमावप्सु वा विसृजेत्** अशीं आहेत ह्या उपवीत शब्दाचें स्पष्टीकरण **उपवीतं यज्ञोपवीतं** ( उपवीत ह्मणजे यज्ञोपवीत) असें शंकरानंदानीं केलें आहे व यज्ञोपवीत शब्दाचा अर्थ त्यांनीं काय केला आहे तो पूर्वीं सांगितलाच आहे

ह्याच उपनिषदाच्या तिसऱ्या खंडांत असा मजकूर आहे:—

**७ खल्वहं ब्रह्म सूत्रं सूचनात्सूत्रं ब्रह्म सूत्रमहमेव विद्वांस्त्रिवृत्सूत्रं त्यजेद्विद्वान् ।**

ह्याचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—

मी ब्रह्मच आहें आणि जगद्रूप पट ब्रह्मापासूनच होत असल्यामुळें ब्रह्म हें सूत्ररूप आहे ह्मणजे सूत आहे आणि ज्याअर्थीं मी ब्रह्म आहें त्याअर्थीं सूत्ररूप ब्रह्महीं मीच आहें; माझ्याशिवाय दुसरें काहीं एक नाहीं कारण, मी विद्वान् आहें. ह्मणजे हें सर्व जग

माझ्यापासून भिन्न नाहीं, असें मी जाणीत आहे. तस्मात्, ज्याअर्थी हा ज्ञानीपरमहंस सन्यासी सूत्ररूप झालेला असतो त्याअर्थी त्यानें हें त्रिवृत्सूत्र ह्मणजे नवगुणित जें यज्ञोपवीतनामक त्रिवृत्सूत्र त्याचा प्रैषोच्चारपूर्वक त्याग करावा. **संन्यस्तं मया संन्यस्तं मया संन्यस्तं मया** हा सन्यासप्रैष असून ह्या प्रैषोच्चारानें सूत्ररूप यज्ञोपवीताचा त्याग करावा लागतो.

पांचव्या खडांत असा मजकूर आहे:–

**८ पालाशं बैल्वमौदुम्बरं दण्डमजिनं मेखलां यज्ञोपवीतं च त्यक्त्वा शूरो य एवं वेद ।**

ह्याचें तात्पर्य येणेप्रमाणें:–

जीवब्रह्मैक्यसाक्षात्कार ज्याला झाला असेल त्यानें संन्यासाश्रमदीक्षा घेऊन पळसाचा, बेलाचा अथवा उंबराचा जो दंड ब्रह्मचार्याश्रमांत स्वीकारिला असेल त्याचा व त्याचप्रमाणें कृष्णाजिन, मौंजीमेखला आणि यज्ञोपवीत ह्याचा त्याग करून शूर व्हावें ह्मणजे विषयरूप शत्रूंना अजिंक्य व्हावें.

९ ब्रह्मोपनिषदामध्यें सन्यासाश्रमाचें विधान सांगितलेलें असून त्या विधानाच्या उपक्रमामध्यें यज्ञोपवीत धारणाचा मंत्र सांगितलेला आहे. तो प्रत्येक ब्राह्मणाला येतच असल्यामुळें येथें न देता त्याचें मराठी तात्पर्य मात्र मी सांगतो तें येणेंप्रमाणें:—

यज्ञोपवीत हें अत्यंत पवित्र असून ब्रह्मदेवाच्या **देहादिकांबरोबरच** पूर्वी उत्पन्न झालेलें आहे. तस्मात्, आयुर्वर्धक आणि श्रेष्ठ असें जें हें शुभ्र यज्ञोपवीत तें तू कंठामध्यें धारण कर आणि ह्या यज्ञोपवीताच्या योगानें तुला बल व तेज प्राप्त होवो.

शंकरानंदानीं ह्या मंत्राचा अर्थ जीवपर केलेला आहे. तथापि,

**यस्मादेवं हृदि चैतन्ये तिष्ठति यज्ञोपवीतं तस्माद्धृदयस्योपरि बहिर्विधार्यमाणं त्रैवर्णिकैरिदं यज्ञोपवीतं यज्ञोपवीतस्थानत्वात्त्रिवृत्कार्पासादिसूत्रं बलं वीर्यवत्कर्मकारणमस्तु भूयात् । तेजो ब्रह्मवर्चसादि । उभयं भूयादिति योजनीयम् ।**

ह्याप्रमाणें त्यांनीं मंत्रांतील चतुर्थ पादाचें स्पष्टीकरण केलेलें आहे; त्याचा अर्थ येणेंप्रमाण:—

ज्याअर्थी हें जीवस्वरूप यज्ञोपवीत हृदयकमलस्थ स्वयंप्रकाश चैतन्यामध्यें रहात आहे त्याअर्थी हृदयाच्या वरच्या बाजूला जें कापूस वगैरेचें त्रिवृत्सूत्र यज्ञोपवीतच आहे. तस्मात्, हें त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत बल ह्मणजे समर्थ, कर्माचें कारण आणि तेज होवो. तात्पर्य, चांगलीं कर्में ह्या सूत्ररूप यज्ञोपवीताच्या योगानें होवोत आणि वेदाध्ययनादिविषयक तेज ह्याच्या योगानें प्राप्त होवो.

ह्या यज्ञोपवीत धारण मंत्राच्या प्रथम दर्शविलेला शब्दार्थ व ह्या मंत्रांतील चतुर्थचरणाचा शंकरानंदानीं केलेला अर्थ लक्ष्यांत घेतला असतां सन्यासाश्रमदीक्षा न घेतलेल्या द्विजांना त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत धारण, नेहमीं अवश्यच असल्याचें सिद्ध होत आहे.

असो. ह्याप्रमाणें त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीताची उपपत्ति सांगितल्यानंतर ब्रह्मोपनिषदामध्यें अन्त्याश्रमदीक्षेचें ह्मणजे परमहंससंन्यासदीक्षेचें विधान केलेलें आहे तें येणेंप्रमाणें:—

**१० सशिखं वपनं कृत्वा बहिः सूत्रं त्यजेद्बुधः। यदक्षरं परम्ब्रह्म तत्सूत्रमिति धारयेत् ॥**

ह्याचें तात्पर्य:—शिखेसहवर्तमान मुंडण करून बाह्य सूत्राचा ह्मणजे कंठामध्यें असलेल्या कापसाच्या त्रिवृत्सूत्राचा त्याग करावा आणि ह्या ज्ञानी पुरुषानें अविनाशी, उत्कृष्ट आणि त्रिविध परिच्छेदशून्य असें जे ब्रह्म तेंच त्रिवृत्सूत्र यज्ञोपवीत धारण करावें.

ह्या ठिकाणीं परमहंसदीक्षेच्या विधानांत शिखा व बाह्य त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत ह्या उभयतांचा त्याग सांगितला आहे. ह्यावरूनही सूत्ररूप यज्ञोपवीताची शिखेप्रमाणेंच ब्रह्मचर्यप्रभृति तिन्ही आश्रम्यांना सर्वदा अवश्यकता असल्याचें सिद्ध आहे. शिखा व यज्ञोपवीत ह्यांचा त्याग करण्याची ह्मणजे परमहंसदीक्षा घेण्याची योग्यता कोणाला हेंही ह्या उपनिषदामध्यें

**११ बहिः सूत्रं त्यजेद्विद्वान्योगमुत्तममास्थितः।** ह्या पदांनीं स्पष्ट दर्शविलें आहे व ह्या पदाचा अर्थ "जीवब्रह्मैक्यरूप उत्कृष्ट योगाचें ज्यानें अवलंबन केलें आहे ह्मणजे जीव आणि ब्रह्म ह्यांचें ऐक्य असल्याबद्दलचा प्रत्यक्ष साक्षात्कार होऊन सर्वत्र ब्रह्मबुद्धि ज्याची झालेली आहे आणि त्याप्रमाणें जो वागत आहे त्या ज्ञानी पुरुषानें बाह्य सूत्राचा त्याग करावा" असा आहे.

**१२ ब्रह्मभावमिदं सूत्रं धारयेद्यः सचेतनः। धारणात्तस्य सूत्रस्य नोच्छिष्टोनाशुचिर्भवेत् ।**

ह्या श्रुतीमध्यें "हें ब्रह्मभावरूप सूत्र जो ज्ञानी पुरुष धारण करितो तो त्या सूत्रधारणाच्या योगानें उच्छिष्ट अथवा अशुचि होत नाहीं" असें सांगितलें आहे ह्यावरून जीवब्रह्मैक्यसाक्षात्कार ज्याचे ठिकाणीं पुरता ठसलेला नाहीं अशा कर्माधिकारी पुरुषाला उच्छिष्टत्व आणि अशुचित्व न यावें एतदर्थ त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत धारण करणें अवश्य असल्याचें सिद्ध होत आहे हें त्रिवृत्सूत्ररूप बाह्य यज्ञोपवीत कोणीं धारण करावें हेंही श्रुतीमध्येंच सांगितलेलें आहे.

**१३ कर्मण्यधिकृता ये तु वैदिके ब्राह्मणादयः । तैः संधार्यमिदं सूत्रं क्रियाङ्गं तद्धि वै स्मृतम् ॥**

वैदिक कर्माचे अधिकारी जे ब्राह्मणादिक ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य त्यानीं हें सूत्ररूप यज्ञोपवीत धारण करावें. कारण, तें सूत्ररूप यज्ञोपवीत कर्माचें अंग ह्मणून श्रुतिप्रमाणानें सिद्ध आहे.

१४ ब्राह्मणादिकांना जर हें सूत्ररूप यज्ञोपवीत अवश्य आहे तर परमहंसदीक्षा घेतलेले संन्यासी ब्राह्मण नव्हेत हें अर्थात् सिद्ध आहे अशी कोणाला शंका येण्याचा संभव आहे ह्मणून त्या शंकेचेंही निराकरण श्रुतीमध्येंच केलेलें आहे.

**शिखा ज्ञानमयी यस्य उपवीतं च तन्मयम् । ब्राह्मण्यं सकलं तस्य इति ब्रह्मविदो विदुः ॥**

ही ती श्रुति असून तिचा अर्थ यणप्रमाणे —

जीवब्रह्मैक्यसाक्षात्काररूप ज्ञान ज्याला झालें आहे त्या परमहंसाची तें ज्ञान हीच शिखा असून उपवीतही तेंच होय; आणि ह्याचप्रमाणें ज्ञानरूप शिखा व ज्ञानरूप यज्ञोपवीत हीं दोन्हीं त्याचे ठिकाणीं असल्यामुळें संपूर्ण ब्राह्मणत्व त्याचे ठिकाणी आहे असें ब्रह्मवेत्ते ह्मणतात.

ह्या अर्थाचा विचार केला असतां परमहंसदीक्षा न घेतलेला जो ब्राह्मण असेल त्याचें ब्राह्मण्य कायम राहण्यास त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत त्याचे ठिकाणीं सर्वदा अवश्य असलें पाहिजे ही गोष्ट सिद्ध होत आहे. परमहंसदीक्षा घेतलेल्या संन्याशानें सर्व कर्मांचा त्याग केला असतोच; परंतु, परमहंसाला वर्णधर्मविहित कर्मांचा संबंध नाहीं हें श्रुतिसिद्ध असूनही ज्याअर्थी त्याच्या शरीराचे ठिकाणी त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत नसल्यामुळें त्याच्या ब्राह्मण्याविषयीं संभवनीय शंकेचा परिहार श्रुतीनेंच केलेला आहे त्याअर्थी संन्यासाश्रमावांचून इतर आश्रमांत असलेल्या त्रैवर्णिकानीं ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यानीं वैदिक कर्मांचे प्रसंगींच नव्हे परंतु, सर्वदा आपलें द्विजत्व कायम राखण्यास त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत धारण करणें अवश्यच आहे. त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीताशिवाय द्विजानीं रहाणें ह्मणजे द्विजत्वाला अंतरणें ही गोष्ट ह्या श्रुतीवरून निर्विवाद सिद्ध होत आहे असो

" गळ्यांतलें सुताचें जानवें जर कोणीं तोडिलें तर त्याचें ब्राह्मणपण गेलें, बाकीं पूज्य लोपलें, असें शातपर्णें ह्मणण्यास शास्त्राचा आधार आहे काय ? असल्यास कोणता ? " असा जो ह्या यज्ञोपवीतप्रकरणासंबधानें मुख्य सवाल ब्राह्मण ह्मणविणारास शास्त्री ह्मणविणाऱ्या व सुधारक कपूत वेदशास्त्रसंपन्नही ठरून गेलेल्या व्याख्यात्याकडून झालेला आहे; त्याचें प्रवृत्तिविषयक व निवृत्तिविषयक मिळून कमींत कमी निदान चवदा श्रुतींच्या आधारावरून " गळ्यांतलें सुताचें जानवें जर कोणीं तोडिलें तर त्याचें ब्राह्मणपण गेलें, बाकीं पूज्य लोपलें " असें स्पष्ट उत्तर शातपर्णें देण्यांत येत आहे. असो.

सहा विषयांपैकीं मुर्जीची निशाणी हा जो पहिला विषय त्याच्या संबधानें झालेल्या मुख्य सवालाचे उत्तरांत दाखल केलेल्या ज्या चवदा श्रुति आहेत त्यांचा विचार केला असतां ह्या प्रश्नासंबधानें सभ्य व समंजस मनुष्याला शंका रहाण्याचा संभव नाहीं असें वाटत असल्यावरून श्रुतींचे आणखी जास्त आधार देऊन सभेचा वेळ घेण्यांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं.

ज्या " आश्वलायनाच्या मतें जानव्याची जरूरी उघड नाहीं " असे सवाल करणाऱ्यानीं निर्भयपणें विधान केलेलें आहे त्या आश्वलायनमुनींच्या स्मृतींतील वचन—विहित अभ्यंग व मलापकर्षणस्नान ह्या प्रसंगावांचून यज्ञोपवीत शरीरापासून वेगळें करणारा नरकांत जातो अशा अर्थाचें—प्रथम दिलें असून त्याच आश्वलायन मुनींच्या गृह्यपरिशिष्टावरूनही द्विजाला सर्वदा त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत

धारण करण्याची अवश्यकता असल्याचें सिद्ध होत आहे. आश्वलायनगृह्यपरिशिष्टात स्नान-विधीचें प्रकरण आहे त्यात असा मजकूर आहे

" नद्याचे ठिकाणीं स्नान करावयाचें असल्यास जिकडून प्रवाह येत असतो तिकडे तोंड करावें आणि इतर ठिकाणीं स्नान करावयाचें असल्यास सूर्याभिमुख होऊन स्नान करावें नंतर प्राङ्मुख व उपवीती होऊन अक्षतासहवर्तमान उदकाच्या योगानें देवतीर्थानें ब्रह्मादि देवांचें एक एक वेळ तर्पण करावें नंतर उदङ्मुख व निवीती होऊन सातूसहवर्तमान उदकाच्या योगानें प्राजापत्य तीर्थानें कृष्णद्वैपायनऋषीचे दोन दोनदा तर्पण करावें नंतर दक्षिणाभिमुख व प्राचीनावीती होऊन तिलोदकाच्या योगानें पितृतीर्थानें सोमादि पितरांचें तीन तीन वेळा तर्पण करावें. नंतर दक्षिणाभिमुख व प्राचीनावीती असतानाच तीरावर येऊन **ये के चास्मत्कुले जाताः** ह्या मन्त्रानें वस्त्र पिळावें; नंतर यज्ञोपवीती होऊन व आचमन करून नेसावयाच्या वस्त्रावर उदकानें प्रोक्षण करून तें नेसावें आणि नंतर त्याचप्रमाणें प्रोक्षण केलेलें दुसरें वस्त्र पांघरून दोनदां आचमन करावें व नंतर संध्येला आरंभ करावा हें प्रातःस्नानाचें विधान होय. "

ह्या ठिकाणीं प्रथम प्रवाहामध्यें उभें राहून स्नान केल्यावर प्रवाहामध्येंच उभें असताना यज्ञोपवीती, निवीती व प्राचीनावीती करून अनुक्रमें देव, ऋषि आणि पितर ह्यांचें तर्पण सांगितलेलें आहे आणि हें तर्पण झाल्यानंतर तीरावर येऊन वस्त्र पिळण्यास सांगितलें आहे. तेव्हा प्रवाहामध्यें उभे असताना जर यज्ञोपवीती, निवीती व प्राचीनावीती हे प्रकार सांगितले आहेत आणि वस्त्र जर शेवटीं पिळावयाचें आहे तर गळ्यांत सुताचें जानवें अवश्य असून त्याच्याच योगानें यज्ञोपवीती, निवीती व प्राचीनावीती हे प्रकार संभवनीय असल्याचें सिद्ध आहे. प्रवाहामध्यें असताना अंगवस्त्र पांघरतां येणार नाहीं व प्रवाहाच्या गतीमुळें त शरीराच्या विवक्षित भागावर कायम रहाणारही नाहीं आणि पिळल्यावांचून पांघरताही येणार नाहीं तेव्हां उघड्या अंगानें देवादिकाला उद्देशून कर्में होऊं नयेत ह्मणून उपवीत ह्मणजे उपवस्त्रच कर्मकालीं अवश्य आहे; सुताच्या जानव्याची जरूरी नाहीं हें ह्मणणें टिकत नाहीं. तीरावर येऊन वस्त्र पिळल्यानंतर यज्ञोपवीती करावी. यज्ञोपवीती करून आचमन करावें आणि नंतर नेसावयाच्या वस्त्रावर प्रोक्षण करून ते नेसावें व नंतर दुसरें प्रोक्षण केललें वस्त्र पांघरावें आणि नंतर दोनदां आचमन करून संध्येला आरंभ करावा असें जें ह्या आश्वलायनगृह्यसूत्रात सांगितलें आहे त्यावरूनही गळ्यामध्यें सुताचें जानवें अवश्य असल्याचें सिद्ध होत आहे. कारण, कोरडें वस्त्र नेसण्याचे आणि पांघरण्याचे पूर्वींच यज्ञोपवीती करण्यास सांगितली आहे व ती करण्यास सुताच्या जानव्याचीच अवश्यकता आहे; कोरडीं वस्त्रें धारण केल्यावर आचमन करून संध्येलाच आरंभ करण्यास सांगितलें आहे. यज्ञोपवीती कोरडीं वस्त्रें धारण करण्यापूर्वींच सांगितली असल्यामुळें नंतर सांगितली नाहीं

तेव्हां वस्त्रधारणापूर्वी होणारी जी यज्ञोपवीती ती पाघरण्याच्या वस्त्राशिवाय दुसऱ्याच कोणत्या तरी साधनानें ह्मणजे अर्थात् सुताच्या जानव्यानें अगर जानव्यांनीं होणार हे उघड आहे. कोरडीं वस्त्रें धारण करण्यापूर्वी यज्ञोपवीती करणें ती शास्त्रोक्त पद्धतीनें वस्त्र पाघरूनच करावी असें जर ह्मटलें तर प्रथम ओलें वस्त्र शास्त्रोक्त रीतीनें पाघरावें व तें न हालविता कोरडें वस्त्र नेसून नंतर दुसरें कोरडें वस्त्र पहिल्या ओल्या वस्त्रावर पाघरावें असा ह्या स्नानविधींतील यज्ञोपवीतीचा विपरीत अर्थ होऊं लागेल आणि प्रथम एक वस्त्र शास्त्रोक्त रीतीनें पाघरलेलें न हालविता दुसरें वस्त्र नेसताही येणार नाहीं. प्रवाहातून बाहेर आल्यावर दुसरें कोणतेंही साधन घेण्यास न सांगता यज्ञोपवीती करण्यास जर सांगितलें आहे आणि हीच यज्ञोपवीती पुढे कोरडीं वस्त्र धारण केल्यावरही जर कायम रहावयाची आहे तर त्या यज्ञोपवीतीचें साधन जें कांहीं असावयाचें तें शरीरावर कायम रहाणारें असावयाचें ह्मणजे अर्थात् सुताचीं जानवीं अगर जानवेंच असावयाचें हें सिद्ध आहे.

तात्पर्य, नेहमीं शरीरावर कायम रहाणारें यज्ञोपवीत जर आश्वलायनगृह्यपरिशिष्टातच अवश्य सांगितलें आहे आणि आश्वलायनाचार्यांनाच अभिमत असलेल्या गोष्टीचा उल्लेख जर परिशिष्ट संज्ञक आश्वलायनगृह्यात केलेला आहे तर " आश्वलायनाच्या मतें जानव्याची जरूरी उघड नाहीं. " असें विधान अविचाराचेंच ठरणार हें उघड आहे. वास्तविक विचार केला असतां कमींत कमी चवदा श्रुति प्रमाण देऊन जर द्विजाला त्रिवृत्सूत्ररूप यज्ञोपवीत सर्वदा अवश्य असल्याचें सिद्ध केलें आहे तर त्या सिद्धतेला गृह्यादि प्रमाणाची अवश्यकता नाहीं. तथापि आश्वलायनशाखीय कुलांत उत्पन्न झालेल्या व्याख्यात्यानीं आश्वलायनमुनींच्या मताविषयीं केलेल्या विधानाची खरी खरी योग्यता दर्शविणें अप्रासंगिक होणार नाहीं असें समजून मीं ही वाटाघाट केलेली आहे.

# २ स्त्रियांचें उपनयन.

" **बायकांची मुंज** " हा व्याख्यानाचा दुसरा विषय होय ह्या विषयासंबधानें व्याख्यात्यांनीं मुख्य दोन प्रश्न केलेले आहेत बायकाची मुंज वाजवी कीं गैरवाजवी हा पहिला व बायकाची मुंज सशास्त्र कीं अशास्त्र हा दुसरा ह्या मुख्य प्रश्नांना व ह्यातील पोटप्रश्नांना उत्तर देण्यापूर्वीं स्त्रियांच्या मौंजीबंधनासंबधानें अथवा उपनयनासंबधानें धर्मशास्त्रांत काय लिहिलें आहे तें पाहू.

पराशरस्मृतीवर माधवाची टीका आहे व त्या सटीक ग्रंथाला पराशरमाधव ह्मणण्याचा संप्रदाय आहे ह्या पराशरमाधवग्रंथांत हारीतस्मृतींतील एक उतारा दिलेला आहे तो येणेंप्रमाणें:—

**द्विविधाः स्त्रियो ब्रह्मवादिन्यः सद्योवध्वश्च । तत्र ब्रह्मवादिनीनामुपनयनमग्नीन्धनं वेदाध्ययनं स्वगृहे च भिक्षाचर्या ।**

( स्त्रिया दोन प्रकारच्या ब्रह्मवादिनी आणि सद्योवधू पैकीं ब्रह्मवादिनी स्त्रियांना उपनयन, होम, वेदाध्ययन आणि स्वगृहीं भिक्षा हीं सांगितलीं आहेत )

ह्या ठिकाणीं दोन प्रकारच्या स्त्रियांपैकीं फक्त ब्रह्मवादिनींनाच उपनयन वगैरें सांगितलें आहे, सद्योवधूंना सांगितलेलें नाहीं. आतां ब्रह्मवादिनी आणि सद्योवधू ह्या पदांचा अर्थ काय तो पाहिला पाहिजे सद्योवधूला उपनयन, वेदाध्ययन वगैरें सांगितलेलें नाहीं व गार्हस्थ्यधर्माच्या आचरणाकरितां जिचा विवाह होणें इष्ट असेल तिचे उपनयनपूर्वक पहिल्या प्रतीचें अगर दुसऱ्या प्रतीचें वेदाध्ययन होऊन तारुण्यकाल अवशिष्ट रहाण्याचा संभवच नसल्यामुळ तिला वेदाध्ययन आणि वेदाध्ययनाकरिता अवश्यक असलेला उपनयनसंस्कार सांगितलेला नाहीं हें योग्यच आहे. पुरुषाच्या उपनयनाचा काल श्रुति, स्मृति, पुराणें वगैरे ग्रंथांतून सांगितलेला आहे. स्त्रियांच्या उपनयनाचा काल श्रुति, स्मृति वगैरे ग्रंथांतून कोठें सांगितल्याचें माझ्या आढळण्यांत नाहीं, तेव्हा वेदाध्ययनार्थ स्त्रियांचें उपनयन कर्तव्य असल्यास पुरुषाचेंच वयोमान घ्यावें लागेल आठवें, अकरावें व बारावें वर्ष अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य पुरुषाच्या उपनयनाचा काल होय.

**न स्त्रियमुपेत्यष्टाचत्वारिंशद्वर्षाणि चतुर्विंशतिं द्वादश यावद्ग्रहणं वा ।**

ह्या सत्याषाढमुनिप्रणीत हिरण्यकेशीसूत्रामध्यें उपनयन झाल्यानंतर वेदाध्ययनाकरिता ब्रह्मचर्याचा मुख्य पक्ष अठ्ठेचाळीस वर्षें हा सांगितला असून चोवीस वर्षें वगैरे पुढले पुढले गौण पक्ष सांगितलेले आहेत आणि प्रत्येक वेदाच्या अध्ययनाला बारा वर्षें हा सामान्य काल अवश्य असल्यामुळें अध्ययनाचा मुख्य पक्ष जो चार वेदाचें अध्ययन तो सिद्धीस जाण्यास

अठ्ठेचाळीस वर्षे ब्रह्मचर्य सांगितलें हें योग्यच आहे.

द्वादश वर्षाणि वेदब्रह्मचर्यम् ।

असें आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितलें असून त्याचा अर्थ प्रत्येक वेदाध्ययनाला बारा वर्षे ब्रह्मचर्य असा आहे याज्ञवल्क्यस्मृतींतही प्रत्येक वेदाला बारा वर्षे ब्रह्मचर्य हा प्रथम पक्ष सांगितलेला आहे व मनुस्मृतींत छत्तीस, अठरा, नऊ वगैरे वेदाध्ययनार्थ ब्रह्मचर्याचे उत्तरोत्तर गौण असे पक्ष सांगितले आहेत. तेंव्हां चारी वेदांचें अध्ययन करणें हा जो मुख्य पक्ष तो सिद्धीस जाईपर्यंत ब्राह्मणस्त्रीचें वय ५५, क्षत्रियस्त्रीचें ५८ आणि वैश्यस्त्रीचें ५९ वर्षे होणार; अर्थात्, इतक्या वयानंतर विवाहसंस्काराचा मुख्य उद्देश सिद्धीस जाण्याचा संभवच नसल्यामुळें पहिल्या प्रतीचें वेदाध्ययन तिहींपैकीं कोणत्याही स्त्रीचे हातून होण्याचा संभव नाहीं पुरुषाचें यौवन ७० वर्षांपर्यंत कायम असतें असें सुश्रुत, चरक, वाग्भट्ट वगैरेंनीं आपआपल्या ग्रंथाच्या शारीरस्थानांतून सांगितलें असल्यामुळें ५५ वर्षांनंतर विवाह करण्याचें वय पुरुषाचें राहतें असें कदाचित् ह्मणता येईल आतां तीन वेदांचें अध्ययन करणें हा दुसरा पक्ष स्वीकारिल्यास ब्राह्मणजातीय स्त्रीचें वय ४३ वर्षांचें, क्षत्रियजातीय स्त्रीचें वय ४६ वर्षांचें आणि वैश्यजातीय स्त्रीचें वय ४७ वर्षांचें होत असल्यामुळें ह्याही वयानंतर विवाह करण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. आतां दोन वेदांचें अध्ययन हा जो तिसरा पक्ष तो स्वीकारिल्यास स्त्रियांचें वय अनुक्रमें ३१ ३४ व ३५ इतकें होणार; परंतु, इतकें वय झाल्यानंतर प्रजोत्पादन हाच जर एक मुख्य उद्देश विवाहाचा धरिला तर मात्र तो कदाचित् सिद्धीस जाण्याचा संभव आहे. तथापि उपनयनाच्या गौण कालाची परमावधि जे सोळावें, बाविसावें आणि चोविसावें वर्ष त्या वर्षीं ह्मणजे गौण कालीं उपनयन झालें असल्यास स्त्रियांचें वय अनुक्रमें ८,१२ व १३ वर्षे जास्त ह्मणजे ३९, ४६ व ४८ वर्षे होणार असल्यामुळें ह्या वयानंतर प्रजोत्पादन हाही उद्देश सिद्धीस जाईलच असें ह्मणतां येणार नाहीं कारण,५० वर्षे हा जरी रजोदर्शनाच्या विद्यमानतेचा सामान्य काल चरकसुश्रुतादिकानीं शारीरप्रकरणांतून सांगितलेला आहे तरी कित्येक स्त्रियांचें रजोदर्शन ४० वर्षांचें वय होण्यापूर्वींच बंद होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें शिवाय ३१, ३४ अथवा ३५ वर्षे स्त्रीच्या वयाला झाल्यानंतर तिचे ठिकाणीं रजोदर्शन जरी विद्यमान असलें तरी गर्भधारणाची योग्यता आल्यानंतर सुमारें १९,२२ अथवा २३ वर्षे गर्भधारणाशिवाय जावयाचीं असल्यामुळें गर्भपोषणास योग्य अशी गर्भाशयाची अविकृत स्थिति कायम रहाण्याचा संभव शारीरशास्त्रदृष्ट्या विचार केला असतां फारच कमी आहे आतां ग्राम्यधर्मसेवन हा गौण हेतु स्वीकारून जर विवाह कर्तव्य असेल तर ३० वर्षांनंतरचेंही वय विवाहाला व्यर्थ आहे. कारण, बाराव्या वर्षांपासून पन्नास वर्षांपर्यंतचें जें मध्यम वय त्यांत वृद्धि, यौवन, संपूर्णता

आणि ईषत् हानि असे चार विभाग शारीर शास्त्राच्या मतानें आहेत आणि ह्यांपैकीं दुसरी जी यौवनावस्था ती पुरुषाचे ठिकाणीं तीस वर्षेंपर्यंतच असते असें सुश्रुतादिकांनीं सांगितलेलें आहे स्त्रीची बाल्यावस्था अथवा प्रजोत्पादनाची अयोग्यता पुरुषापेक्षां सुमार चार वर्षें पूर्वींच संपते असल्यामुळें मध्यमावस्थेतील दुसरा विभाग जी यौवनावस्था तीही सुमारें चार वर्षें पूर्वींच संपून जाण्याचा संभव असतो विधवाविवाह ज्या जातींत धर्म्य मानिलेला नाहीं त्या जातींत उत्पन्न झालेल्या स्त्रियांचे पुनर्विवाह (?) म्हणून जे कांहीं धर्मविरुद्ध प्रकार ह्या तीस वर्षांमध्यें अलीकडे चालू झाले आहेत ते सर्व अगर बहुतेक पंचविशीच्या आंतील स्त्रियांचेच झालेले आहेत ही गोष्ट ह्यासंबंधानें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे असो. वेदाध्ययनाकरितां बारा वर्षें ब्रह्मचर्य हा चवथा पक्ष स्वीकारिला असतां स्त्रियांचे वय अनुक्रमें १९, २२ व २३ वर्षांचें झाल्यावर त्या विवाहास योग्य होणार इतकें वय झाल्यानंतर विवाह केल्यानें प्रजोत्पादनादि उद्देश जरी सिद्धीस जाण्याचा संभव असला तरी नीतिशास्त्रानें अशा स्त्रीशीं विवाह करणें प्रायः अयोग्यच ठरणार आणि अशा स्त्रीशीं विवाह करण्यास पुरुषाला शारीरशास्त्राचीही आडकाठी येणार. कारण, ब्रह्मचारिणी स्त्रीशीं समागम करणें वाग्भट्ट प्रभृतींनीं निषिद्ध सांगितलेलें आहे आणि वैद्यशास्त्रग्रंथांतून ज्या ठिकाणीं उपदंशनिदान सांगितलें आहे त्या ठिकाणीं ब्रह्मचारिणी स्त्रीशीं समागम करणें हें एक पुरुषाला उपदंश रोग होण्याचें कारण दिलेलें आहे. शिवाय, वेदाध्ययनार्थ स्त्रीचें उपनयन जरी कर्तव्य असलें तरी बाप, चुलता अगर ज्येष्ठ भ्राता ह्यांवांचून दुसऱ्यानें कोणींही तिला अध्ययन सांगूं नये असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. स्त्रीनें घराबाहेर जाऊन अध्ययन करण्यास शास्त्राची अनुज्ञा नाहीं व तिघांशिवाय दुसऱ्या कोणालाही स्त्रीला अध्ययन सांगण्याचा शास्त्रानें अधिकार दिलेला नाहीं ह्यामुळें तिचें अध्ययन बाहेर होण्याची मुळींच पंचाईतच आहे आणि घरच्या घरीं तिनें १९, २२ अथवा २३ वर्षेंपर्यंत अविवाहित राहून अध्ययन करणेंही अशक्यच आहे कारण, दंपतीधर्मानें वागणाऱ्या कुटुंबांत रजोदर्शनानंतर ७, १० अथवा ११ वर्षें पुढें प्रवृत्तिमार्ग स्वीकारण्याचें ठरलेल्या अविवाहित स्त्रीला मन स्वस्थ ठेवून राहतां येणें संभवनीय नाहीं. आश्रमांत वगैरे जाऊन गुरुगृहीं अध्ययन करण्याची प्राचीन पद्धति असल्यामुळें स्त्रियांच्या संसर्गावांचून पुरुषाचें अध्ययन होणें संभवनीय होतें, कारण, पुरुषांना वेदाध्ययन सांगणारे पुरुषच असत आणि गुरूच्या घरांतील स्त्रियांशीं नात्यानें परकी असलेल्या शिष्यवर्गाचा संभाषणादि व्यवहार होण्याचा संभव नसे. परपुरुषाशीं संभाषण करण्याचाही स्त्रीधर्मांत निषेध सांगितलेला आहे आणि शिष्याला मातेप्रमाणें गुरुपत्नी अत्यंत पूज्य असतानाही ती वृद्धावस्थेतील नसल्यास बाल्यावस्था उलटून गेलेल्या शिष्यानें तिचें पादाभिवंदनही करूं नये असें शास्त्रांत सांगि-

तलें आहे " बृहस्पतिपुत्र कच शुक्राचार्यांचे घरीं अध्ययन करण्याकरिता राहिला होता व शुक्राचार्यांची कन्या देवयानी तेथें होती. परंतु, कचाचें अध्ययन चाललें असताना कचाला देवयानीशीं संभाषण वगैरे करण्याचा प्रसंग येऊं लागल्यामुळें त्याच्याविषयीं देवयानीचें मन उत्सुक झालें आणि अध्ययन समाप्त झाल्यावर शुक्राचार्यांची अनुज्ञा घेऊन कच परत जाऊं लागला असता **रजोदर्शन न झालेली**ही देवयानी धर्मदृष्ट्या स्वतःचा भ्राता ठरलेला जो कच त्याला पाणिग्रहण करण्याविषयीं आपण होऊन गळ घालूं लागली आणि " धर्मदृष्ट्या तूं माझी भगिनी आहेस; ह्यास्तव तूं असें भाषण करूं नकोस " अशी त्यानें तिची प्रार्थना केली असतानाही आपल्या इच्छेचा ह्यानें भंग केला असें समजून संतापाच्या भरांत तिनें त्याला शाप देण्यासही कमी केलें नाहीं. कच निघून गेल्यावर बराच काल लोटल्यानंतर ययातिराजानें देवयानीचें पाणिग्रहण केलें आणि पाणिग्रहण केल्यावरही पुष्कळ वर्षें ययातिराजाच्या सहवासांत गेल्यानंतर देवयानीला रजोदर्शन झालें. " अशा प्रकारचा मजकूर महाभारतामध्यें आहे. सारांश, रजोदर्शन न झालेली ऋषिकन्याही धर्मविरुद्ध वर्तन करण्यास उद्युक्त झाली, तेव्हां परकीय पुरुषाशीं स्त्रीनें संभाषण वगैरे करणें निषिद्ध असून वृद्धावस्थेंतील नसलेल्या गुरुपत्नीचें पादाभिवंदनही शिष्यानें करूं नये असें जं धर्मशास्त्रांत सांगितलें आहे तें योग्यच आहे अध्यापनाचा अधिकार पुरुषानाच असल्यामुळें अध्ययन करणाऱ्या शिष्याचा गुरूच्या कुटुंबांतीलही स्त्रीशीं संभाषणादि व्यवहार होण्याचा प्रसंगच येत नसल्यामुळें आणि आश्रमादि स्थलें लौकिक व्यवहारानीं भरलेल्या नगरादिकांपासून दूर असल्यामुळें खरें खरें ब्रह्मचर्य कायम राहून पुरुषाचें मात्र वेदाध्ययन होण्याचा प्राचीन कालीं संभव होता वेद पढविण्याचा अधिकार पुरुषानाच असल्यामुळें पुढें गृहस्थधर्मानें जी स्त्री वागणार तिचें अध्ययन अष्टविधमैथुनाभावरूप खरें खरें ब्रह्मचर्य कायम राहून होण्याचा संभव फारच कमी स्त्रीला परकीय पुरुषाशीं संभाषण करणेंही धर्मशास्त्रांत निषिद्ध असल्यामुळें तिला अध्ययन कर्तव्य असल्यास तिनें घरींच केलें पाहिजे व अध्ययन सांगणाराही पिता, पितृव्य अथवा भ्राता ह्यापैकींच कोणी तरी असला पाहिजे. परंतु, विषयवैराग्य उत्पन्न न झालेल्या स्त्रीचें अध्ययन मन स्वस्थ राहून घरीं होण्यासही पंचाईतच आहे. देवयानी ऋतुमती झाली नसतांनाही तिचें मन अस्वस्थ झालें हें महाभारतावरून सिद्धच आहे. सूर्यकन्या यमुना उपवर झाली असूनही अविवाहित राहिल्यामुळें आपल्या भ्रात्याशींही समागम करण्याविषयीं तिच्या मनांत उत्कट इच्छा उत्पन्न झाल्याचा प्रकार प्रत्यक्ष ऋग्वेदसंहितेंतच वर्णिलेला आहे व " प्रचंड इंद्रियसमुदाय ज्ञानवान् पुरुषालाही खड्ड्यांत घालितो; ह्यास्तव, माता, भगिनी आणि दुहिता ह्यांही एकट्या असताना पुरुषानें त्यांच्या संनिध बसूं सुद्धां नये " असें

मनुस्मृतींत सांगितलं आहे. तेव्हां ४८,३६, २४ अगर १२ वर्षें ह्यापैकीं कोणताही जरी पक्ष स्वीकारिला तरी विषयवैराग्य जिचे ठिकाणी श्रीज्ञानेश्वरमहाराजाच्या भगिनीप्रमाणें खरें खरें उत्पन्न झालेलें नाहीं ह्मणजे दंपतीधर्मानें पुढें वागण्याचा जिचा उद्देश आहे त्या स्त्रीचें वेदाध्ययन मन निर्दोष राहून होणें फार कठिण आहे.

उपवर झालेल्या स्त्रिया अविवाहित राहिल्या असता अनर्थ होऊं लागतात ही गोष्ट **महाभारत, मनुस्मृति** वगैरे ग्रंथांवरून सिद्ध होत आहे, परंतु, **मनूपेक्षां अम्बर्नर बरा** असें प्रतिपादन करणाऱ्या काहीं लोकांना हें मान्य होणार नाहीं तेव्हा तशा कांहीं लोकांकरिता दुसऱ्या रीतीनें त्याचा विचार करणें अवश्य आहे नीतीच्या मानानें पाहू गेलें असता विलायतेच्या पासंगासही हिंदुस्थान पुरणार नाहीं असें मेकॉलेसारख्या मोठमोठ्या विद्वान् इंग्लिश ग्रंथकारानीं लिहून ठेविलें आहे, तें खरें धरून चालणाऱ्या काहीं आधुनिक लोकांच्या मतानें सांप्रत जिकडे तिकडे सुरू असलेल्या शिक्षणावर नीतीची उन्नति अवलंबून आहे व लोकसंख्येच्या मानानें पाहू गेलें असता विलायतेंत शिक्षणाचें प्रमाण हिंदुस्थानापेक्षा अनेकपट जास्त असून स्त्रीशिक्षणाचें प्रमाण तर शेंकडों पटीनें जास्त आहे. तेव्हां काहीं आधुनिक लोकांच्या मतानें विलायत देश हिंदुस्थानापेक्षा नीतीमध्यें फारच श्रेष्ठ ठरत आहे. तथापि, हें काल्पनिक श्रेष्ठत्व घटकाभर बाजूला ठेवून विलायतेंतील शिक्षणाचें आणि ह्मणूनच नीतीचें मान हिंदुस्थानापेक्षा निदान कमी नाहीं असें ह्या आधुनिक लोकांचे मत मुख्य मुद्याचा विचार करण्याकरिता गृहीत धरून चालण्यास हरकत दिसत नाहीं. लॉ ऑफ् पॉप्युलेशन ह्मणून एक इंग्रजी पुस्तक विलायतेंत निघालेलें इकडे प्रसिद्ध आहे; आणि ह्या पुस्तकांत प्रजेचा ऱ्हास व वृद्धि ह्यांसंबधानें मजकूर लिहिलेला असून तो सर्व सप्रमाण लिहिलेला आहे. आणि त्यांतच उपवर झालेल्या अविवाहित स्त्रियांना भावापासून संतति झाल्याचीं व मुलींचे विवाह झाले नसूनही त्या पुत्रवती होत असल्याचीं शेंकडों उदाहरणें दिलेलीं आहेत. तेव्हा शिक्षणानें व नीतीनें जो देश ह्या आधुनिक लोकांच्या मतानें हिंदुस्थानदेशापेक्षां कमी ठरणार नाहीं त्या देशांत जर अविवाहित भगिनींना सहोदर भ्रात्यापासून संतति झाल्याचीं उदाहरणें हवीं तितकीं दृष्टोत्पत्तीस येत आहेत तर विषयवैराग्य उत्पन्न न झालेल्या उपवर स्त्रीचें अध्ययन सरळ रीतीनें पार पडणें कठिणच आहे आतां

**प्रतिवेदं ब्रह्मचर्यं द्वादशाब्दानि पंच वा ।**

ह्या याज्ञवल्क्यमुनींच्या वचनांत प्रत्येक वेदाच्या अध्ययनाकरितां पांच वर्षें तरी ब्रह्मचर्य असावें असा एक दुसरा पक्ष सांगितला आहे. तो जरी स्वीकारिला तरी सुद्धां वेदाध्ययनाकरिता उपनयन झाल्यावर वेदाध्ययन पुरें होईपर्यंत स्त्रियांचें वय अनुक्रमें १२, १५ व १८ वर्षांचें होणार, परंतु, इतकें वय झालेलीही स्त्री अगदीं निर्दोष

राहण्याचा संभव फारच कमी असें **महाभारत** वगैरे ग्रंथावरून आणि विलायतेंतीलही उदाहरणावरून सिद्ध होत आहे. " आठवें वर्षी उपनयन होऊन पांच वर्षांत वेदाध्ययन संपूर्ण झाल्यावर ब्राह्मणकन्येचें वय बारा वर्षांचेंच होत आहे, तेव्हां बारा वर्षांची ब्राह्मणकन्या विवाहसंस्काराला शुद्ध आहे असें मानिल्यास चिंता नाहीं आणि ह्मणूनच मुलीचें उपनयन करून तिला वेदाध्ययन सांगण्यास कांहीं हरकत नाहीं " असें एकाद्या आधुनिक ह्मणू लागेल ; परंतु, बारा वर्षें झालेली ब्राह्मणकन्या विवाहसंस्काराला शुद्ध मानिली नसल्यामुळें त्याचें ह्मणणें योग्य ठरणार नाहीं. बारावें वर्ष लागलें असूनही कन्या अविवाहित राहिल्यास तिला जरी रजोदर्शन झालेलें नसलें तरी तिच्या पित्याला भ्रूणहत्येचें पातक लागतें असें यमस्मृतींत सांगितलें आहे. बारा वर्षें हा रजोदर्शनाचा सामान्य काल **सुश्रुत, चरक** वगैरे अतिप्राचीनही ग्रंथकारांच्या मतानें ठरलेला आहे आणि रजोदर्शनापूर्वींच स्त्रीव्यंजक चिन्हें उत्पन्न होत असल्याचें लोकांच्या अनुभवावरूनच सिद्ध आहे मुलीला पदर घालण्यासारखी स्थिति रजोदर्शनापूर्वीं निदान दोन वर्षें तरी येत असते ह्याविषयीं मतभेदाला जागा असेल असें मला वाटत नाहीं. सोम, गंधर्व आणि अग्नि हे कन्या उत्पन्न झाल्यापासून अनुक्रमें दोन दोन वर्षें लालनबुद्धीनें तिचा उपभोग घेत असतात आणि शुद्ध बाल्यावस्थेंत जर कन्येचा विवाह झाला नाहीं तर बाल्य आणि यौवन अशी मिश्र अवस्था तिला प्राप्त होऊं लागल्यावर ते पुनरपि तिचा उपभोग घेऊं लागतात परंतु, लालनबुद्धीनें होणारा त्यांचा प्रथम उपभोग कन्येला शुचित्व, शुभ वाणी व सर्व मेध्यत्व देणारा असल्यामुळें जरी इष्ट असला तरी शुद्ध बाल्यावस्था संपल्यानंतर कामवासनेनें होणारा त्यांचा उपभोग मुलीला वैधव्य वगैरे येण्यास कारणीभूत होत असल्यामुळें अत्यंत अनिष्ट आहे. शरीरावर नूतन रोमपंक्ति उत्पन्न होणें हें शुद्ध बाल्यावस्था संपून कन्येला कामोद्दीपक यौवनावस्था सुरू होण्याचें लक्षण होय. हें लक्षण उत्पन्न झालें असतां सोम कामवासनेनें कन्येचा उपभोग घेऊं लागतो आणि हा सोमाचा उपभोगकाल सुरू झाल्यावर जर कन्येचा विवाह केला तर ती आपल्या कुलाचा आणि आपत्याचा घात होण्यास कारणीभूत होते असें अनुक्रमें **बृहस्पति** व **व्यास** ह्या मुनींनीं सांगितलेलें आहे. रोमराजि उत्पन्न झाल्यावर पुढें कांहीं दिवसांनीं कन्येला पदर घेण्याची स्थिति प्राप्त होत असते आणि ती प्राप्त झाल्यावर अग्नि कामवासनेनें तिचा उपभोग घेऊं लागतो व ह्या अवस्थेंत कन्येचें दान केलें असतां ती कुलाचा व पतीचा घात होण्यास कारणीभूत होते असें बृहस्पतिप्रभृति मुनींनीं सांगितलें आहे. ब्राह्मणकन्येला रजोदर्शन झाल्यावर ती विवाहसंस्काराला सर्वथाच अयोग्य होते असें पराशरस्मृतिप्रभृति स्मृतिग्रंथांतून स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां धर्मशास्त्राचा विचार लक्ष्यांत घेतला असतां **शुद्ध बाल्यावस्था संपल्यानंतर कन्या अविवाहित ठेवणें अनर्थावह होणारें आहे** ही गोष्ट सिद्ध आहे. अलीकडे बालविधवांची संख्या जास्त

जास्त होऊं लागली आहे ती कांहीं तरी कमी व्हावी एतदर्थ शास्त्राची पायमल्ली करून लोक आपआपल्या मुली त्यांना पदर घेण्याची वगैरे अवस्था प्राप्त झाली असताही अविवाहित ठेवितात आणि मनात तसा उद्देश नसूनही गैरसमजुतीनें त्यांना वैधव्यपंकात लोटण्यास तयार होतात हें मोठें आश्चर्य आहे. विवाहाला मुली मोठ्या केल्यानें बालविधवांची संख्या जर जास्त जास्त वाढू लागली तर शास्त्रदृष्टीनें विचार केला असतां संख्या जास्त वाढणे योग्यच आहे असें ह्मणणे भाग पडतें आणि **जों जों उपवर अविवाहित ब्राह्मणमुलींची संख्या जास्त जास्त वाढूं लागेल तों तों ब्राह्मणबालविधवांचीही संख्या जास्त जास्त वाढं लागणार** ही गोष्ट सिद्ध होते असो स्त्रियांना कामवासना उत्पन्न झाल्यावर त्या विवाहसंस्काराला तितक्या शुद्ध रहात नाहींत आणि स्मरण, कीर्तन, नर्म, निरीक्षण वगैरे जे ग्राम्यधर्माचे आठ प्रकार त्यापासून सर्वथा त्या अलिप्त राहणें अशक्य होऊं लागतें, ह्मणजे खरें खरें अविप्लुत ब्रह्मचर्य कामवासना उत्पन्न झाल्यानंतर कन्येचे ठिकाणीं रहाणें अशक्य होतें. कोणतेंही कृत्य करण्याची वासना तें कृत्य करण्याची अंगीं वास्तविक योग्यता येण्यापूर्वीच प्राण्याच्या अंतःकरणात उत्पन्न होत असते ह्या सिद्धांताला कोठें बाध येईल असें वाटत नाहीं. सोळा वर्षांचें वय होईतोंपर्यंत ग्राम्यधर्मसेवनाची योग्यता पुरुषाचे अंगीं येत नाहीं असें वैद्यशास्त्र सांगत. परंतु, ग्राम्यधर्मसेवनाची इच्छा मात्र पुरुषाचे ठिकाणीं तें वय प्राप्त होण्यापूर्वीच उत्पन्न होत असते ही गोष्ट सिद्ध आहे. कामादीपक जे लौकिक व्यवहार त्यापासून सर्वस्वी अलिप्त रहाता आल्यास आणि पुरुषजातीला स्त्रीचा व स्त्रीजातीला पुरुषाचा दर्शनादि संसर्ग बिलकुल न होईल अशा ठिकाणीं विवक्षित कालपर्यंत रहाण्याची व्यवस्था झाल्यास मनुष्यांचे ठिकाणीं वास्तविक योग्यता येण्याचेपूर्वी कामवासना उत्पन्न होण्याचा बराचसा प्रतिबंध होईल; परंतु, भिन्न जातीय व्यक्तींच्या संसर्गापासून सर्वस्वीं अलिप्त असलेलें स्थल वास्तव्य करण्याकरितां मिळण्याचा जोंपर्यंत संभव नाहीं तोंपर्यंत गृहस्थाश्रमी लोकांचे व्यवहार अवलोकन करण्याचा प्रसंग येत असलेल्या मनुष्याचे ठिकाणीं योग्यता येण्यापूर्वी अज, वृष, अश्व, मृग इत्यादिकांप्रमाणें कामवासनाही उत्पन्न होणारच. ही कामवासना जिचे ठिकाणीं उत्पन्न झाली आहे ती स्त्री तितक्या मानानें विवाहाला अशुद्ध ठरतें हें वर सांगितलेच आहे* . आतां ग्राम्यधर्मसेवनाची योग्यता

* कामवासना जिचे ठिकाणीं उत्पन्न झाली आहे अथवा जी वयात येऊं लागल्यामुळें कामी पुरुषांचें अंतःकरण आपणाकडे ओढू लागली आहे अशी कन्या अशुद्ध आणि ह्मणूनच विवाहाला अयोग्य हे चातुर्वर्ण्याप्रमाणें धर्मशास्त्रानें बद्ध नसलेल्या यूरोपीयन लोकांच्याही धर्मग्रंथावरून सिद्ध होत आहे

Whosoever looketh on a woman to lust after her hath commited adultery with her already in his heart. St. Matthew, V 28 Lust not after her beauty in thine heart ; neither let her take thee with her eyelids Proverbs VI 25 I made a covenant with mine eyes ; why then should I think upon a maid ? Job, XXXI I

पुरुषाचे ठिकाणीं सोळा वर्षाचें वय झाल्यावर आणि स्त्रीचे ठिकाणीं रजोदर्शन झाल्यावर येत असल्याचें शारीरशास्त्रानेंच सिद्ध होत असल्यामुळें आणि बारा वर्षे हा रजोदर्शनाचा सामान्य काळ शारीरशास्त्रानें ठरत असल्यामुळें विषयवासना पुरुषाचे ठिकाणीं सोळा वर्षांपूर्वी आणि स्त्रीचे ठिकाणीं बारा वर्षांपूर्वी उत्पन्न होत असली पाहिजे हें उघड आहे. परतु, हे विधान जरी खरें असलें तरी तें करितांना कांहीं आधुनिक लोकाची मला भीति अवश्य बाळगिली पाहिजे; अगर भीति बाळगावयाची नसल्यास वेळोवेळीं ह्या सुधारकपक्षाच्या उपहासास तरी पात्र झालें पाहिजे. समतिवयाच्या खर्ड्याची वाटाघाट चालली असतांना

ऊनषोडशवर्षायामप्राप्तः पञ्चविंशतिम्।

वगैरे प्रकारचीं खऱ्या अर्थाचा विचार न करिता सुश्रुतादिग्रंथातील वाक्यें पुढें करून सुधारक पक्षानें " समतिवयाचा कायदा अवश्य झालाच पाहिजे. कारण, सोळा वर्षे संपेपर्यंतही स्त्रीचा समागम निषिद्धच सांगितला आहे. " असें प्रतिपादन करण्यास सुरवात केली. तेव्हा विरुद्ध पक्षानें, इंद्रियनिग्रह होणें अगदींच अशक्य होऊन कांहीं भयकर पातक हातून घडण्याचा प्रसंग आल्यास आठ नऊ वर्षांच्याही स्वस्त्रीशीं समागम करावा; परतु, परस्त्रीगमनासारिखें भयंकर पातक करूं नये अशाविषयीं एका ग्रथातील आधार पुढें केला व तो पुढें केल्यामुळें सुधारकपक्षाला टीका करण्यास सवड सांपडली. सारांश, सुधारकपक्षाकडून सदहूं मुद्दा वाजवीपेक्षा फारच फाजील ताणला गेल्यामुळें तो खोडून काढण्याकरिता धर्माभिमानी पक्षाकडूनही कांहीं वाक्यें पुढें आलीं व त्यामुळें सुधारकपक्षाला धर्माभिमानी पक्षाचा, निदान विदेशीय लोकांच्या दृष्टीनें तरी, उपहास करण्याला सवड सांपडली व अद्यापिही सुधारकपक्षीय पत्रांतून वेळोवेळीं तें वाक्य पुढें करणाऱ्या त्या विद्वानाचा उपहास होत असतो ह्यास्तव, आपल्या मतलबाकरिता सुधारकपक्षानें पाहिजे तो अयोग्य मार्ग जरी स्वीकारिला तरी धर्माभिमानी पक्षानें आपली सरळ रीति न सोडितां शास्त्राचे आधार दाखवून आणि सुधारकपक्षाचा विश्वास बसेल अशीं हीं उदाहरणें शक्य असल्यास देऊन आपला पक्ष सिद्ध केला पाहिजे. तस्मात्, विषयवासना पुरुषाचे ठिकाणीं केव्हा उत्पन्न होते ह्यासबधानें आपल्या देशातीलच उदाहरणावर भिस्त न ठेवितां सुधारक पक्षाला मान्य अशाच प्रदेशांतील उदाहरणें दिलीं पाहिजेत.

इ. पि. कोडच्या १७६ कलमावरील मेनसाहेबांच्या टीकेंत पुढें दिलेल्या तात्पर्याचा मजकूर आढळतो:— " १४ वर्षांच्या आंतील मुलाकडून जबरीसभोग घडणें इंग्रजी कायद्यानें सर्वस्वीं अशक्य ठरतें. " असें हे मेन साहेब लिहितात. ह्यावरून १४ वर्षांच्या आंत मुलाचें वय नसल्यास त्याच्या हातून जबरीसभोग होणें अशक्य नाहीं हें इंग्रजी कायद्याच्या दृष्टीनें सिद्ध होतें. आणि अर्थातच खरी योग्यता अंगीं येण्यापूर्वीच कांहीं वर्षे

इंग्लंड देशांतील मुलांचें अंतःकरणांत कामवासना उत्पन्न होत असल्याचें सिद्ध होतें हेंच मेनसाहेब पुढें ह्मणतात " हिंदुस्थानात ह्यापेक्षां वयोमान काहीं कमी असावें आणि प्रायः अशा प्रकारचा खटला पुढें आला असताना मनुष्याची शारीरिक योग्यता पुराव्यांत घेण्यासंबंधानें अमेरिकेंतील कांहीं न्यायाधीशांचें अनुकरण हिंदुस्थानांतील न्यायदरबारांतून व्हावें. अमेरिकेंत दहा वर्षांच्या मुलानें तीन वर्षांच्या मुलीवर जबरी केल्याचा खटला एका न्यायासनापुढें आला होता. त्यांत संभोगाविषयीं यत्न करण्याचा आरोप शाबीत होऊन आरोपीला एक वर्षाची कैद झालेली आहे. " हेंच टीकाकार इं पि कोडच्या ८३ कलमावरील टीकेंत पुढील तात्पर्याचा मजकूर लिहितात. " यूरोपखंडापेक्षां हिंदुस्थानांतील मुली दोन वर्षें लवकर वयांत येतात असें कायद्यानें मानिल्याचें दिसतें. सबब, मुलासंबंधानेंही ही गोष्ट हिंदुस्थानांत धरून चालण्यास हरकत नाहीं " असो. दहा वर्षांच्या मुलीला रजोदर्शन होण्याचा संभव आहे असें आयुर्वेदाच्या आधारावांचून एक अक्षरही न लिहिण्याची प्रतिज्ञा केलेल्या, वाग्भट्टानीं आपल्या अष्टांगसंग्रह नामक ग्रंथांत लिहून ठेविलें आहे. व खानदानींतील मुलगी हाडापेरानें चांगली असल्यास अकरावें वर्षीं ऋतुमती होत असल्याचें दृष्टोत्पत्तीसही येतें. योग्यता येण्याचे पूर्वीच काहीं वर्षें पुरुषाचे ठिकाणीं वासना उत्पन्न होते ही गोष्ट इंग्लंड व अमेरिका येथील कायद्यानीं सिद्ध आहे आणि ज्याप्रमाणें पुरुषांचे ठिकाणीं वासना पूर्वीं उत्पन्न होते, त्याप्रमाणें स्त्रियांचे ठिकाणींही योग्यता येण्यापूर्वीं ती उत्पन्न होत असल्याचें नैसर्गिक कायद्यानेंच ठरत आहे. कामवासनेनें सोमादिकांचा मुलीला घडणारा संभोग, रजोदर्शनापूर्वीं नियत येणारी पदर घेण्याची स्थिति प्राप्त होण्यापूर्वीं ह्मणजे शरीराच्या विवक्षित भागावर रोमपंक्ति उत्पन्न होऊं लागण्याच्या सुमारास सुरू होत असतो हें स्मृतिवचनावरून ठरतें. ही अवस्था रजोदर्शनापूर्वींच दोन तीन वर्षें स्त्रीला प्राप्त होत असली पाहिजे कारण, मुलीला पदर घेण्याची अवस्था प्राप्त झाल्यानंतर निदान दोन वर्षें तरी रजोदर्शनाला लागतात हें प्रत्यक्ष सिद्ध आहे. धर्मशास्त्राचा विचार चालला असताना काव्यनाटकादिकांचे आधार घेणें योग्य दिसणार नाहीं; तथापि, अतिशयोक्ति ह्या दोषापासून प्रायः अलिप्त रहाणाऱ्या कविकुलगुरूच्या काव्यांतील आधार ह्या मुद्यासंबंधानें घेतला असतां तो घेणें अगदींच अयोग्य होईल असें मला वाटत नाहीं

कुमारसंभवांतील पहिल्या सर्गांत जगदंबेचें वर्णन चाललें असताना

**असंभृतं मण्डनमङ्गयष्टेरनासवाख्यं करणं मदस्य । कामस्य पुष्पव्यतिरिक्तमस्त्रं बाल्यात्परं माथ वयः प्रपेदे ॥ तस्याः प्रविष्टा नतनाभिरन्ध्रं रराज तन्वी नवलोमराजिः । नीवीमतिक्रम्य सिततरस्य तन्मेखलामध्यमणेरिवार्चिः ॥** "

असे श्लोक आहेत. ह्यांतील पहिल्या श्लोकात बाल्यावस्थेनंतर दुसरें वय प्राप्त झालें असे लिहिलें आहे. बाल्यानंतर प्राप्त झालेलें जें वय त्या वयाला **अङ्गयष्टेः असंभृतं मण्डनं २ मदस्य अनासवाख्यं करणं** आणि ३ **कामस्य पुष्पव्यतिरिक्तं अस्त्रं** अशीं तीन विशेषणें दिलेलीं आहेत व अशा प्रकारचें हें वय प्राप्त झाल्यानंतर नाभीचे ठिकाणीं नवलोमराजि झळकूं लागली असें पुढल्या श्लोकात वर्णन केलेलें आहे. ह्या काव्यश्लोकात वर्णिलेली स्थिति जगद्वेससंबधानें खरी असेल किंवा खोटीही असेल; परंतु, स्त्रीचे ठिकाणीं कामवासना पदर घेण्याची स्थिति प्राप्त होण्यापूर्वी उत्पन्न होत असते इतक्यापुरतें कविकुलगुरूचें मत ग्राह्य धरण्यास हरकत दिसत नाहीं. ह्यासंबधानें शाकुंतल नाटकापैकीं पहिल्या अंकातील कांहीं मजकूर लक्ष्यात ठेवण्यासारिखा आहे.

**शकुन्तलाः— सखि अनसूये अतिपिनद्धेन वल्कलेन प्रियंवदया नियन्त्रितास्मि । शिथिलय तावदेतत् । ... ...**

**प्रियंवदाः—**(सहासम्) **अत्र पयोधरविस्तारयितृ आत्मनो यौवनमुपालभस्व ।**

ह्या ठिकाणीं **पयोधरविस्तारयितृ** हें यौवनाला दिलेलें विशेषण लक्ष्यात ठेवण्यासारिखें आहे. तात्पर्य, पदर घेण्याची स्थिति प्राप्त होण्याच पूर्वीच स्त्रीचे ठिकाणीं कामवासना उत्पन्न होत असल्याचें सिद्ध असल्यामुळें आणि कामवासना उत्पन्न झालेली स्त्री तितक्या मानानें पाणिग्रहणास अयोग्य ठरत असल्यामुळें ज्या स्त्रीचें पाणिग्रहण होणें असेल त्या स्त्रीला वेदाध्ययन शक्य नाहीं आणि वेदाध्ययन जर शक्य नाहीं तर वेदाध्ययनाकरिता अवश्य असलेल्या उपनयनसंस्काराचीही तिला जरूरी नाहीं. ह्मणूनच **ब्रह्मवादिनी** आणि **सद्योवधू** असे जे स्त्रियांचे दोन प्रकार त्यापैकीं फक्त ब्रह्मवादिनीलाच वेदाध्ययन व त्याकरिता उपनयन सांगितलें असून **सद्योवधूला** ह्मणजे **पत्नी होणाऱ्या स्त्रीला उपनयन व वेदाध्ययन** धर्मशास्त्रात सांगितलेलें नाहीं. असो. आतापर्यंत जें विवेचन झालें त्याचा विचार केला असता **ब्रह्मवादिनी** ह्मणजे विषयवैराग्य उत्पन्न होऊन आत्मप्राप्तीकरिता वेदाध्ययन वगैरेमध्यें काळ घालवून आजन्म ब्रह्मचर्य पाळणारी स्त्री आणि **सद्योवधू** ह्मणजे पत्नीत्व प्राप्त करून घेऊन सहधर्मानें वागणारी स्त्री. असा ह्या दोन शब्दांचा अर्थ होतो. जिचा विवाह होणें इष्ट असेल तिला वेदाध्ययन व उपनयन संस्कार हीं सांगितलेलीं नाहींत; ही गोष्ट धर्मशास्त्रानें सिद्ध आहे तेव्हा बायकांची मुंज " वाजवी कीं गैर वाजवी ? आणि बायकांची मुंज सशास्त्र कीं अशास्त्र ? " ह्या दोन मुख्य प्रश्नांपैकीं पहिल्या प्रश्नाचें शास्त्रदृष्ट्या उत्तर " दंपतीधर्मानें रहाणें इष्ट असलेल्या बायकांची मुंज गैर वाजवी " हें सार्वकालिक होय; आणि शास्त्रदृष्ट्या दुसऱ्या प्रश्नाचें, ह्मणजे बायकांची मुंज सशास्त्र कीं अशास्त्र ह्या प्रश्नाचें, उत्तर, " दंपतीधर्मानें रहाणें इष्ट असलेल्या बायकांची मुंज अगदीं अशास्त्र, सशास्त्र नव्हे " हें सार्वकालिक होय

व्याख्यात्याचा वायकाची मुज हा जो दुसरा विषय त्यातील मुख्य प्रश्नाचें उत्तर याप्रमाणे आहे; परतु, हें संपूर्ण उत्तर नव्हे **ब्रह्मवादिनी** आणि **सद्योवधू** असे जे स्त्रियातील दोन प्रकार त्यातील **सद्योवधू** ह्या प्रकारासबधानें हें उत्तर पूर्ण झालें ; परतु, **ब्रह्मवादिनी** ह्या प्रकारासबधानें हें उत्तर पूर्ण झाले नाहीं. ह्याकरिता, **ब्रह्मवादिनी**सबधानें धर्मशास्त्रात आणखी काय सापडतें तें पाहू

**पुराकल्पे तु नारीणां मौञ्जीबन्धनमिष्यते। अध्यापनं च वेदानां सावित्रीवाचनं तथा ॥ पिता पितृव्यो भ्राता वा नैनामध्यापयेत्परः । स्वगृहे चैव कन्याया भैक्षचर्या विधीयते ॥ वर्जयेच्चाजिनं चीरं जटाधारणमेव च ।**

असें यमस्मृतींत सांगितलें आहे हारीत स्मृतीला अनुसरून ह्या वचनांचे तात्पर्य येणे प्रमाणें:—

पूर्वकल्पीं **ब्रह्मवादिनी** स्त्रियाना मौंजीबधन, वेदाध्ययन आणि गायत्रीचा उपदेश इष्ट असे. ह्याना अध्ययन सागणें तें पित्यानें पितृव्यानें अथवा भ्रात्यानेच सांगितलें पाहिजे. ह्या शिवाय इतराला ह्याना अध्ययन सागण्याचा अधिकार नाहीं. ब्रह्मचर्यव्रताग भैक्षचर्याही अशाप्रकारें अविवाहित राहिलेल्या स्त्रीला विहित आहे परतु, ती स्वगृहींच विहित आहे आणि ब्रह्मचारी पुरुषाप्रमाणें कृष्णाजिन, वल्कलें आणि जटाधारण, हिनें स्वीकारिता उपयोगीं नाहीं.

ह्या वचनात **पुराकल्पे** ह्मणजे पूर्व कल्पामध्ये असें स्पष्ट सांगितलं आहे. ह्यावरून कोणत्या कल्पामध्यें स्त्रियाचें उपनयन होत असे व तें बद होऊन किति कल्प लोटले ह्याचा खुलासा नीटसा होत नाहीं. तथापि, ह्या श्वेतवाराहकल्पाला आरभ झाल्यापासून तरी वायकाची मुज सशास्त्र नाहीं हा धर्मशास्त्राचा सिद्धांत निश्चित आहे. श्वेतवाराहकल्पाला आरभ होऊन किती कोटि वर्षे झालीं हें नक्की ठरविण्याचे काम मी तूर्त गणिती लोकावरच सोंपवून देतों. पूर्वकल्पीं सुद्धा पिता, भ्राता अथवा पितृव्य ह्यावाचून स्त्रीला शिक्षण देण्यास कोणाचाही अधिकार नसे आणि आश्रमप्राप्त भैक्षचर्येकरिताही स्त्रीला घराबाहेर जाण्याची शास्त्रानुज्ञा नसे. ही गोष्ट शास्त्रानें वागण्याचा आव घालणाऱ्या काहीं आधुनिक लोकानीं लक्ष्यात ठवावी. पूर्वकल्पीं विवाहावाचून स्त्रियाना रहाता येत असे असें कविकुलगुरूनींही एके ठिकाणीं सुचविलें आहे.

**राजा**–( आत्मगतम् ) **लब्धावकाशो मे मनोरथः। किं तु सख्याः परिहासोदाहृतां वरप्रार्थनां श्रुत्वा धृतद्वैधीभावकातरं मे मनः।**......( प्रियंवदां प्रति ) **अस्ति नः सच्चरितश्रवणलोभादन्यदपि प्रष्टव्यम् । .. इति सख्यीं त ज्ञातुमिच्छामि ।**

**वैखानसं किमनया व्रतमाप्रदानाद्व्यापाररोधि मदनस्य निषेवितव्यम् । अत्यन्तमेव मदिरेक्षणवल्लभाभिराहो निवत्स्यति समं हरिणाङ्गनाभिः॥२३॥**

**प्रियंवदा–आर्य धर्मचरणेपि परवशोयं जनः। गुरोः पुनरस्या अनुरूपवरप्रदाने संकल्पः।**

**राजा–**( आत्मगतम् ) **न दुरवापेयं खलु प्रार्थना।**

**भव हृदय साभिलाषं संप्रति संदेहनिर्णयो जातः। आशङ्कसे यदग्निं तदिदं स्पर्शक्षमं रत्नम्॥ २४॥**

**शाकुंतल० अ० ॥१॥**

"**मुनिकन्या क्षत्रियकन्या वेति संदेहे एकतरनिश्चयो जातः**" असें अर्थद्योतनिका टीकेंत आहे तें चिंत्य आहे. कारण "**अस्ति कोपि कौशिक इति गोत्रनामधेयो महाप्रभावो राजर्षिः।**" इत्यादि अनसूयेनें पूर्वी सांगितलेल्या हकीकतीवरूनच शकुंतलेची उत्पत्ति क्षत्रियापासून झाली आहे हें राजाला समजलेलें आहे. तविसाव्या श्लोकावरीलही सदहू टीका चिंत्य आहे.

"मदनव्यापाराचा निरोध करणारें हें ब्रह्मचर्य व्रत हिला स्वतःचें दान होईपर्यंत पाळावयाचें आहे किंवा आजन्म पाळावयाचें आहे" असा जो राजानें प्रश्न केला आहे त्यावरून आजन्म ब्रह्मचारिणी रहाणाऱ्या ब्रह्मवादिनी स्त्रिया आणि सद्योवधू असे दोन्ही प्रकार पूर्वकल्पीं असल्याचें सिद्ध होतें. शकुंतलेच्या संबधानें नाटकांत असलेली ही गोष्ट खरी असेलच असें वाटत नाहीं. दुष्यंतराजा कण्वमुनींच्या आश्रमामध्यें आला आणि त्यानें गांधर्वविधीनें शकुंतलेचें पाणिग्रहण केलें, इतकी गोष्ट महाभारतामध्यें आहे. अनसूया आणि प्रियंवदा ह्यांचा उल्लेखही मुळांत नाहीं आणि शकुंतलेच्या आजन्म ब्रह्मचर्याची शंकाही राजाला आलेली नाहीं. मुख्य कथानक नाटकरूपानें मनोरंजक होण्याकरितां कविकुलगुरूनीं त्यांत कमजास्त मजकूर केलेला आहे ह्यावरून दुष्यंतराजाच्या कारकीर्दींत आजन्म ब्रह्मचर्य पाळणाऱ्या स्त्रिया होत्या असें जरी सिद्ध मानितां येणार नाहीं तरी हारीतस्मृति आणि यमस्मृति ह्यांतील जीं वचनें पूर्वी दिलीं आहेत त्यांचा अर्थ कविकुलगुरूंच्या वेळींही कशाप्रकारें रूढ होता हें **वैखानसं किमनया व्रतमाप्रदानात्** ह्या श्लोकावरून समजण्या सारिखें आहे. तात्पर्य, आजन्म ब्रह्मचर्य पाळणें हा एक पक्ष आणि विवाह करणें हा दुसरा पक्ष हे दोनच पूर्वकल्पीं रूढ होते. **आप्रदानाद्ब्रह्मचर्यव्रतं** हें दुष्यंतराजाच्या प्रश्नांतील शब्द माठे लक्ष्यांत ठेवण्यासारिखे आहेत कृष्णाजिन आणि जटाधारण हीं चिन्हें पूर्वकल्पीं वेदाध्ययन करून आजन्म ब्रह्मचर्य पाळणाऱ्या स्त्रियांना विहित नसल्यामुळें वेषावरून ब्रह्मचारी पुरुष जसा ओळखितां येण्याचा संभव होता तसा संभव, स्त्री आजन्म ब्रह्मचर्य पाळणारी आहे किंवा नाहीं, हें ओळखू येण्याचा नव्हता. वेदाध्ययन करणें आणि न करणें ह्यावरून स्त्रीला आजन्म ब्रह्मचर्य पाळावयाचें आहे किंवा नाहीं ह्याचा निकाल व्हावयाचा; परंतु, शकुंतला वेदाध्ययन करीत आहे किंवा नाहीं हें विचारिल्यावाचून समजणार कसें? शकुंतलेचें स्वरूप पाहिल्यानंतर दुष्यंत राजाला

तिची प्राप्ति कशी होईल ह्या विचाराशि-वाय दुसरें कांही सुचेनासच झाल्यामुळें त्याला तिच्या अध्ययनासंबंधानें प्रश्न करण्याला अवसर मिळाला नाहीं; आपआपसांत चाललेल्या भाषणावरून योग्य पति वरण्याविषयीं शकुंतलेची इच्छा अप्रत्यक्ष रीतीनें दुष्यंताला समजून आलेली होती; परंतु मैत्रिणींमैत्रिणींत चाललेल्या भाषणांत थट्टेचा प्रकार असल्यामुळें राजाचा त्यावर विश्वास बसेना. तेव्हां शकुंतलेची उत्पत्ति समजून आल्यामुळें ती ब्राह्मणी नसून आपल्याशीं विवाह करण्यास योग्य आहे इतकें जरी सामान्यतः राजाला समजून चुकलें होतें तरी थट्टेनें चाललेल्या भाषणांवर त्याचा विश्वास न बसल्यामुळें ही ब्रह्मवादिनी स्त्री आहे किंवा सद्योवधू होणारी आहे ह्याबद्दल त्याच्या मनाला खात्री वाटेना; ह्मणून त्यानें "हिला ब्रह्मचर्य व्रत हिचें दान होईपर्यंत पाळावयाचें आहे, किंवा आजन्म पाळावयाचें आहे" असा प्रश्न करून आपल्या शंकेचें निरसन करून घेतलें. शकुंतला आश्रमामध्येंच होती व कण्वमुनिच तिचें पित्याप्रमाणें पालन करणारे होते; तेव्हां आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याचा संकल्प जिचा नाहीं ह्मणजे गार्हस्थ्यधर्म स्वीकारणें जिला इष्ट आहे अशा स्त्रीलाही जर उपनयन संस्कार होऊन वेदब्रह्मचर्य पाळिल्यानंतर विवाहाची अनुज्ञा असती तर कण्वमुनींनीं तिचें उपनयन करून तिला वेदाध्ययन सांगितलें असतें. परंतु, तें सांगितल्याचें कोठें दिसत नाहीं कारण, वेदाध्ययनाकरितां वेदब्रह्मचर्य शकुंतलेनें पाळिलें असल्याचें दिसत नाहीं. शकुंतला ही क्षत्रियकन्या असल्यामुळें तिचें उपनयन जर कण्वमुनींनीं केलेलें असेल तर तें अकरावे वर्षी केलेलें असेल ही गोष्ट खचित आहे आणि एकाच वेदाचें अध्ययन तिच्याकडून त्यांना करवावयाचें होतें असा जरी कण्वमुनींचा उद्देश गृहीत धरिला, तरी सामान्यतः त्याला बारा वर्षें लागणार ह्मणजे सुमारें २३ वर्षांचें वय झाल्यावर शकुंतला विवाहाला योग्य होणार हें सिद्ध आहे परंतु, कविकुलगुरूच्या उक्तीवरून विवाहसमयीं शकुंतलेचें वय २३ वर्षांचें होतें असें मुळींच सिद्ध होत नाहीं. शकुंतलेला विवाह समयीं नुकतेंच रजोदर्शन झालें असावें असेंच नाटकांतील मजकुरावरून दिसत आहे यौवनव्यंजक अवयवांची वृद्धि एकाएकीं झपाट्यानें होऊं लागणें ही जी अवस्था आहे ती रजोदर्शन झाल्यापासून दहा अकरा वर्षांनीं ह्मणजे सुमारें २३ वर्षांचें वय झाल्यावर स्त्रियांना प्राप्त होते असें कधीं ह्मणणेंच येणार नाहीं ही अवस्था रजोदर्शन होण्याचे समयास अथवा फार तर वर्ष सहा महिने आगेमागे इतक्याच समयास स्त्रीला प्राप्त होत असते, हें सिद्ध आहे कापसाच्या वस्त्रापेक्षां वल्कलें टिकाऊपणाला कमीं असलीं पाहिजेत असा माझा समज आहे परंतु, तीं कार्पासवस्त्राइतकीं टिकाऊ असतात असें जरी गृहीत धरिलें तरी नेहमीं वापरण्यांत येणारी सुती खणाची चोळी दडरकट जरी असली तरी वर्षसहामहिन्यापेक्षां जास्त टिकत नाहीं व चोळ्या सहा सहा

महिन्यानीं तरी फिरून फिरून शिवाव्याच लागतात तेव्हां शकुंतलेच्या अंगात जी वल्कलाची काचोळी ह्मणजे पाठीमागे बंद येणारी चोळी घातलेली होती ती तरी वर्ष-सहामहिन्यांतलीच शिवलेली असली पाहिजे. शकुंतलेला स्वतः सैल करितां येत नसल्यामुळे तिच्या अंगात चोळी नसून मागल्या बाजूला बंद असलेली काचोळी असावी असें सिद्ध होतें. असो. " गडे अनसूये, प्रियंवदेनें काचोळी घट्ट आवळून मला अगदीं जखडून टाकिलें आहे, तर तू येवढी सैल कर पाहू " हें शकुंतलेचें भाषण ऐकून प्रियंवदा हसत हसत तिला ह्मणाली " गडे, जखडून टाकण्यासंबधानें अवयवाची वृद्धि करणाऱ्या आपल्या यौवनालाच काय दोष द्यावयाचा असेल तो दे. " ह्या संवादावरून विवाहसमयीं शकुंतलेला नुकतेंच रजोदर्शन झालेलें असून तिचें वय फार तर १३।१४ वर्षांचेंच असलें पाहिजे ही गोष्ट सिद्ध होते. लतेजवळ जाऊन आणि इकडे तिकडे दृष्टि फेंकून शकुंतला ह्मणते " गडे, ह्या लतावृक्षरूप जोडप्याचा हा समागम खरोखर मोठ्या रमणीय वेळीं झालेला आहे. वनज्योत्स्ना ही नवकुसुमरूप यौवनानें मुसमुसलेली आहे आणि पल्लवरूप मृदुहस्त असल्यामुळे सहकारवृक्षही तिचा उपभोग घेण्यास योग्य आहे " अशा अर्थाचें जें शकुंतलेचें भाषण आहे त्यातील नवकुसुमयौवना हें वनज्योत्स्नेचें विशेषण फार मार्मिक आहे. ह्या एकंदर भाषणाचा गर्भित अर्थ शकुंतला व दुष्यंत ह्यांना उद्देशून आहे आणि ह्मणूनच नवकुसुमयौवना ह्या विशेषणावरून शकुंतलेला विवाहसमयीं अगदीं नवीनच रजोदर्शन झालें असल्याचें सिद्ध होत आहे. सारांश, ह्यावेळीं शकुंतलेचें वयच जर १३।१४ वर्षांपेक्षा ज्यास्त असल्याचें सिद्ध होत नाहीं तर अकराव्या वर्षी उपनयन होऊन वेदब्रह्मचर्याकरितां तिचीं बारा वर्षें तर नव्हेतच, परंतु, याज्ञवल्क्यानीं दर्शविलेल्या दुसऱ्या पक्षाप्रमाणें पांच वर्षेंही गेलेलीं नाहींत ह्मणजे अर्थात् तिचें उपनयन झालेलें नाहीं, ही गोष्ट सिद्ध होते. आतां

**षट्त्रिंशदाब्दिकं चर्यं गुरौ त्रैवेदिकं व्रतम् । तदर्धिकं पादिकं वा ग्रहणान्तिकमेव वा ॥ १ ॥**

अशी मनुस्मृति आहे,

**प्रतिवेदं ब्रह्मचर्यं द्वादशाब्दानि पञ्च वा । ग्रहणान्तिकमित्येके**

अशी याज्ञवल्क्यस्मृति आहे,

**न स्त्रियमुपेयादष्टाचत्वारिंशद्वर्षाणि चतुर्विंशतिं द्वादश यावद्ग्रहणं वा**

असें हिरण्यकेशी गृह्यसूत्र आहे आणि आश्वलायनगृह्यसूत्रही

**द्वादश वर्षाणि वेदब्रह्मचर्यं ग्रहणान्तं वा**

असें आहे. तेव्हां ग्रहणान्त पक्ष ह्मणजे वेदग्रहण होईपर्यंत ब्रह्मचर्य पाळावें हा पक्ष जर धर्मशास्त्रानें सांगितलेला आहे तर शकुंतलेची बुद्धि काहीं अलौकिक असून तिचें वेदाध्ययन विवाहसमयीं संपलें नसेल कशावरून ? अशी एक शंका ह्या ठिकाणीं येण्याचा संभव आहे ; परंतु, विचारांतीं ही शंका

टिकत नाहीं ह्मणान्त पक्ष जरी प्राय: धर्मशास्त्रप्रणेत्या प्रत्येक मुनीनीं सांगितला आहे तरी सोडमुंज करावयास नको हे मात्र कोणींही सांगितलेलें नाहीं. पुरुषाचा विवाह होण्यापूर्वी समावर्तन ऊर्फ सोडमुंज हा संस्कार प्रत्येक सूत्रकारानें अवश्य सांगितलाच आहे, परंतु, कण्वमुनि आश्रमांत नसताना दुष्यंतराजा आश्रमात गेल्यापासूनचा जो प्रकार नाटकामध्यें वर्णिलेला आहे त्यात शकुंतलेची सोडमुंज केल्याचा प्रकार कोठेंही वर्णिलेला नाहीं ब्रह्मचर्य व्रत हिनें कोठपर्यंत पाळावयाचें आहे असा जो राजाचा प्रश्न आहे त्यातील ब्रह्मचर्य बोधक **वैखानसं** ह्या पदाचा अर्थ, ब्रह्मचर्याश्रमाला अवश्यक असलेलें अग्निकार्य वगैरे, असा विवक्षित नसून ग्राम्यधर्मसेवनाचा अभाव इतकाच विवक्षित आहे आणि ह्या ब्रह्मचर्याला कविकुलगुरूनीं जें विशेषण दिलें आहे तेंही ब्रह्मचर्याश्रमाला विहित असलेल्या अग्निकार्यादिकांचें बोधक दिलेलें नसून मदनाच्या व्यापाराचा निरोध करणारें असेच दिलेलें आहे तेव्हा येथील ब्रह्मचर्यबोधक " **वैखानसं** " ह्या शब्दाचा अर्थ ग्राम्यधर्मसेवनाचा अभाव इतकाच धरिल्यावाचून गत्यंतर नाहीं. ह्यापेक्षा दुसरा अर्थ जर मानावयाचा असेल ह्मणजे वैखानस ह्या शब्दानें ब्रह्मचर्याश्रम असा जर अर्थ घ्यावयाचा असेल तर राजानें हा प्रश्न केल्यावर सखीकडून त्याच उत्तर मिळाल्यानंतर गांधर्व विवाह होण्यापूर्वी शकुंतलेची सोडमुंज झाल्याचा प्रकार नाटकात वर्णिला आहे असें दाखवाव लागेल; पण तें नाटकांत कोठेंही आढळत नाहीं आणि महाभारतांतही कण्वमुनि आश्रमात नसताना त्या दिवशीं शकुंतलेची व राजाची आश्रमांत भेट झाली त्याच दिवशीं त्याचा गांधर्वविवाह झाला असें लिहिलें आहे. तस्मात् नायकाची मुंज त्याना आजन्म ब्रह्मचर्य व्रत पाळावयाचें असल्यास श्वेत वाराहकल्प लागण्याचें पूर्वी कोणत्या तरी एका कल्पामध्यें होणें वाजवी व सशास्त्र असून ह्या **श्वेतवाराहकल्पामध्यें कोणत्याही स्त्रीची मुंज वाजवीही नाहीं आणि सशास्त्रही नाहीं; अशास्त्रच आहे.** हें व्याख्यात्याच्या दोन्ही प्रश्नाचें सप्रमाण स्पष्ट उत्तर होय

आता ह्या मुख्य प्रश्नांतील पोटप्रश्नांचा विचार करूं. " आईबाप जर उभयता ब्राह्मण असतील, तर त्याच्या मुलास ब्राह्मण ह्मणता येईल. " असें व्याख्यात्यानीं नायकाची मुंज वाजवी कीं गैरवाजवी ह्या सदराखालीं प्रथमच लिहिलें आहे. चातुर्वर्ण्य ह्मणजे काय ह्या सदराखालीं " शमदम उपजत असणारा ब्राह्मण " असें ह्मटलें आहे आणि त्याच सदराखालीं " मॅक्समुल्लरसारखे अध्यापक हेही ब्राह्मणामध्येंच गणावें लागतात " असेंही ह्मटलें आहे. तेव्हा ह्या विधानाची एकवाक्यता कशी काय करावयाची ? कर्मप्रवृत्तीवर वर्णव्यवस्था अवलंबून आहे असें जर ह्याचें मत असेल तर " आईबाप जर उभयतां ब्राह्मण असतील तर त्याच्या मुलास ब्राह्मण ह्मणता येईल " हें विधान कशाला ? असलीं परस्पर अत्यंत असंबद्ध विधानें जर घडघडीत

छापून निघालेल्याही व्याख्यानामध्यें उघड उघड आहत तर व्याख्यानावर वादविवाद कमीटीनें बंद केल्याचा हुकूम फर्माविताना वादविवादाच्या वर्दीस " व्याख्याता अगोदर पुष्कळ दिवस विषयाचा विचार करून व्याख्यान लिहून काढीत असल्यामुळे त्याचे विचार परिपक्व झालेले असतात " असें ज एक कारण सागण्यात आलें तें निदान व्याख्यानमालतील श्रीगणेशायनमःचेच जें हें छापील व्याख्यान वाचून दाखविलें गेलें त्यासंबंधानें तरी योग्य आहे असें दिसत नाहीं शिवाय हे व्याख्यान, वाचून दाखविण्यापूर्वी येथीलच एका छापखान्यांत छापून निघालेल आहे आणि व्याख्यातेही येथील रहिवाशीच आहेत. तेव्हा अध्यक्षाच्या ह्मणण्याप्रमाणे ज " हें परिपक्व विचारानीं " ओथबलेलें व्याख्यान झालें तें वाचून दाखविण्यापूर्वी त्याचा चागल्या सुबक अक्षरानीं छापून काढिलेला खर्डाही व्याख्यात्याना अगोदर मिळाला असेल व तो निदान एक-दोन दिवस तरी त्याच्याकडे पडून राहिला असेल अशी माझी समजूत आहे. तात्पर्य, " परिपक्व विचारानीं " थबथबलेलें हें व्याख्यान आणखी एकदां शातपणानें वाचून पहाण्यास व्याख्यात्याना सवड होती इतकेंच माझे ह्मणणे आहे. असो.

आता ह्या मुद्यासंबंधानें जास्त चर्चा न करिता व्याख्यात्याच्या पुढल्या विधानाचा विचार करू " ब्राह्मणाचींही मुलें उपजत शूद्र असून मुंज होत तेव्हाच त्यास ब्राह्मण ह्मणवून घेण्याचा अधिकार येतो. जर मुलीची मुंज झाली नाहीं तर ती उघड शूद्र झाली; ती ब्राह्मण ह्मणता येत नाहीं. " असें व्याख्याते ह्मणतात. आता ब्राह्मण ह्मणवून घेणें ही गोष्ट दुसऱ्यावर अवलंबून आहे. ब्राह्मण ह्मटल्या जाणाऱ्या व्यक्तीवरच केवळ अवलंबून नाहीं. तेव्हा " ब्राह्मण ह्मणवून घेण्याचा अधिकार येतो " असें जें व्याख्यात्यानीं ह्मटलें आहे त्या ऐवजीं " ब्राह्मण ह्मणवून घेण्याची योग्यता येते " असें ह्मटलें असतें तर बरें दिसलें असते. " जर मुलीची मुंज झाली नाही तर ती उघड शूद्र झाली " असें दुसऱ्या वाक्यात ह्मटलें आहे आणि " ब्राह्मणाचींही मुलें उपजत शूद्र असतात" असें पहिल्या वाक्यात विधान केलेलें आहे. तेव्हा परस्पर विरुद्ध असलेल्या ह्या विधानाचा मेळ बसावा कसा ? होणें ह्या क्रियापदाचें झाली हें भूतकाळचें रूप होय. कोणत्याही पदार्थासंबंधानें अथवा व्यक्तीसंबंधानें जेव्हा होणे ह्या क्रियापदाचा उपयोग केलेला असतो, तेव्हा त्या पदार्थाला अगर व्यक्तीला पूर्वी नसलेली स्थिति मागून प्राप्त झाली असें दर्शविणें विवक्षित असतें " सयाजी गायकवाड सयाजीरावमहाराज गायकवाड झाले " ह्मणजे पूर्वी नव्हते असा ह्या वाक्यावरून बोध होतो " अमुक अमुक मनुष्य अमुक अमुक परीक्षेंत उत्तीर्ण होऊन पदवीधर झाला " ह्मणजे तो पूर्वी पदवीधर नव्हता असा ह्या वाक्यापासून बोध होतो त्याचप्रमाणें " जर मुलीची मुंज झाली नाहीं तर ती शूद्र झाली " ह्याचा अर्थ " मुंजीचें वय प्राप्त होण्यापूर्वी

ती शूद्र नव्हती, ब्राह्मण होती " असा होतो तेव्हा ब्राह्मणाचीं मुलें उपजत शूद्र असतात आणि मुजीचें वय प्राप्त होऊन तें मुंजीशिवाय निघून जाण्यापूर्वी मुलगी ब्राह्मण होती ह्या परस्पर अत्यंत विरुद्ध विधानाचा मेळ बसणार कसा ? व्याख्यात्यांचा जो उद्देश एकदर व्याख्यानावरून दिसत आहे तो लक्ष्यात आणिला ह्मणजे " जर मुलीची मुंज झाली नाहीं तर ती उघड शूद्रच कायम राहिली " असें ह्यानीं ह्मटलें असतं ह्मणजे ह्याच्या विचारसरणीशीं तें जुळलें असतें. व्याख्याते हे येथील एका शाळेचे चालक असून त्याची तपच्या तर्पे अध्यापनात गेलेलीं आहेत आणि मराठी भाषा लिहिण्यासंबंधानें त्यांचा हात अगदी खडा आहे अशी ह्या व्याख्यात्याची प्रशंसा काहीं विवक्षित लोकांकडून येथे होत असते ती अयोग्य आहे असं दर्शविण्याचा माझा उद्देश नसून

**वेदव्यासः स नव दश यो वेद वेदाक्षराणि । श्लोकं स्वकं परिपठति यः स स्वयं जीव एव ॥**

ह्या न्यायानें व्याख्याते हे विद्वत्तेसंबंधानें कोणाच्याही स्तुतीस पात्र आहेत हें मला प्रांजलपणें कबूल करणें भागच आहे फक्त "परिपक्व विचारानीं "तुडुंब भरलेल्या ह्या व्याख्यानात विचारपरिपाक किती आहे इतकेच दर्शविण्याचा माझा उद्देश आहे. वाचून दाखविण्यापूर्वीच छापून निघालेल्या ह्या व्याख्यानामध्यें अशा प्रकारचीं परस्पर अत्यंत असंबद्ध विधानें ठिकठिकाणीं भरलेली आहेत : परंतु, व्याख्यानातील असंबद्धता दर्शविण्याचा माझा मुख्य उद्देश नसल्यामुळें व जमलेल्या श्रोतृवृंदाचाही तो ऐकण्यात वाजवीपेक्षा फाजील वेळ जाणें मला योग्य दिसत नसल्यामुळें असंबद्धतेसंबंधानें आता विशेष वाटाघाट न करितां व्याख्यानातील विधानाचाच होतां होईपर्यंत अर्थदृष्टीनेच विचार करूं.

**वैदिकैःकर्मभिः पुण्यैर्निषेकादिर्द्विजन्मनाम् । कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ॥ २६ ॥ अ० २ ॥**

असें मनुस्मृतीत वचन आहे. ह्या वचनात द्विजाचे गर्भाधानादि शरीरसंस्कार वैदिक कर्मानीं करावे असं सांगितलें आहे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या तिघाना द्विज अशी संज्ञा असून शूद्राला एकजाति अशी संज्ञा आहे. तेव्हा

**जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।**

ह्या वचनाचा अर्थ—ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य ह्या तीन वर्णांमध्यें विवाहसंस्कारानें बद्ध झालेल्या सजातीय मातापितरापासून उत्पन्न झालेलें मूल जन्मतः शूद्र ह्मणजे शूद्रजातीय असतें आणि त्याला पुढे वैदिक संस्काराच्या योगानें द्विजत्व येत असतें— असाच जर केला तर ह्या वचनाचा वैदिकैः कर्मभिः पुण्यैः ह्या वचनाशीं विरोध येतो. कारण, द्विजत्व संस्कारानीं येतें असें ह्या वचनात सांगितलें असून पहिल्या वचनात द्विजाचे गर्भाधानादि संस्कार वैदिक कर्मानीं करावे असें सांगितलें आहे सारांश, द्विजत्व हें गर्भाच्या उत्पत्तीपासूनच सिद्ध धरून

वैदिक संस्काराचें विधान पहिल्या वचनांत केलेलें आहे आणि दुसऱ्या वचनांत संस्कारावर द्विजत्व अवलंबून असल्याचें दर्शविलें आहे. तेव्हां दुसऱ्या वचनाचा खरा अर्थ—ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य ह्या वर्णांत विवाहसंस्कारानें बद्ध झालेल्या सजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें मूल निवळ शूद्रच असतें, द्विजत्वाशीं त्याचा कांहीं एक संबंध नसतो द्विजत्व हें त्याला संस्कारानेंच प्राप्त व्हावयाचें असतें—असा मानितांच येत नाहीं ह्याच अर्थ जर खरा मानिला तर शूद्रजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें मूल आणि द्विजजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें मूल ह्यांत भेद तो काय ? बरं, " ह्या दोन्ही मुलांमध्यें कांहीं एक भेद नाहीं, शूद्रत्व हें दोहोंच्या ठिकाणीं सारखेंच आहे " असें जर ह्मटलें तर संस्कारांच्या योगानें द्विजत्वही दोघांना प्राप्त होतें असें होऊं लागेल. बरं, " दोघांनाही संस्काराच्या योगानें द्विजत्व प्राप्त होईना ? त्यांत तोटा काय आहे ? दोघांनाही द्विजत्व प्राप्त झाल्यास आमचा फायदाच आहे " असेंही कांहीं आधुनिक लोक ह्मणूं लागतील परंतु, हें त्याचें ह्मणणें योग्य ठरणारें नाहीं कारण, द्विजत्व जर वैदिक संस्कारावर अवलंबून आहे आणि गर्भाच्या उत्पत्तीपासूनचे सर्व संस्कार जर वैदिक मंत्रांनीं होणें अवश्य आहे तर शूद्रजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें जें मूल त्याच्या गर्भाधानाचा ह्मणजे गर्भस्थापनेचा संस्कार त्याचीं मातापितरें शूद्रजातीय असल्यामुळें वैदिक मंत्रांनीं झालेला नाहीं. कारण, शूद्रांना वैदिक कर्माचा अधिकार नाहीं. गर्भाधानाच्या नंतर गर्भावस्थेत होणारे गर्भसंस्कारही वैदिकमंत्रांनीं होण्याचा संभव नाहीं. उत्पन्न झाल्यावर होणारा जातकर्मसंस्कारही संस्कार करणारा पिता असल्यामुळें व तो शूद्र असल्यामुळें वैदिक मंत्रांनीं होण्याचा संभव नाहीं जातकर्मानंतर उपनयनापर्यंतचेही मुलाचे संस्कार करणारा पिताच असल्यामुळें तेही वैदिकमंत्रांनीं होण्याचा संभव नाहीं आणि

पितैवोपनयेत्पुत्रं तदभावे पितुः पिता । तदभावे पितृभ्राता...

ह्या स्मृतिवचनांत मुलाचा उपनयनसंस्कार करण्याचा मुख्य अधिकार पित्याचा असल्यामुळें आणि पिता शूद्र असल्यामुळें तोही वैदिक मंत्रानें होण्याचा संभव नाहीं. तेव्हां शूद्रजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेल्या मुलाचे वैदिक संस्कारच जर होण्याचा संभव नाहीं तर वैदिक संस्कारामुळें येणारें द्विजत्व त्याला कोठून प्राप्त होणार ? ह्यास्तव, शूद्रजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें मूल आणि द्विजजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें मूल ह्या दोहोंचे ठिकाणीं असलेला शूद्रत्व हा धर्म एकसारिखा नाहीं. भिन्न भिन्न प्रकारचा आहे असें धरून चालल्यावांचून गत्यंतरच नाहीं. शूद्रत्व हा धर्म दोहोंचे ठिकाणीं सारखाच जर मानिला तर द्विजजातीय मातापितरांपासून उत्पन्न झालेलें मूल जगण्याचा फारच संभव कमी आहे. शूद्राला स्पर्श, भोजन वगैरे करणें द्विजांना

निषिद्ध सांगितलेलें आहे. तेव्हां ब्राह्मण क्षत्रिय अथवा वैश्य ह्या तिन्ही वर्णांतील स्त्रियांना आपआपलीं मुलें उत्पन्न होतांक्षणीं टाकून तरी दिलीं पाहिजेत किंवा शूद्राच्या तरी हवालीं केलीं पाहिजेत जातकर्मापासून त्याचा संस्कार कांहीं एक व्हावयाचा नाहीं; कारण, धुतलेलें अगर रेशमाचें वगैरे सोवळें वस्त्र परिधान करून संस्कार करावे असें सांगितलेलें असतें. ह्या संस्काराचे वेळीं शूद्रस्पर्श निषिद्ध आहे व शूद्राचें सनिध संस्कार होणेंही निषिद्ध आहे तेव्हां ज्या मुलाचे संस्कार करावयाचे तें मूलच जर मुळीं शूद्र आहे तर त्याचे जातकर्मादि संस्कार व्हावयाचे कसे? मुलाला स्पर्श केल्यावाचून कोणताही संस्कार करितां येत नाहीं मुलाच्या आयांना आपआपलीं मुलें पाजितां सुद्धां येणार नाहींत, भोजनाचे वेळेस त्यांना जवळ घेतां येणार नाहीं, शूद्र आणि द्विज ह्यांनीं एका शय्येवर शयन करणें निषिद्ध असल्यामुळें शयनकालीं मुलें आईजवळ असणें योग्य होणार नाहीं; मग त्याचें हगणें मुतणें खपल जाण्याची तर गोष्टच नको आहे. सारांश,

**जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।**

ह्या वचनाचा अर्थ वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें जर केला तर गर्भाबरोबर बाहेर येणारे दुसरे कांहीं अस्पृश्य व अपवित्र पदार्थ ज्याप्रमाणें बाहेर त्वरा करून लांब नेऊन टाकून द्यावे लागतात, त्याचप्रमाणें त्या पदार्थांबरोबर बाहेर येणारा गर्भही दूर नेऊन टाकिला पाहिजे, किंवा कोणी शूद्र पत्करील असल्यास तो त्याच्या तरी स्वाधीन केला पाहिजे. दहावीस वर्षे हा क्रम सुरू राहिला म्हणजे हिंदुस्थानामध्यें द्विजजाति नामशेष होईल हें ठरलेंच आहे; ह्याबद्दल कोणाला संशय घेण्यास जागा उरली असेल असें मला वाटत नाहीं असो तात्पर्य, इतकेंच कीं, **जन्मना जायते शूद्रः** ह्या वचनांतील शूद्रः शब्दाचा अर्थ शूद्रसमः—शूद्रसदृशः शूद्रतुल्यः श्रौतस्मार्तकर्मानधिकारी अशाच प्रकारचा कांहीं तरी केल्यावाचून गत्यतर नाहीं. आहार, निद्रा, भय व मैथुन हे चार धर्म मनुष्याचे ठिकाणीं व पशूचे ठिकाणींही सारखेच असतात, परंतु, ज्ञान हा धर्म मनुष्याचे ठिकाणीं विशेष असतो. म्हणून ज्यांना ज्ञान नाहीं ते पशु होत असें जरी कोठें सांगितलेलें असलें तरी ज्ञानहीनतेमुळें आलेलें पशुत्व आणि पशुजातीय मातापितरांपासून उत्पन्न झाल्यामुळें आलेलें पशुत्व हीं दोन्हीं एकच मानितां येणार नाहींत आणि ज्ञानहीन मनुष्यांनीं पड, कोंडा, आंबोण, वैरण वगैरेंवर उपजीविका करावी आणि वस्त्रपात्राची वगैरे यत्किंचितही गरज न बाळगितां त्यांनीं आपले दिवस कंठावे अशा प्रकारचा एक कायदा जर कांहीं आधुनिक लोक संमतिवयाच्या कायद्याप्रमाणें सरकाराला गळ घालून मागूं लागले आणि असा कायदा मागण्यास

**आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् । ज्ञानं हि तेषामधिको विशेषो ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ॥ येषां न विद्या न तपो न दानं ज्ञानं न शीलं**

न गुणो न धर्मः । ते मृत्युलोके भुवि भारभूता मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ॥ सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया । मनो न रमते यस्य स वै मुक्तोथ वा पशुः* ॥ साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः ।

अशा प्रकारचे जर जगी जगी आधार पुढे करूं लागले तर सारासार विचार पहाणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना ज्याप्रमाणे ही ह्याची मागणी कधींही मान्य होणार नाहीं त्याचप्रमाणें

जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।

ह्या व अशाच तऱ्हेच्या वचनाचा यथेष्ट अर्थ कल्पून द्विजांना आईकडून शूद्र ठरवूं पहाणाऱ्यांचें ह्मणणं समजस शूद्रांनाही ग्राह्य होणार नाहीं हें उघड आहे.

नाभिव्याहारयेद्ब्रह्म स्वधानिनयनादृते । शूद्रेण हि समस्तावद्यावद्वेदे न जायते ॥ १७२ ॥

असें मनुस्मृतींतील दुसऱ्या अध्यायांत वचन आहे ह्या वचनांत श्राद्धावाचून मृतपितृक अनुपनीत मुलानें वेदमंत्राचा उच्चार करूं नये असें सांगितलं आहे व तें सांगण्याला जोंपर्यंत ह्याचा वेदाध्ययनार्थ अवश्य असलेला वैदिक संस्कार झालेला नाहीं तोंपर्यंत हा शूद्रतुल्य असतो, असा हेतु दिलेला आहे. ह्या वचनांत शूद्रेण हि समः अशीं पदें स्पष्ट आहेत आणि हें समत्व वैदिक कर्मांचा अनधिकार इतक्याच मुद्यासंबधानें येथें विवक्षित आहे पित्याचें और्ध्वदेहिक संस्कार करण्याचा मुख्य अधिकारी पुत्र हाच होय; परंतु, पुत्र जर अनुपनीत असल तर पित्याचा संस्कार समंत्रक व्हावयाचा नाहीं आणि तो तर समंत्र होणें इष्ट आहे तेव्हां ती अडचण दूर होण्याकरितां धर्मशास्त्रानें ह्या ठिकाणीं वेदमंत्रोच्चारणाचीही अनुज्ञा श्राद्धादिकापुरतीच दिलेली आहे. मुलगा जर मुंज झालेला नसला तर और्ध्वदेहिक संस्कार करण्याचा मुख्य अधिकार त्याचा आहे असें समजून त्याला कडेवर घेऊनही त्याच्या पित्याचा और्ध्वदेहिक संस्कार करण्याची पाळी येत असते हें प्रसिद्धही आहे. सारांश, श्रौतादि कर्मांविषयींचा अनधिकार येवढ्याच मुद्यासंबधानें उपनयन संस्कार होईपर्यंत त्रैवर्णिकांना शूद्रतुल्यत्व सांगितलेलें आहे. ज्ञानराहित्य येवढ्याच मुद्यासंबधानें पशुतुल्य असलेल्या मनुष्यांना ज्याप्रमाणें गळ्यांत दावें अडकवून खुंट्याला बांधून ठेवणें रास्त होणार नाहीं. किंवा त्यांनीं वस्त्रपात्रवगैरे कांहीं एक न स्वीकारितां पेंड, कोंडा, वैरण, अंबोण वगैरेंवरच निर्वाह केला पाहिजे असा कायदा मागणें ज्याप्रमाणें रास्त होणार नाहीं, त्याचप्रमाणें श्रौतादिकर्मानधिकृतत्व येवढ्याच मुद्यासंबधानें शूद्रतुल्य असलेल्या त्रैवर्णिकांना इतर बाबतींतही तसें समजून त्यांच्या मातापितरांना उपजताक्षणीं त्यांचा त्याग करण्यास भाग पाडणें कधींही रास्त होणार नाहीं.

* या शेवटच्या शब्दांत पुच्छविषाणहीन किंवा समान वगैरे भावें पुढें कांहीं एक नसून केवळ शुद्ध विशेषणरहित पशु शब्दच आहे "

**स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां त्रयी न श्रुतिगोचरा ।**
**इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ॥**

हें वचन सुप्रसिद्ध आहे आणि ह्यांत स्त्री, शूद्र वगैरेंची गणना एकाच मालिकेंत केलेली आहे. शूद्र ह्या जातिबोधक शब्दांत शूद्रजातीय स्त्री आणि शूद्रजातीय पुरुष ह्या दोहोंचा अंतर्भाव होत असूनही ज्याअर्थी स्त्री हें पद समासामध्यें वगळें आहे त्याअर्थी स्त्री ह्या पदाचा अर्थ द्विजस्त्री असाच घेतला पाहिजे

**नास्ति स्त्रीणां क्रिया मन्त्रैरिति धर्मे व्यवस्थितिः । निरिन्द्रिया ह्यमन्त्राश्च स्त्रियोनृतमिति स्थितिः ॥ १८ ॥**

असें वचन मनुस्मृतींतील नवव्या अध्यायांत आहे व ह्यांत स्त्रियांना वेदाचा अधिकार नाहीं असें सांगितलेलें आहे ह्या ठिकाणचें स्त्री हें पद अविवाहित आणि विवाहित अशा सर्व स्त्रियांबद्दल आहे व त्याचप्रमाणें **स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां** ह्या वचनांतीलही स्त्रीपद अविवाहित व विवाहित अशा सर्व स्त्रियांकरितां आहे आणि पूर्ण द्विजत्व समन्त्रक उपनयन संस्कारावाचून यण्याचा संभव नसून स्त्रियांना तर मन्त्राचा अधिकार नाहीं हें ह्या व दुसऱ्याही अनेक वचनांवरून सिद्ध आहे. तेव्हां वैदिककर्माचा स्वतंत्र अधिकार प्राप्त करून देणारें पूर्ण द्विजत्व स्त्रियांचे ठिकाणीं कधींच येत नसल्यामुळें स्वतंत्र रीतीनें श्रौतकर्मानाधिकृतत्व ह्या नात्यानें त्यांचे ठिकाणीं शूद्रत्वही शेवटपर्यंत कायम रहाणारच परंतु, श्रौतकर्मानधिकृतत्व एवढ्याच पुरतें शूद्रत्व कायम राहिलेल्या स्त्रियांचे ठिकाणीं पतीपासून उत्पन्न झालेली संतति मातेच्या नात्यानें शूद्र ठरणार नाहीं, व अमुक एका स्त्रीची मुंज विवाहापूर्वी झाली होती असें एकही उदाहरण ह्या व्याख्यात्यानीं दिलेलें नाहीं. तेव्हां धर्मशास्त्राचा यत्किंचितही विचार न करितां नुसते तर्कच जर लढवावयाचे असतील तर " बायकांनीं संन्यास घेणें वाजवी कीं गैर वाजवी ? बायकाचा संन्यास सशास्त्र कीं अशास्त्र ? " अशा प्रकारचेही आणखी हवे तितके प्रश्न करितां येतील. असो. व्याख्यात्यांनीं बायकांची मुंज झाल्याचें उदाहरण एकही दिलेलें नाहीं; परंतु, " बायकांची सोडमुंज उघड उघड होत होती. " असें एक विधान ठोकून देऊन " स्त्रियांची मुंजच जर होत नसती तर सोडमुंजीचा प्रसंग त्यांच्यावर न कोसळता " असें एक अनुमान स्त्रियांची मुंज होत होती ह्याला त्यांनीं काढिलें आहे; आणि धर्मशास्त्रोदधीचें मथन करून लाधलेल्या ह्या शोधामृतपानानें आपल्या विचारांना अमरत्व प्राप्त झालें अशी कल्पना करूनच कीं काय कोण जाणें " जे ब्राह्मण ह्मणविणार आज स्त्रियांची मुंज लावण्यास तयार नसतील ते ब्राह्मणी शास्त्राचा उच्छेद करण्यासाठीं जन्मलेल्या असुरांपैकीं किंवा राक्षसांपैकीं मानिल्या—ह्मटल्या—स अतिशयोक्तीचा आरोप येईल काय ? ब्राह्मणपणा शास्त्राच्या बलावर आहे; जर ब्राह्मणपणा हवा तर शास्त्र अवश्यमेव हवें. स्त्रियांची मुंज करण्यास जे तयार नाहींत, त्यांस शास्त्राचा वीट उघड आलेला आहे. ज्यांस ह्याप्रमाणें शास्त्राचा वीट उघड आलेला आहे ते ब्राह्मणपणास वीटल्यासारिखे झालेले नव्हत

काय ?" अशा रीतीने बिचाऱ्या ब्राह्मणावर पुढ त्यांनीं एकसारखा भडिमार केलेला आहे. तेव्हा ह्या भडिमाराचा आतां विचार करू.

प्रथमतः रामनवमी, जन्माष्टमी, मंगलागौरी, दसरा, दिवाळी वगैरेंना "ब्राह्मणीधर्माच्या इलाख्यांतून" हुसकून लाविल्यानंतर व्याख्यात्यानीं आपण होऊन आजच्या ब्राह्मण म्हणविणाऱ्या समुदायाला "श्रुतिस्मृतींची आठवण करून" देण्याचें "अगदी अवश्यक" काम आपले हातीं घेतलें आहे आणि "तूर्त विचार इतकाच करावयाचा कीं, बायकांच्या मुंजीस श्रुतिस्मृतींचा आधार आहे किंवा नाहीं; जर श्रुतिस्मृतींचा आधार असला, तर बायकांची मुंज निभ्रांत सशास्त्र झाली." असें म्हणून बायकांच्या मुंजीला श्रुतिस्मृतींचे आधार आतां आपल्याला थोडक्याच वेळांत मिळणार अशा प्रकारची आपल्या श्रोत्यांना अथवा वाचकांना मोठी आशा लावून ठेविली आहे; परंतु, पुढ ह्या आशेची सफलता अंशतः सुद्धा व्याख्यात्यानीं केलेली नसून सर्वस्वीं तिचा भंगच केलेला आहे, इतकेंच नव्हे, परंतु, ह्यासंबंधानं त्यानीं आपल्या कंपूतील मंडळीला "चुरमुरेच भाजीत" बसवून आयुष्याचे दिवस कंठण्याची पाळी आणिली आहे. श्रुतिस्मृतींचे आधार देण्याचा विडा उचलल्यानंतर व्याख्यात आपल्या अपूर्व ज्ञानसंग्रहालयातील श्रुतीचे कपाट धुंडाळूं लागले, परंतु, त्यांत त्यांची पुनराशा झाल्यामुळे शेवटीं त्यानीं "एक लहानशीच प्रस्तावना" करण्याची जरूर दर्शवून ह्या छोटेखानी प्रस्तावनेंत श्रौत व स्मार्त धर्माची आपल्या समजुतीप्रमाणे व्याख्या केल्यानंतर एकंदर त्या प्रस्तावनेचा निष्कर्ष, 'मुंज ज्यापक्षीं स्मार्त धर्मापैकीं आहे, त्यापक्षीं त्याचें शास्त्र स्मृतींतच हुडकल्यास सापडेल; कितीही हुडकलें तरी तें श्रुतींत सांपडणे नाहीं." असा काढिला आहे आणि मुंजीसंबंधानंही श्रुतीच्या आधाराबद्दल व्याख्यात्यानीं आपल्या वाचकांस निराश केलें आहे; परंतु निदान त्रैवर्णिकांतील पुरुषाच्या मुंजीसंबंधानें तरी श्रुतीच्या आधाराविषयीं व्याख्यात्यानीं आणि त्यांच्या कंपूतील आधुनिकांनीं निराश होऊं नये. कारण,

**अष्टवर्षं ब्राह्मणमुपनयीत तमध्यापयीत ।**

अशी श्रुति आहे आणि ह्या श्रुतीमध्यें अध्ययनविधि मुख्य मानावयाचा किंवा अध्यापनविधि मुख्य मानावयाचा ह्यासंबंधानें भट्ट आणि प्रभाकर ह्या मीमांसकांचा मोठा कडाक्याचा वाद आहे ही श्रुति प्रायः प्रत्येक मीमांसाग्रंथांत घेतलेली असून **पराशरमाधव**-प्रभृति धर्मशास्त्रग्रंथांतही घेतलेली आहे. तेव्हा "मुंजीचे शास्त्र कितीही हुडकलें तरी तें श्रुतींत सापडणे नाहीं" हे व्याख्यात्याचें निभ्रांत विधान त्याच्या समजुतीप्रमाणें जरी खरें असलें तरी विद्वज्जनांना तें कधीं मान्य होणार नाहीं ह्या प्रस्तावनेमध्यें "स्मार्त धर्माचें विधान स्मृतींत सापडणें नाहीं, श्रौतधर्माचें विधान स्मृतींत सापडणे नाहीं" वगैरे प्रकारचीं जीं विधानें केलेलीं आहेत तींही मुंजीच्या आधारासंबंधानें केलेल्या विधानाच्याच किंमतीचीं आहेत

श्रुतिप्रमाणामबधानें वाचकाची निराशा केल्यानंतर व्याख्यात्यांनीं वाचकाच्या मुजीचें शास्त्र " स्मृतींतच हुडकल्यास सापडेल " असे आपल्या वाचकांना आश्वासन दिलें आहे परंतु, त्यांतही ह्यांनीं वाचकाची निराशाच केली आहे समावर्तनप्रकरण चालले असताना **आश्वलायनगृह्यसूत्रामध्यें** सोडमुंज ज्याची व्हावयाची त्या त्रैवर्णिकानीं कुंकुमादि अनुलेपन प्रथम शरीराच्या कोणत्या भागाला लावावें हें सांगितलें असून प्रसंगोपात्त स्त्रीप्रभृतींनी अनुलेपन करण्याचा प्रसंग आला असता प्रथम आपल्या शरीराच्या कोणत्या भागाला करावें ह्याचा उल्लेख केलेला आहे.

**अनुलेपनेन पाणी प्रलिप्य मुखमग्रे ब्राह्मणोनुलिम्पेद्बाहू राजन्य उदरं वैश्य उपस्थं स्त्री ऊरू सरणजीविनः ।**

असें आश्वलायनगृह्यसूत्रातील तिसऱ्या अध्यायाच्या आठव्या खंडात सांगितलें असून त्याचा अर्थ " अनुलेपनद्रव्य दोन्ही हातांना लावून ब्राह्मणानें प्रथम मुखाला लावावें, क्षत्रियानें बाहूंना लावावें, वैश्यानें उदराला लावावें, स्त्रीनें प्रजोत्पत्तिस्थानाला लावावें आणि सरणजीवीनीं मांड्यांना लावावें " असा आहे ह्यांत प्रसंगोपात्त स्त्रीनेंही कधीं वेळ पडली असता अनुलेपन प्रथम शरीराच्या कोणत्या भागाला लावावें ह्याचा उल्लेख केलेला आहे तेव्हा समावर्तनप्रकरण सुरू असताना त्यांत स्त्रीच्या अनुलेपनाचा जर संबंध आलेला आहे तर " तिच्यावर सोडमुंजीचा प्रसंग कोसळून पडला असल्याचें सिद्ध होत असून सोडमुंजीचे पूर्वी होणारी मुंज तर तिला अवश्य असल्याचें अर्थातच सिद्ध होत आहे " अशा अर्थाचें ' परिपक्व विचारानीं " भरलेलें एक अनुमान ह्या व्याख्यात्यानीं काढिलें आहे. तेव्हा हें अनुमान कितपत योग्य ठरतें ते पाहू.

अनुलेपनासंबंधानें गृह्यसूत्रात उक्त असलेलें हें विधान केवळ समावर्तनापुरतेंच नसून सार्वत्रिक आहे असें गृह्यसूत्रावरील वृत्तिकारानीं आपल्या वृत्तीत स्पष्ट लिहिलें आहे आणि असें लिहिण्याला " समावर्तनाशीं संबंध नसलेल्या स्त्रीचेंही विधान ह्या ठिकाणीं केलें आहे " हा हेतु दिला आहे. परंतु, ह्या व्याख्यात्यांना सरणजीवी ह्या शब्दाच्या अर्थाला मात्र टीकाकाराची मदत घ्यावयाची असून "**अयं विधिः सार्वत्रिकः । कुतः । स्त्रीविधानात्**" ह्या वृत्तिकाराच्या ह्मणण्याकडे डोळेझांकच करावयाची आहे! आता वृत्तिकाराचें ह्मणणें चकीचें असेल असें समजून व्याख्यात्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें आहे आणि वाचकावर " सोड मुंजीचा प्रसंग कोसळलेला आहे " हेंच त्याचें ह्मणणें कशावरून खरें नाहीं? असा एक प्रश्न ह्या व्याख्यात्यांच्या कंपूतील लोकांकडून येण्याचा संभव आहे. त्याचाही विचार आपणाला केला पाहिजे व्याख्यात्यांच्या मतानें ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या वर्णांतील स्त्रिया विसावें, तविसावें आणि चोविसावें वर्षी सोडमुंजीला योग्य होत असल्याचें दिसत आहे. समावर्तनाचें विधान सांगण्यापूर्वी आश्वलायनमुनींनीं समावर्तनसंस्काराला अवश्य लागणारें साहित्य सांगितलें आहे तें येणें प्रमाणेः—

गळ्यामध्यें बांधण्याकरितां एक मणि, कुडक्या, दोन वस्त्रें, एक छत्र, जोडा, काठी, माळ मर्दनद्रव्य, उटी, काजळ आणि पागोटें इतकें साहित्य अवश्य सांगितल्यानंतर संस्कार-विधानाला आरंभ करून प्रथमतः **गोदान-कर्म** करावें असें सांगितलें आहे आणि **गोदानकर्मामध्यें वपन** सांगितलें असून **मिशा काढाव्या** असेंही विशेष सांगितलेलें आहे

**केशशब्दे तु श्मश्रुशब्दान्कारयेत् । श्मश्रूणीहोन्दन्ति ।** ( दाढी मिशांना पाणी लावावें ) **केशश्मश्रुलोमनखान्युदककर्मस्थानि संप्रेष्यति ।**

( डोक्यावरील केश, दाढी, मिशा वगैरे उदकस्थ काढ असें न्हाव्याला सांगावें ) असा विधि गोदानकर्मामध्यें आश्वलायन मुनींनीं सांगितला आहे आणि तो सर्व समावर्तन संस्कारामध्यें अवश्य आहे असें सांगून तो अवश्यक विधि झाल्यानंतर अवशिष्ट राहिलेला समावर्तनविधि सांगितलेला आहे.या सामानांत फक्त दोन वस्त्रेंच सांगितलेलीं आहेत; चोळी वगैरे सांगितलेली नाहीं. सोडमुंज होणाऱ्या त्रैवर्णिकांतील मुलींचें वय २०, २३ आणि २४ वर्षांपेक्षां कमी नाहीं हें तर ह्या व्याख्यात्याच्या मतानेंच ठरलेलें आहे. तव्हां ह्या व्याख्यात्याच्या व त्याच्या अनुयायांच्या मुलींवर व्याख्यात्याच्या मताप्रमाणें सोडमुंजीचा प्रसंग कोसळला ह्मणजे त्या प्रसंगाचे वेळीं त्याचें जें स्वरूप बनेल तें जगताच्या उत्पत्तीपासून प्रायः आजपर्यंत कोणाच्याही पहाण्यांत न आलेलें असेंच बनेल. जातीनें स्त्री, वय रजोदर्शन होऊन १० अथवा १२ वर्षें झालेलें, चोळी मुळींच नसून फक्त दोन वस्त्रें, डोळ्यांत काजळ, अंगाला केशराची वगैरे उटी, गळ्यामध्यें एक पुष्पाचा हार व चंदनाच्या अगर बोरीच्या लाकडाचा मणि, कुंकुमरहित कपाळ, एका हातांत छत्री, दुसऱ्या हातांत कळकाचा सोटा,पायांत जोडा,केशरहित मस्तक व त्याच्यावर पागोटें, दाढी, मिशा अवश्य काढिल्याच पाहिजेत असें आश्वलायन मुनि ह्मणतात तें त्याचें ह्मणणें कसें काय सिद्धीस जाणार हा एक प्रश्न वेगळाच आहे. आपल्या मुलींच्या सोडमुंजी व्याख्यात्यानीं व त्यांच्या अनुयायांनीं करण्याचें ठरविलें तरी अशा रीतीनें बनणाऱ्या ह्या स्वरूपाचा उल्लेख करणेंही खरोखर अत्यंत असभ्यपणाचें आहे ; परंतु, आश्वलायनगृह्यसूत्रांतील अनुलेपनावरून बायकांच्या मुंजींचा नवीन शोध लावणाऱ्या आणि हा असला अपूर्व शोध लाविल्याबद्दल स्वतःला कृतकृत्य समजून बिचाऱ्या एकूण एक ब्राह्मणावर अपशब्दांचा वर्षाव करणाऱ्या ह्या व्याख्यात्याच्या अक्कलहुषारीची व विचाराच्या परिपक्वपणाची मजल कोठपर्यंत गेली आहे हें स्पष्टपणें सभ्य गृहस्थांच्या नजरसमोर आणून देण्याकरितां **यथा यक्षस्तथा बलिः** ह्या न्यायानें माझ्या हातून सभ्यतेला अनुसरून नसलेलें जें हें वर्तन झालें आहे त्याबद्दल मला क्षमा व्हावी असें माझें श्रोतृवृंदापाशीं पदर पसरून मागणें आहे असो ह्याप्रमाणें व्याख्यात्यांच्या ह्या मौंजीबंधनविषयक प्रकारणांतील

मुख्य मुख्य सवालांची वासलात लागली ह्या सदराखालीं अशाच प्रकारचीं आणखी काहीं विधानें आहेत त्याचीही वाट थोडक्यात लावून दाखवितो. " गृह्यसूत्रें कलियुगातल्या लोकासाठीं रचलेलीं आहेत, हीं सूत्र द्वापर किंवा त्रेता किंवा कृत ह्या युगातल्या लोकासाठीं नव्हत. " असें एक विधान ह्यानीं केलें आहे. परंतु, तें करण्याला प्रमाण काहीं एक दिलेलें नाहीं तथापि स्मार्तधर्म कलियुगासाठींच आहे व गृह्यसूत्रें हेच स्मार्तधर्माचें शास्त्र आहे असा ह्यानीं 'परिपक्व' विचाराअतीं एक सिद्धात ठोकून दिला असल्यामुळें आणि स्मार्त धर्माचे शास्त्र कितीही हुडकलें तरी श्रुतींत सापडणे नाहीं असाही परिपक्व विचाराचा महापूर आलेल्या ह्या व्याख्यानात त्यानीं एक शातपणें सिद्धात काढिला असल्यामुळे कलियुगाचा वेदाशीं काहीं एक संबंध नाहीं असे ह्यानीं गृहीत धरल्यासारिखें दिसतें तें निव्वळ चुकीचें आहे. आश्वलायनप्रभृति गृह्यसूत्रकार असोत किंवा मन्वादिप्रभृति स्मृतिकार असोत त्यानीं आपआपल्या सूत्रातून अथवा स्मृतींतून आपल्या पदरचें काहीं एक सागितलेलें नाहीं. मनुस्मृतींत जे धर्म सागितलेले आहेत ते सर्व वेदामध्यें आहेत ह्मणून सागितलेले आहेत.

**यः कश्चित्कस्यचिद्धर्मो मनुना परिकीर्तितः।**
**स सर्वोभिहितो वेदे सर्वज्ञानमयो हि सः ॥**

असें मनुस्मृतींत सागितलें आहे व त्याचा अर्थ—जो काहीं कोणाचा धर्म ह्मणून मनूनीं सागितलेला आहे तो सर्व वेदामध्ये सागितलेलाच आहे आणि वेदामध्यें सागितलेला आहे ह्मणूनच सर्वज्ञ मनूने तो लोकहितार्थ ग्रथित करून ठेविलेला आहे—असा आहे. मनुस्मृति ह्मणून जे धर्मशास्त्र आहे ते प्रथम सर्ववेदार्थवेत्त्या ब्रह्मदेवानें ग्रथित करून तें मनूला यथाविधि पढविलें, मनूनें मरीचिप्रभृति मुनींना पढविलें आणि त्या मुनींपैकीच एका भृगुमहर्षीनीं तें इतर महर्षींना कथन केलें. ब्रह्मदेवानें जे हें शास्त्र वेदाला अनुसरून केलें होतें तें मूळ एक लक्ष होतें, परतु, इतक्या ग्रथाचें अध्ययन सामान्य लोकाकडून होणें अशक्य आहे असें समजून मनूनीं तेंच थोडक्यात आणिलें. अशी ह्या मानवशास्त्राची पीठिका आहे आणि **शतसाहस्रोऽयं ग्रन्थः।** ( हा ग्रथ मूळामध्ये एक लक्ष आहे ) असें नारदमुनींनींही आपल्या स्मृतीमध्यें लिहून ठविलें आहे कृत, त्रेत, द्वापर आणि कलि ह्याचीं नावें **ऋक्, यजु, साम,** आणि **अथर्व** ह्या चारी वेदात असून **मनु, व्यास, पराशर, असित, देवल इत्यादि स्मृतिप्रणेत्यांचा उल्लेखही वेदामध्यें केलेला आहे.** इतकेंच नव्हे, परत, **धर्मशास्त्रप्रणेता ह्या नात्यानें मनूची वेदामध्यें प्रशंसा केलेली आहे** हें मी आरभीं धर्मशास्त्र ह्मणजे काय हें सागताना दर्शविलेंच आहे; आणि **महाभारताचा** ज्याप्रमाणें आश्वलायनगृह्यसूत्रात उल्लेख आहे त्याचप्रमाणें वेदातही इतिहास व पुराण याचा उल्लेख असल्याचें मीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. तेव्हा " रामनवमी, जन्माष्टमी, दसरा, दिवाळी, शिमगा वगैरेंचा इलाखा श्रौत किंवा स्मार्त खचित नव्हे " असें जें ह्या व्याख्या-

त्यांनीं विधान केलें आहे तें निवळ धाडसाचें आहे **कृष्णाय देवकीपुत्राय** असा उल्लेख श्रीशंकराचार्यांचीं ज्या उपनिषदांवर भाष्यें आहेत त्यांपैकींच एका उपनिषदामध्यें आहे आणि रामनवमी, जन्माष्टमी वगैरेंनाही श्रुति प्रमाण आहेत; इतकेंच नव्हे; परंतु, व्याख्यात्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें शिमग्याचा जो उल्लेख धर्मबाह्य ह्मणून केलेला आहे तोही चुकीचाच आहे. कारण, वेदवाक्याचा यथार्थ विचार होण्याकरितां जैमिनिमहर्षींनीं सुमारें एक हजार अधिकरणांचें जें मीमांसा-शास्त्र ग्रथित करून ठेविलें आहे त्या मीमांसा-शास्त्रांतील एका अधिकरणांत होळीसंबधानें निर्णय केलेला आहे. तेव्हां गृह्यसूत्रें कलियुगांतल्याच लोकांसाठीं वगैरे प्रकारचीं जीं ह्यानीं विधानें केलेलीं आहेत तीं निव्वळ धाडसाचीं व खोटीं आहेत हें मी स्पष्ट सांगून ठेवितों. कांहीं कांहीं सूत्रग्रंथ प्रथम श्रौतसूत्र व नंतर गृह्यसूत्र अशा क्रमानें आहेत परंतु, कांहीं सूत्रग्रंथांत प्रथम श्रौतकर्मविधान व नंतर गृह्यकर्मविधान असें केलेलें नाहीं. उदाहरणार्थ— सत्याषाढ-मुनिप्रणीत जें हिरण्यकेशीसूत्र आहे त्यांतील पहिल्या अठरा अध्यायांत वैतानाग्निसाध्य कर्मांचें अनुष्ठान सांगितलें असून १९ व २० ह्या अध्यायांत गृह्याग्निसाध्य कर्मांचें अनुष्ठान सांगितलेलें आहे आणि ह्यानंतरच्या अध्यायांत पुनरपि वैतानाग्निसाध्य कर्मांचें अनुष्ठान सांगितलेलें आहे " अग्निहोत्रादि कर्में कलियुगामध्यें प्रत्यक्षास करतां येण्यासारिखीं नाहींत ह्मणून निव्वळ कलियुगासाठीं विवाहाग्नीची मागून योजना करण्यांत आली " अशा प्रकारचीं जीं कांहीं विधानें ह्या व्याख्यात्यांनीं केलीं आहेत तीं निव्वळ अज्ञानमूलक बडबड आहे असें कोठेंही सांगण्यास व सिद्ध करून देण्यास मला यत्किंचितही हरकत येईलसें वाटत नाहीं. **जातपुत्रःकृष्णकेशोऽग्नीनादधीत** ह्या श्रुतीमध्यें पुत्रोत्पत्ति झाल्यानंतर कृष्णकेश असतांनाच पुरुषानें अग्निहोत्र घ्यावें असें सांगितलें आहे आणि अग्निहोत्रादि कर्मांना आधारभूत जे गार्हपत्य-प्रभृति तीन अग्नि त्यांच्या उत्पत्तीला विवाहाग्नीचीच अवश्यकता आहे ही गोष्ट साधारण शांतिरस्तु पुष्टिरस्तु करणाऱ्या सामान्य भिक्षुकालाही पक्की माहित आहे. कोणत्याही कर्माचें विधान करण्याचा अधिकार **सत्याषाढ, आश्वलायन** वगैरे सूत्रकार मुनींचाही नाहीं व **मनु, पराशर, व्यास** वगैरे स्मृतिग्रथनकर्त्या महर्षींचाही नाहीं. **सत्याषाढ**प्रभृति सूत्रकारानीं वेदविहित कर्मांच्या अनुष्ठानाची पद्धति मात्र आपआपल्या सूत्रांतून दर्शविली आहे. सारांश, वेदविहित कर्मांचें अनुष्ठान अमुक अमुक रीतीनें करावें येवढें मात्र सूत्रकारानीं दर्शविलें आहे; कोणत्याही अपूर्व कर्मांचें विधान त्यांनीं केलेलें नाहीं. ह्यांच्या सूत्रांतून **कुर्यात्, क्रियेत, कर्तव्यम्, भवेत्, स्यात्** वगैरे विधिबोधक पदांनीं युक्त जीं विधिवाक्यें आहेत तीं निवळ त्यांच्या पदरची नाहींत. असल्या प्रत्येक विधिवाक्याला वेदाचा आधार आहे असो. ह्यामुद्यासंबधानें आणखी बऱ्याच गोष्टी सांगण्यासारख्या आहेत; तथापि ज्या सांगितल्या आहेत त्यावरून गृह्य-सूत्रप्रभृतिसंबधानें व्याख्यात्यांनीं केलेलीं वि-

यानें निव्वळ अज्ञानमूलक व धाष्टर्याची आहेत हे कोणाही समजस धर्मशील गृहस्थास पुरें पुरें कळून येण्याचा संभव असल्यामुळे तूर्त ह्या मुद्यासंबंधानें जास्त वाटाघाट करण्याचें कारण मला दिसत नाहीं.

**वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः । पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्निपरिक्रिया ॥ ६७ ॥ अ० २॥** हे मनुस्मृतींतील वचन हिंडता हिंडता व्याख्यात्याना कोठें तरी आढळलें असावें असा रंग दिसतो. कारण, " कदाचित् कोणी आक्षेप घेईल कीं, कोणत्याशा ग्रथकारानें लग्नच मुंजीचे ठिकाणीं मानिलें आहे; लग्न झाल्यानें मुंज झाल्यासारिखी झाली. " असा एक प्रतिपक्षाकडून ह्याच्या समजुतीप्रमाणें संभवनीय असलेला आक्षेप ह्यानीं घेतला असून त्याचें निराकरण आपल्या " परिपक्व विचारानीं ओतप्रोत भरलेल्या " तर्कानें ह्यानीं केलें आहे. व्याख्यातें ह्मणतात " यास शास्त्राच्या वाटेनें उजू जबाब इतकाच कीं, ज्या शाखेचा तो ग्रथकार असेल त्या शाखेस त्या ग्रथकाराचें ह्मणणें मान्य होईल; परशाखेस तें ह्मणणें मान्य होण्याचा संभव नाहीं, मान्य करण्याची जरूरीही नाहीं. " शाबास ! कोणाचीच कोणाला जर अपेक्षा नव्हती तर सर्वसामान्य ह्मणून मन्वादि महर्षींनीं मोठमोठ्या स्मृति ग्रथन करून ठेवण्यात निव्वळ काळाचा अपव्ययच केला असें ह्या व्याख्यात्याच्या मतानें ठरलें वाः ! उत्तम !! ज्या आश्वलायनमुनींचा ह्या व्याख्यात्यानीं उल्लेख केलेला आहे त्या आश्वलायनमुनींच्याच गृह्यपरिशिष्टात मन्वादि धर्मशास्त्रावर हवाला दिलेला आहे आणि गृह्यसूत्रातही ठिकठिकाणी दुसऱ्याचीं मतें घतलेलीं आहेत येवढें देखील ह्या आश्वलायनशाखीय द्विजकुलोत्पन्न व्याख्यात्याना ठाऊक नसावें ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. कोणत्याही कर्मासंबधानें एका शाखेची जर दुसऱ्या शाखेला गरज नसती तर वदवाक्याचा विचार करण्याकरितां जैमिनीमहर्षींनीं ग्रथित करून ठेविलेल्या मीमासाशास्त्रात **सर्वशाखाप्रत्ययमेकं कर्म** हा सिद्धात दर्शविणारें जें एक २५ सूत्रांचें जंगी अधिकरण मीमांसेंतील दुसऱ्या अध्यायाच्या चवथ्या पादात लिहून ठेविलें आहे तें लिहून ठेविण्याचें त्यांना काहीं एक कारण नव्हतें आणि शाखातरीयगुणोपसहारन्यायाचा आपल्या भाष्यात अनेक वेळा उल्लेख करण्याचें आचार्यांसारख्यानाही काही कारण पडलें नसतें. असो. मौंजीबधनविषयक आपल्या अपूर्व शोधाला मनुस्मृतीची आडकाठी येईल असें आढळून आल्यावर व्याख्यात्यानीं निव्वळ कल्पनेच्या जोरावर वर दर्शविल्याप्रमाणें त्याची वाट लाविली असून " वरील मनुवचन प्रमाणभूत मानण्याचें कारणही नाहीं; कारण, श्लोकात्मक स्मृतीची मातब्बरी नाही. " अशा प्रकारचेंही आपलें मत ठोकून देऊन यथेष्ट वर्तनाला आड येऊ लागल्यामुळे डोळ्यात सलू लागलेली ही मनुस्मृति ह्यानीं अजीबात झुगारून दिली आहे आणि " स्मृतीपेक्षा गृह्यसूत्राची मातब्बरी जास्त. " असें ह्मणून " मानवगृह्यसूत्र उपलब्ध आहेसें

वाटत नाहीं." असेंही आपलें मत देऊन टाकिलें आहे; परंतु, ह्या व्याख्यात्याच्या वाटण्यावरच वस्तुस्थिति अवलंबून असली पाहिजे असा काहीं सृष्टीचा नियम ठरलेला नाहीं. अध्ययनात काळ न घालविता मुखमस्तीति वक्तव्यम् ह्या न्यायानें धर्मशील हिंदुसमाजावर वाटेल तसे तोंड सोडण्यात ज्याच्या आयुष्याचे दिवस गेले आहेत व जात आहेत त्याना मानवगृह्यसूत्र उपलब्ध का व्हावें? आणि आश्वलायनगृह्यसूत्र तरी का समजावें? सूत्र वगैरे उपलब्ध करून व समजून घेण्याचे मार्ग वेगळे आहेत. ती समजून घेण्याला एकनिष्ठपणानें काहीं आयुष्य खर्च करावें लागतें आणि नेहमीं थोडा बहुत तरी व्यासंग करावा लागतो. धर्मशास्त्र समजून घेण्याचा उद्देश न धरितां यथेष्ट वर्तनाला आडकाठी होत असल्यामुळें काट्याप्रमाणें डोळ्यात सलणाऱ्या धर्माभिमानी लोकांवर कसें बसें तोंड सोडितां यावें येवढ्याच उद्देशानें मोडकीं तोडकीं काहीं वचनें हातीं लागतील तशीं गाळाकरून सर्वज्ञतेची घमेंड मारू पहाणाऱ्याला काहीं एक खरें खरें उपलब्ध होण्याचा अगर खरें खरें समजण्याचा मुळींच संभव नाहीं.

**मानवगृह्यसूत्र उपलब्ध आहे** व तें छापलेलेंही आहे तें कदाचित् येथेंही कोठें मिळेल; परंतु अमुकच ठिकाणीं मिळेल असें जर नक्की समजण्याची कोणाला अवश्यकता असेल तर बडोदें मुक्कामीं सयाजीरावमहाराज गायकवाड यांच्या जुन्या वाड्यांत दुसऱ्या मजल्यावर सेंट्रल लायब्ररी म्हणून एक पुस्तकालय आहे त्या पुस्तकालयात गृह्यसूत्रासह सर्व मानवसूत्रांचें एक पुस्तक पोथीच्या आकाराचें देवनागरी लिपींत छापिल्याचें सुमार पांच सहा वर्षांपूर्वी माझ्या पाहण्यात आलें आहे.

"मनुस्मृतीसंबंधानें वाटाघाट करण्याकरितां सुधारक वगैरे पत्रकर्त्यांनीं जागा देण्याचें कबूल केल्यास, ती भरून काढणारीं माणसें मराठी मुलुखात आज मुळींच सापडणार नाहींतशीं नाहीत" इतकेंच ह्या विषयासंबंधानें व्याख्यात्यांनीं आपल्या श्रोत्याना व वाचकाना आश्वासन देऊन ठेविलें आहे, तें अगदीं बरोबर आहे कारण, व्यासंग वगैरे करण्याच्या खटपटींत यत्किंचितही न पडतां **उपनिषदांची मीमांसा** ह्या नांवाखालीं असंबद्ध मजकुरानें ओतप्रोत भरलेलीं एतरेयउपनिषद् वगैरे पुस्तकें निरपेक्ष बुद्धीनें तयार करणारी मंडळी आणि त्याचप्रमाणें कागद, छपाई वगैरेला लागणाऱ्या किंमतीच्या शतांशालाही पात्र नसलेल्या मजकुरानें भरलेलीं तीं पुस्तकें छापून काढणारी मंडळीही जर खुद्द मुंबईमध्येंच आहेत तर व्याख्यात्यांनीं देऊन ठेविलेल्या ह्या आश्वासनासंबंधानें तरी निदान त्याच्या श्रद्धालु श्रोत्यानीं निराश होण्याचें कारण नाहीं; इतकेंच ह्या विषयासंबंधानें मीही सांगून ठेवितों आणि त्यांच्याचप्रमाणें मीही आता '**चातुर्वर्ण्य**' ह्या त्याच्या तिसऱ्या विषयाकडे वळतों.

**पूर्वार्ध समाप्त.**

॥ श्रीः ॥

# भारतीय व्याख्यानमाला, मुंबई.

व्याख्यान पहिलें.

उत्तरार्ध.

( मुंबई येथील हेमंतोत्सवव्याख्यानमालेच्या पहिल्या व्याख्यानांत ब्राह्मणांना झालेल्या )

# सवालांस सप्रमाण उत्तर.

उत्तर देणार

काशीनाथ वामन [illegible]ले.

३ चातुर्वर्ण्य. ४ गणाना त्वा.
५ अष्टका ६ ब्राह्मण

मोदवृत्त छापखाना वाई.

जानेवारी १८९९

किंमत दोन आणे.

# रामायण, गीता व भारत.

**मोदवृत्त:**—ह्या साप्ताहिक पत्रांत राजकीय व धार्मिक विषय येत असून ग्राहकांना श्रीवाल्मीकिरामायण व सुश्रुत हे ग्रंथ भाषांतरासह ( दोन्ही मिळून प्रतिवर्षी सुमारें ८०० पृष्ठें मोहोरेदार कागदांवर छापिलेलीं ) मिळत असतात. ह्या ८०० पृष्ठांसह पत्राची वर्षाची अगाऊ वर्गणी फक्त दोन रुपये असून परगांवच्या ग्राहकांना टपाल हंशील रीतीप्रमाणें वेगळें द्यावें लागतें. आजपर्यंत श्रीवाल्मीकिरामायणापैकीं बालकांड, अयोध्याकांड व अरण्यकांड हीं तीन प्रकरणें संपून चवथें सुरू आहे.

---

**आर्यधर्मरहस्य:**—ह्या डेमी अष्टपत्री ४० पृष्ठांच्या मासिकपुस्तकांत भगवद्गीता येत असते. प्रथमतः गीतेंतील श्लोक; नंतर त्या श्लोकाचें सरळ व सुबोधक मराठी भाषांतर; गीतेवरील संस्कृत व प्राकृत अद्वैतपंथी टीकांना मुख्य आधारभूत असलेलें श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य; नंतर सदर्हू भाष्याचें सरळ व सुबोध भाषांतर; स्थलविशेषीं भाष्याचें स्पष्टीकरण आणि भाष्याला धरून नसलेल्या गीतेवरील अद्वैतपंथी टीकांचा युक्तायुक्त विचार; येणेंप्रमाणें विषयांचा क्रम ठेविला आहे. मासिक पुस्तकाचें पहिलें वर्ष संपूर्ण होऊन दुसऱ्या वर्षाचे ३ अंक प्रसिद्ध झाले आहेत. वर्षाची अगाऊ वर्गणी ट० हं० सह २८६ आहे.

---

**आर्यधर्मदर्पण:**—उत्तम मोहोरेदार कागदावर नियमितपणें प्रसिद्ध होत असलेल्या ह्या रॉयल अष्टपत्री ४८ पृष्ठांच्या मासिक पुस्तकांत ज्ञानाचें अनादि भांडार ह्मणून मशहूर असलेलें श्रीमहाभारत, अध्यात्मविषयक ग्रंथांपैकीं प्रमुख योगवासिष्ठ आणि धर्मशास्त्रविषयक ग्रंथांचें शिरोभागीं असलेला पराशरमाधव हे ग्रंथ सरळ व सुबोध मराठी भाषांतरासह प्रसिद्ध होत असतात. मासिक पुस्तक सुरू झाल्यास ४ वर्षें संपूर्ण होऊन पांचवें चालू आहे. इतक्या अवधींत श्रीमहाभारतांतील आदिपर्व व सभापर्व हीं दोन पर्वें संपूर्ण झालीं असून तिसरें वनपर्वही संपत आलें आहे आणि योगवासिष्ठाचीं पहिलीं दोन प्रकरणें संपून तिसरें सुरू आहे. मासिक पुस्तकाची वर्षाची अगाऊ वर्गणी ट० ह० सह ४८६ आहे. मागील वर्षाचें सर्व अंक ग्राहकांना जास्त किंमत न पडता १२ अंकांना ४८६ ह्या किंमतींतच मिळण्याची सवड ठेविली आहे.

काशीनाथ वामन लेले,

वाई, जि. सातारा.

॥ श्रीः ॥

# ब्राह्मणांना केलेल्या सवालांस उत्तर.

## ३ चातुर्वर्ण्य.

" चातुर्वर्ण्य ह्मणजे काय " असा मुख्य सवाल व्याख्यात्यांनीं प्रथमतः केलेला आहे; परंतु, ह्या सवालाचें उत्तर देण्यास निदान कमींत कमी दोन तास लागणार तेव्हां **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः** ह्या गीतावचनासंबंधानें कांहीं दिवसापूर्वीं मुंबई येथील ब्राह्मणसभेंत जे मीं चार शब्द श्रुतिस्मृतींच्या आधारानें सांगितले होते त्यावरच ह्या प्रसंगीं हवाला देणें मला भाग पडत आहे. त्यासंबंधाचें पुस्तक वेगळेंच छापिलेलें आहे. श्रुति, स्मृति, इतिहास, पुराणं, भगवद्गीता वगैरेंतील आणि श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीसमर्थ रामदासस्वामी, श्रीमद्भगवद्भक्त तुकाराममहाराज यांच्या ग्रंथांतील आधार देऊन वर्णव्यवस्थेचा निर्णय मीं यथामति केलेला आहे आणि त्यांतच विश्वामित्राच्या शरीराशीं क्षत्रियबीजाचा संबंध नाहीं हें महाभारतादि ग्रंथांतील आधार देऊन सप्रमाण सिद्ध केलें आहे. चातुर्वर्ण्याशिवाय इतर जातींचा विचार त्या लेखांत करण्याचें प्रयोजन नसल्यामुळें तो केलेला नाहीं. ह्यास्तव, तेवढा विचार मात्र येथें थोडक्यांत करितों.

" शास्त्रानें सांगितलेलें चातुर्वर्ण्य निराळें, शास्त्रांत कोठेंही न आढळणारा अठरापगड जातिभेद निराळा, अठरापगड जातिभेदावर बसविलेला आजचा जातिभेद निराळा. " असें व्याख्यात्यानीं ह्या विषयाच्या आरंभींच ह्मणून ठेविलें आहे. ह्या त्यांच्या ह्मणण्यावरून आणि ह्या विषयासंबंधानें पुढेंही जो कांहीं त्यांनीं शेवटपर्यंत मजकूर लिहिला आहे त्यावरून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या चार वर्णांशिवाय कसल्याही प्रकारचा जातिभेद धर्मशास्त्रांत नाहीं असा ह्यांचा पूर्ण ग्रह झालेला दिसत आहे. परंतु, हाही ह्यांचा ग्रह अज्ञानमूलक आहे. रुद्राध्यायांतील चवथ्या अनुवाकामध्यें क्षत्ता,

तक्षा, रथकार, कुलाल, कर्मार, पुंजिष्ठ, निषाद व मृगयु अशा वेगवेगळ्या जातींचा उल्लेख केलेला आहे. तक्षा व रथकार ह्या सुतारांतील जाति आहेत, क्षत्ता ह्मणजे कोणती जात हें "क्षत्तायांशूद्रयोः सुत" ह्या अमरकोशांत स्पष्ट केल आहे, कुलाल ह्मणजे कुंभार, कर्मार ह्मणजे लोहार, पुंजिष्ठ ह्मणजे कैवर्त नांवाचा चांडालांतील एक भेद, निषाद ह्मणून भिल्लांतील एक जात आहे आणि मृगयु ही जात व्याध ह्या नावानें प्रसिद्ध आहे. पुल्कस, चांडाल वगैरेंचा उल्लेख छांदोग्य, बृहदारण्य वगैरे उपनिषदांतून आलेला आहे आणि यजुर्वेदामध्यें ब्राह्मणभागाच्या तिसऱ्या कांडातील चवथ्या प्रपाठकामध्यें कांहीं प्रसगानें बऱ्याच जातींचा उल्लेख केलेला आहे त्यातील कांहीं ह्या ठिकाणीं सांगतों. १ मागध, २ सूत, ३ रथकार, ४ तक्षा, ५ कुलाल, ६ कर्मार, ७ मणिकार (ह्मणजे बिंधारी वगैरे) ८ मृगयु, ९ पेशस्कार (ह्मणजे सोनारांतील एक पोटजाति), १० पुंजिष्ठ (कैवर्त ह्मणून प्रसिद्ध असलेली चांडाल जातींतील एक पोटजाति), ११ निषाद, १२ बिदलकार (बुरुड), १३ क्षत्ता, १४ वासःपल्पूली (परटीण), १५ रजयित्री (रंगारीण), १६ गोपाल (गवळी), १७ अजपाल (धनगर), १८ अविपाल (धनगरांतील एक भेद), १९ सुराकार (भंडारी वगैरे), २० अयस्ताप (लोहारांतील एक जात), २१ धीवर (कोळी) २२ दाश (गळ टाकून मासे धरणारी एक कोळ्यांतील जात), २३ बैंद (जाळ्यावर उपजीविका करणारी एक जात), २४ शौष्कल, २५ कैवर्त, २६ मार्गार २७ आंद, २८ मैनाल, २९ पर्णक (धीवरापासून पर्णकापर्यंतच्या कोळ्यांतील भिन्न भिन्न ९ पोटजाति आहेत), ३० किरात, ३१ ऋतुल (भाट), ३२ अजिन संधाय (चामार), ३३ चर्मम्ण (चांभारांतील एक जात), ३४ पुष्कस, ३५ वाणिज, ३६ हिरण्यकार (सोनार), ३७ गोघात (खाटिक) व ३८ चांडाल. असो.

ह्या इतक्या जाति एकेका जातींतील नऊ नऊ पोटजातींपर्यंत सुद्धां प्रत्यक्ष आज ब्राह्मणांना मुखोद्गत असलेल्या वेदामध्यें असतांना "शास्त्रांत कोठेंही न आढळणारा अठरापगड जातिभेद निराळा, अठरापगड जातिभेदावर बसविलेला आजचा जातिभेद निराळा." असें लिहून बिचाऱ्या ब्राह्मणावर व्याख्यात्यांनीं हवा तसा अपशब्दांचा वर्षाव करणें योग्य आहे कीं काय हें ठरविण्याचें काम मी निर्मत्सर व धर्मशील लोकांवरच सोपवितों व्याख्यात्यानीं प्रथम दर्शनीं वर निर्दिष्ट केलेलें विधान केल्यानंतर गीतेंतील वर्णव्यवस्थाविषयक वचनाचा आपल्या समजुतीप्रमाणें विचार करून शेवटीं ब्राह्मण ह्मणविणारास बरचसे सवाल केलेले आहेत त्याख्यातें ह्मणतात " रानडेभांडारकरप्रभृति मंडळीस शास्त्र नकोसें नाहीं, त्यास चातुर्वर्ण्य नकोसें झालेलें मानण्यास आधार नाहीं. रानडेभांडारकरप्रभृति मंडळीस जातिभेद नको आहेसा वाटतो. ज्यास शास्त्र हवें त्यास जातिभेदच नकोसा

वाटेल, चातुर्वर्ण्य नकोसें वाटलें कसें ? ज्यास रूढी हवी आहे, शास्त्र नको आहे त्याची दृष्टि आजच्या जातिभेदाच्या पलीकडे जाणार कशी ? तर मग धर्मबुडवे कोण ? शास्त्रातलें चातुर्वर्ण्य हवें ह्मणणारे रानडेभांडारकरासारखे सुधारक ? कीं शास्त्रात नसणारा जातिभेद हवा ह्मणून रानडेभांडारकराचा द्वेष करणारे असुधारक ? ” ह्या प्रश्नाचीं उत्तरें वर निर्दिष्ट केलेल्या श्रुतींतील जातिभेदाकडे लक्ष्य दिलें असता कोणालाही देता येण्यासारिखीं असल्यामुळें तीं देत बसून मी सभेचा वेळ घेऊ इच्छीत नाहीं.

व्याख्यात्यानीं मॅक्समुल्लर, लॉर्ड किचिनेर व पी० ओ० कंपनीचे चालक ह्यांची गणना अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यात केली आहे. त्याप्रमाणें ह्यांच्या मतानें त्यातील ठरलेल्या द्विजोत्तमाशीं सोयरीक केल्यास अडथळा करण्याची माझी इच्छा नाहीं व ह्यासंबधानें मला काहीं विशेष सांगावयाचेंही नाहीं. ब्राह्मणादिवर्णव्यवस्था उत्पत्तिसिद्धच आहे व ती तशी धरल्यावाचून गत्यंतरच नाहीं हें मी वर निर्दिष्ट केलेल्या चातुर्वर्ण्यसंबधीं लेखात श्रुतिस्मृतिप्रभृतींचे अनेक आधार देऊन सिद्ध केलेलें आहे; तें जिज्ञासूनीं लक्ष्यपूर्वक वाचून पहावें येवढेंच मला सांगून ठेवावयाचें आहे.

“ विवाहाचें वय कोणतें व विवाह कोणाकोणामध्यें ? ” हा व्याख्यात्याच्या चातुर्वर्ण्य ह्या तिसऱ्या विषयाचा दुसरा पोटविषय होय ह्या सवालाचेंही सप्रमाण व सयुक्तिक उत्तर १०।५ पळात देता येणार नाहीं

* सुमारें ५ वर्षांपूर्वीं विवाहकालनिर्णय ह्या नावानें मीं एक लेख प्रसिद्ध केलेला आहे व त्यात विवाहकालसंबधानें श्रुति, स्मृति, इतिहास, पुराणें, ज्योतिःशास्त्र, कामशास्त्र वगैरेंतून आढळणाऱ्या शेंदोनशें प्रमाणाचा यथामति विचार करून ब्राह्मणकन्येच्या विवाहाचें वय कोणतें, क्षत्रियकन्येच्या विवाहाचें वय कोणतें वगैरे प्रकारचा निर्णय त्या प्रमाणांच्या आधारानें केलेला आहे. ह्या लेखावरच हवाला देणें ह्या ठिकाणीं मला भाग आहे. यजुर्वेद्यांमध्यें चतुर्थीकर्म सांगितलें आहे; त्यावरून चतुर्थीकर्माचा अर्थ भलताच समजून काहीं आधुनिक लोक विवाहसमयीं ब्राह्मणकन्या रजोदर्शन झालेली पाहिजे, असें जें सिद्ध करू पाहतात तें किती अज्ञानमूलक व धाष्ट्यांचें आहे हेंही त्या लेखात चतुर्थीकर्मसंबंधीं सूत्राचा सरळ अर्थ काय होतो तो दर्शवून सप्रमाण सिद्ध केलें आहे. आश्वलायनगृह्यसूत्रांत कमींत कमी त्रिरात्र ब्रह्मचर्य पाळण्यास सांगितलें आहे. ह्यावरूनही कन्या रजोदर्शन झाले-

* सद्योवधू व ब्रह्मवादिनी असे जे दोन प्रकार पूर्वकल्पात स्त्रियांमध्यें असत त्यांपैकी काहीं सद्योवधूंचेंही उपनयन करून लगेंच विवाह करण्याची शास्त्रानुज्ञा होती असें धर्मशास्त्रग्रंथात आढळतें सबब, सद्योवधूंना उपनयनाची अनुज्ञाच पूर्वकल्पीं नव्हती असें जें पूर्वीं दर्शविलें गेलें आहे तें बरोबर नाहीं. वेदाध्ययन व तदंगभूत ब्रह्मचर्य हीं सद्योवधूंना अनुज्ञात नव्हतीच सच्छूद्रांमध्यें ज्याप्रमाणें लग्न ठरलें असता पुरुषाचें पुराणोक्त मन्त्रांनीं उपनयन करून लगेंच विवाह करण्याचा प्रघात आहे त्याचप्रमाणें पूर्वकल्पीं ( काहीं कोट वर्षांपूर्वीं ) लग्न ठरलें असता काहीं सद्योवधूंचेंही प्रथम अमन्त्रक उपनयन करून लगेंच लग्न करण्यास शास्त्रानुज्ञा होती असें दिसतें.

लीच असली पाहिजे, असें जे कांहीं आधुनिक ह्मणत असतात त्याच्याही ह्मणण्याचें वैयर्थ्य त्या लेखात सप्रमाण त्याच्या पदरात टाकिलें आहे.

" आश्वलायनानें वधूवराच्या वर्णांचा उल्लेख बिलकूल न करिता त्याच्या कुळाची मात्र परीक्षा सांगितली आहे. अर्थातूच वधूवरांच्या कर्मांकडे आश्वलायन दृष्टीच पोंचवीत नाहीं जशी वधू तसा वर, हीं उभयता विवाहित स्त्रीपुरुषांपासून जन्मलेलीं असावीं, इतकेंच आश्वलायन ह्मणता. ही ऋग्वेद्याची वाट. " असें ह्मणून व्याख्यात्यानीं आपल्या समजुतीप्रमाणें आश्वलायनगृह्यसूत्रासबधानें एक अपूर्व सिद्धांत ठोकून देऊन बिचाऱ्या ऋग्वेदी ब्राह्मणाची एका टाकासरशी वासलात लावून टाकिली आहे. परतु, व्याख्यात्याचें हंहीं विधान निव्वळ अज्ञानमूलक आहे आश्वलायनमुनींनीं वधूवराच्या वर्णांचा उल्लेख केला आहे. इतकेंच नव्हें ; परतु, वधू व वर याच, मातेकडून व पित्याकडून लागल्या दहा दहा पिढ्यापर्यंत, उत्कृष्ट प्रकारचें ब्राह्मण्य आहे किंवा नाहीं ह्याचा पुरा पुरा तलास लावून नंतर विवाह करण्याची अवश्यकता आश्वलायनानीं आपल्या सूत्रात दर्शविली आहे आणि प्रसगापात्त पूर्वीं सागून टाकिलेल्या मजकुरावर ह्या ठिकाणीं हवाला देऊन टाकिला आहे. **कुल मग्रे परीक्षत ये मातृतः पितृतश्चेति यथोक्तं पुरस्तात्** असा मजकूर आश्वलायनगृह्यसूत्रात आहे. ह्यात **ये मातृत. पितृतश्चेति** असें ह्मणून जो पूर्वींच्या मजकुरावर हवाला दिलला आहे तो मजकूर यथाप्रमाण:—.

**ये मातृत पितृतश्च दशपुरुषं समनुष्ठितविद्यातपोभ्यां पुण्यैश्च कर्मभिर्येषामुभयतो वा ब्राह्मण्यं निनयेयुः पितृतश्चैके ।**

व्याख्यात्यानीं आश्वलायनगृह्यसूत्राप्रमाणें स्वमत्यनुसार आपस्तब व पारस्कर गृह्यसूत्राची वांटाघाट केल्यानंतर शेवटीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें " आजच्या सुधारकास गुदगुल्या होण्याकरितां आणि असुधारकास रडें कोसळूं लावण्याकरिता " त्यानीं प्रतिलोमविवाह करण्याची शास्त्रीय पद्धति फार प्राचीन काळापासून आहे असें आपल्या समजुतीप्रमाणें सिद्ध करून देवयानीशीं ययातिराजाच्या झालेल्या विवाहाकडे बोट दाखविलें आहे, तें कितपत योग्य आहे त पाहूं

कच अध्ययन संपल्यानंतर परत जाऊं लागला असता शुक्रकन्या देवयानीनें त्याला आपलें पाणिग्रहण करण्याविषयीं गळ घातला; परतु, ती गुरुकन्या असल्यामुळे धर्मदृष्ट्या आपली भगिनी आहे असें समजून ती गोष्ट जेव्हा त्यानें नाकारिली तेव्हा " तुझी विद्या तुला सफल व्हावयाची नाहीं." असा तिनें त्याला शाप दिला व तो ऐकून चेऊन त्यानेही तिला " कसाही प्रसंग आला तरी कोणीही ऋषिपुत्र तुझें कधींही पाणिग्रहण करणार नाहीं. " असा शाप दिला. पुढे शर्मिष्ठेनें देवयानीला विहिरींत लोटून दिलें असता ययातिराजानें तिचा हात धरून तिला बाहेर काढिल आहे आणि ह्या गोष्टीलाही कांहीं दिवस लोटल्यावर पुनरपि ययातिराजा त्याच

प्रदेशावर आला असतां देवयानी त्यानें पाहिली व तिची वास्तपुस्त केली तेव्हां देवयानीनें आपलें पाणिग्रहण करण्याविषयीं ययातिराजाची प्रार्थना केली; परंतु, ब्राह्मणकन्येचें पाणिग्रहण क्षत्रियानें करणें हें धर्मशास्त्राला विरुद्ध असल्यामुळें ययातीला तें संमत झालें नाहीं आणि " तुझें पाणिग्रहण करण्यास मी योग्य नाहीं कारण, हे देवयानि, तुझ्या पित्याशीं क्षत्रियांना विवाहसंबंध करितां येत नाहीं. " असें त्यानें तिला सांगूनही टाकिलें

**विद्ध्यौशनसि भद्रं ते न त्वामर्होऽस्मि भाविनि । अविवाह्या हि राजानो देवयानि पितुस्तव ॥१८॥** अ० ८१ आदिपर्व

तथापि कांहीं बोलणें झाल्यावर देवयानी फिरून त्याला ह्मणाली " माझ्या हाताला पूर्वी दुसऱ्या कोणाचाही स्पर्श झालेला नाहीं तूंच प्रथम माझें पाणिग्रहण केलेलें आहेस ह्मणजे हात धरिला आहेस आणि ह्मणूनच मी तुला वरीत आहें कारण, दुसरा पुरुष माझ्यासारख्या विचारी स्त्रीचें आतां कसें बरें पाणिग्रहण करील. ? "

**पाणिधर्मो नाहुषायं न पुंभिः सेवितः पुरा । तं मे त्वमग्रहीरग्रे वृणोमि त्वामहं ततः ॥ २१ ॥ कथं नु मे मनस्विन्याः पाणिमन्यः पुमान्स्पृशेत् ।**

[ अ० ८१, आदिपर्व

ह्या सार्थ श्लोकाचा अर्थ विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारिखा आहे. असो. असें होतां होतां " तुझ्या पित्यानें तुला दिल्यावांचून मी तुझें पाणिग्रहण करणार नाहीं. " इतक्यावर जेव्हां गोष्ट येऊन ठेपली तेव्हां देवयानी ह्मणाली " ठीक आहे, तें माझ्याकडे लागलें; पित्यानें दिल्यावरच तूं माझा स्वीकार कर. मीं तुला वरिलेंच आहे तुझें मागणं नसतांना पित्यानें दिल्यावर माझा स्वीकार करण्याला तुला काय भिति आहे ? " असें देवयानीनें सांगितल्यावर देवयानी शुक्राचार्यांकडे गेली आणि ह्मणाली " बाबा, ह्या राजानें माझें पाणिग्रहण केलें आहे. ह्यास्तव, मी आपणाला हात जोडितें, मला आपण ह्याला अर्पण करा मी ह्या जगतामध्यें ह्यावांचून **दुसरा कोणीही पति वरणार नाहीं** "

हें देवयानीचें निकराचें बोलणें सहेतुक ऐकून घेतल्यानंतर शुक्राचार्यांनीं ययातिराजाला देवयानीचें पाणिग्रहण करण्यास सांगितलें आणि तें सांगतांना हिनें तुला वरिलें आहे, ही कन्या माझी लाडकी आहे आणि ही मीं तुला दिली आहे असेंही त्याला त्यांनीं कळविलें

**वृतोनया पतिर्वीर सुतया त्वं ममेष्टया । गृहाणेमां मया दत्तां महिषीं नहुषात्मज ॥ ३२ ॥** अ० ८१ आदिपर्व ॥.

परंतु, इतकें जरी झालें तरी ब्राह्मणकन्येचें पाणिग्रहण करणें ही गोष्ट भयंकर आहे असें समजून तो शुक्राचार्यांना ह्मणाला " महाराज, ही गोष्ट करण्यामध्यें वर्णसंकरसंबंधीं

घडणारें हें भयंकर पातक मला लागू नये, येवढी माझी आपणांस प्रार्थना आहे

**अधर्मो न स्पृशेदेष महान्मामिह भार्गव।**
**वर्णसंकरजो ब्रह्मन्निति त्वां प्रवृणोम्यहम् ॥ ३३ ॥**

ही राजाची प्रार्थना ऐकून घेतल्यानंतर " मी तुला पातकापासून मुक्त करितों; ह्या विवाहासंबधानें तूं मनामध्यें काळजी बाळगू नकोस मी तुझें पातक नाहींसें करीन " असें जेव्हा शुक्राचार्यांनीं त्याला स्पष्टपणें सांगितलें तेव्हां त्यानें देवयानीचा स्वीकार केला ह्याप्रमाणें महाभारतांत मजकूर आहे. तेव्हां प्रतिलोमविवाह होणें ही गोष्ट जर सशास्त्र असती तर ययातिराजाला इतके आढवेढे घेण्याचें काय कारण होतें ? आणि शुक्राचार्यांसारिखे कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ असलेले महर्षि सांगत असतांना " माझ्या माथीं हा वर्णसंकराचा दोष चढूं नये " असें सांगण्याची तरी त्याला काय पंचाईत पडली होती ? शुक्राचार्यांच्यापुढें हा कोण मोठा धर्मशास्त्राच्या गोष्टी सांगणारा लागून गेला होता ? बरें, शुक्राचार्यांनीं तरी " ब्राह्मणकन्येचें पाणिग्रहण क्षत्रियानें करणें ह्यांत मुळींच अधर्म होत नाहीं "असें कां त्याला सांगितलें नाहीं ? " मी तुझें पाप नाहींसें करीन, मी तुला अधर्मापासून मुक्त करीन " असें कां सांगितलें ? सारांश अतिप्राचीनकाळीं सुद्धां प्रतिलोमविवाह करणें सर्वथा शास्त्रविरुद्धच असे, हेंच ह्या ययातीच्या आख्यानावरून सिद्ध होत आहे " कोणीही ऋषिपुत्र तुझें कधींही पाणिग्रहण करणार नाहीं. " असा प्रत्यक्ष देवगुरूंच्या पुत्राचा शाप झाल्यामुळें जर अशी गोष्ट घडून आली आहे तर शापामुळें घडलेली ही गोष्ट स्वाभाविक मानून प्राचीन काळीं प्रतिलोमविवाह सशास्त्र मानिला जात असे, असा सार्वत्रिक सिद्धांत ठोकून देणें कधींही योग्य होणार नाहीं प्रतिलोमविवाह जर सशास्त्र असता तर " ऋषिपुत्र तुझें कधींही पाणिग्रहण करणार नाहीं. " ह्या कचाच्या शापांत कांहीं अर्थच रहाणार नाहीं. देवयानीला कचानें असा **शाप दिला** ह्यावरूनच प्रतिलोमविवाह शास्त्रविरुद्ध असल्याचें सिद्ध आहे. ह्याउपरही ह्या उदाहरणावरून प्रतिलोमविवाह सशास्त्र होता असें ज्याला मानावयाचें असेल त्याला—ययातिराजाचा पिता नहुष ऋषींच्या शापानें सर्प झाला हा आधार घेऊन पूर्वींचीं माणसें कांहीं दिवस मनुष्ययोनींत राहून लगेंच सर्पयोनींत जात असत, असेंही सार्वत्रिक अनुमान काढण्याची पाळी येईल आणि पूर्वी जर असें होत होतें तर सांप्रतच्याही माणसांनीं निदान पोटानें सरपटत जाऊन चाचाचावी तरी केलीच पाहिजे, असेंही प्रतिपादन करणें त्याला भाग पडेल त्याचप्रमाणें यादवाच्या कुलामध्यें ऋषींच्या शापामुळें एका पुरुषाला गर्भ राहून मुसळ झालें, हा आधार घेऊन "पूर्वी पुरुष गरोदर राहून त्यांना मुसळें होत असत. " असा हास्यास्पद सिद्धांत ठोकून देणें भाग पडेल आणि पूर्वी जर अशी गोष्ट खास होत होती तर सांप्रतच्या प्रत्येक पुरुषानें निदान दोहदत्व ही स्थिति तरी अवश्य

आणण्याचा यत्न केलाच पाहिजे." असेही बालिश विधान करण्यास त्याला तयार व्हावें लागेल असो.

हा प्रतिलोमविवाहाचा मुद्दा आपल्या समजुतीनें व्याख्यात्यांनीं सिद्ध केल्यानंतर शेवटीं त्यांनीं ब्राह्मण ह्मणविणारांना पुनरपि ह्या व्याख्यानें एकसारिखे सवाल केले आहेत. शास्त्रोक्त चातुर्वर्ण्याचा आश्रय करूं पहाणारे सुधारक शास्त्रबुडवे कीं शास्त्रात न सांगितलेला आजचा जातिभेद प्रतिपादन करणारे असुधारक शास्त्रबुडवे ? श्रुतिस्मृतिबुडवते कोण ? श्रुतिस्मृतींत असणारें चातुर्वर्ण्य पाहिजे ह्मणतात ते श्रुतिस्मृतींतला धर्म बुडवितात कीं श्रुतिस्मृतींत नसणारा जातिभेद पाहिजे ह्मणतात, ते श्रुतिस्मृतींतला धर्म बुडवितात ? शास्त्रातल्या अनुलोमविवाहाची प्रवृत्ति करूं पहाणारे सुधारक शास्त्रावर पाणी ओततात कीं शास्त्राबाहेरच्या जातिभेदातल्या पोटजातीमधलाही विवाह डोळ्यात सलणारे असुधारक शास्त्रावर पाणी ओततात ? " असो ह्या प्रश्नाचीं उत्तरें आता कोणालाही देता येण्यासारिखीं आहेत.

# ४ गणानां त्वा

" आप्यायस्व " मंत्राचा पयःस्नानात, " दधिक्राव्णो " चा दधिस्नानात, " गणानां त्वा " चा गणपतीच्या ध्यानात उपयोग होत असतो या उपयोगाबद्दल जर कोणाची दौलतजादा करणें असेल तर ती आज असुधारक ह्मणविणाऱ्या ब्राह्मणांचीच केली पाहिजे. या दौलतजादेचें भाग्य आज सुधारक ह्मणविणारे ब्राह्मण असतील त्यांच्या कपाळीं अणुभरही लागणें नाहीं; . श्रुतिस्मृतींनीं विहित केलेला जो धर्म तो आह्मा ब्राह्मणांचा " सनातन " धर्म कीं " ' आप्यायस्व '— पयःस्नानं समर्पयामि, ' दधिक्राव्णो '—दधिस्नानं समर्पयामि, ' गणानां त्वा '—पुढे लंबोदर वक्रतुंड मोदकखाद मूषकवाहन प्रतिष्ठापयामि, ' भीमा जाया '— अरुंधत्यै हरिद्राकुंकुम समर्पयामि, ' शं नो '—शनिदेवतायै दक्षिणां समर्पयामि " ही अर्थशून्य भटानीं वडाची साल पिंपळास व पिंपळाची साल वडास लावून मुसलमानीमध्यें जन्मू लागलेली लटपटपंची आमचा " सनातन " धर्म ? ज्यास श्रुतिस्मृतींतला धर्म

हवासा वाटतो, त्यास " ब्राह्मण " ह्मणवून घेण्याचा अधिकार कीं श्रुतिस्मृतींची निव्वळ मस्करी करणारी ही अर्थशून्य भटाची लटपटपची हवीशी वाटते, त्यास " ब्राह्मण " ह्मणवून घण्याचा अधिकार ? "

ह्याप्रमाणें वेदमंत्राच्या विनियोगासंबधानें व्याख्यात्यानीं अलीकडल्या ब्राह्मणावर हवा तसा ताशेरा झाडला असून अशा रीतीनें मंत्राचा विनियोग करण्यात श्रुतिस्मृतींची निव्वळ मस्करी होत आहे असेंही आपलें मत ठोकून दिलें आहे; परंतु, अशा रीतीनें आजच्या ब्राह्मणावर ताशेरा झाडण व श्रुतिस्मृतींची थट्टा होत आहे असें विधान ठोकून देणें योग्य नाहीं ज्या मंत्राच्या विनियोगाचीं उदाहरणें व्याख्यात्यानीं दिलेलीं आहेत त्यापैकीं प्रत्येकाला स्मृति वगैरेचा आधार आहे. मंत्राच्या विनियागासंबधानें " भटांकडे " यत्किंचितूही दोष नाहीं श्रुतिस्मृतिविरहित धर्म व्याख्यात्याना मान्य असल्यामुळे मंत्रविनियोगासंबधानें जे कांहीं त्यानीं प्रश्न केले आहेत त्याना उत्तर देणें अगदीं सोपें आहे.

**विनायकं गणानां त्वा दुर्गां वै जातवेदसं । वायो ये ते तथा वायुं घृतं घृतवति चाम्बरम् ॥ या वां करोति संपूज्य ह्याचण्येतौ तनोश्विनौ ।**

ह्याप्रमाणें वसिष्ठस्मृतींत वचनें आहेत. ह्या वचनात मंत्राचा विनियोग सांगितलेला असून **गणानां त्वा** ह्या मंत्राचा विनियोग गणपतीकडे करण्यास सांगितलें आहे अर्थात् गणपतीच्या ध्यानाला वगैरे '**गणानां त्वा**' ह्या मंत्राचा उपयोग होत असतो, ह्यात स्मृतीची थट्टा होत नसून स्मृतिविहित धर्माचेंच अवलंबन आहे ह्यात शंका नाहीं. वसिष्ठ केव्हां झाले ? हिंदुस्थानामध्यें मुसलमानी अंमल झाल्यानंतर झाले किंवा मुसलमानी अंमलाच्या पूर्वी झाले, हें मला नक्की ठरविता येणार नाहीं; तथापि वेदामध्यें वसिष्ठमुनींचा उल्लेख अनेक ठिकाणीं आढळतो एवढ मात्र मी ह्या ठिकाणीं सांगून ठेवितों

**ऋषयो वा इन्द्रं प्रत्यक्षं नापश्यन्तं वसिष्ठः प्रत्यक्षमपश्यत् ।**

असें तैतीरीयसंहितेंतील तिसऱ्या कांडाच्या पांचव्या प्रपाठकात आहे व त्याचा अर्थ— ज्या इंद्राचें प्रत्यक्ष दर्शन ऋषींना झालें नाहीं त्या इंद्राचें प्रत्यक्ष दर्शन वसिष्ठमुनींना झालें—असा आहे. वसिष्ठाचे पुत्र मृत झाल्याचा वृत्तात इतिहास, पुराणें वगैरेंतून सविस्तर कथन केलेला आहे आणि **वासिष्ठो हतपुत्रः** असें वेदातही ह्मटलें आहे. ' हतपुत्रः ' ह्मणजे ज्याच्या पुत्राचा वध झालेला आहे तो वसिष्ठमुनींचा उल्लेख ऋग्वेदसंहितेंतही आहे. तस्मात्, वसिष्ठमुनि केव्हां झाले हें जरी सध्याच्या पद्धतीप्रमाणें मला सांगतां आलें नाहीं तरी ऋग्वेद, यजुर्वेद वगैरेंमध्यें त्याचा उल्लेख आढळतो ह्यावरून ते हिंदुस्थानामध्यें केव्हा झाले असावे ह्याचा काय तो निर्णय लोकानींच ठरवावा ग्रंथकर्त्यांचा काळ ठरविण्यासंबधानें सांप्रत आधुनिक लोकानीं जी पद्धति स्वीकारिली आहे तिचें अवलंबन केलें

असता वसिष्ठाचा काळ वेदाच्या अलीकडला मानिता येणार नाहीं हें मात्र खास ठरतें वेद-वेत्त्यामध्यें वसिष्ठ श्रेष्ठ आहेत आणि त्यांनीं ' **गणानां त्वा** ' ह्या मन्त्राचा विनियोग गणपतीच्या पूजेकडे करण्यास सांगितलें आहे. तेव्हां ' **गणानां त्वा** ' ह्या मन्त्राच्या विनियोगासंबधानं व्याख्यात्यांना जें काहीं ह्मणावयाचें असेल तें त्यांनीं वसिष्ठमुनींना ह्मणावें असो वसिष्ठमुनींचीं वर निर्दिष्ट केलेलीं वचनें मदनरत्नप्रभृति धर्मशास्त्रविषयक प्राचीन ग्रंथातूनही घेतलेलीं आहेत. पुरुषसूक्तामध्यें सांगितलल्या मन्त्रानीं देवपूजा करण्याचा जो प्रघात आहे तोही अलीकडल्या " भटानीं " पाडिलेला नाहीं. तो पराशरमुनींनीं आपल्या स्मृतीच्या तिसऱ्या अध्यायात सांगितला आहे पराशरमुनि केव्हां झाले हें नक्की ठरविता येणार नाहीं; तथापि वेदामध्यें त्याचा उल्लेख आहे ह्यावरून श्रोत्यांनीं त्याचा काल काय तो निश्चित ठरवावा.

**स होवाच व्यासः पाराशर्यः ।**

असें यजुर्वेदात एक वाक्य असून ह्या वाक्यात व्यासमुनीना पाराशर्य हें विशेषण दिलें आहे. ह्मणजे व्यासमहर्षींची योग्यता दर्शविण्याकरिता हे पराशर मुनींचे पुत्र असें ह्मटलें आहे. तेव्हा पराशरमुनींचे पुत्र ह्मणून जर प्रत्यक्ष वेदव्यासांच्या योग्यतेंत भर पडलेली आहे तर पराशरमुनींची गणना सध्याच्या " अर्थशून्य भटात " करिता येणार नाहीं हें श्रुतिप्रमाणावरून च सिद्ध आहे

**विनायकाय होतव्या घृतस्याहुतयस्तथा । सर्वविघ्नोपशान्त्यर्थं पूजयेद्यत्नतस्तु तम् ॥ २२ ॥ गणानां त्वेति मन्त्रेण स्वाहाकारान्तमादृतः । चतस्रो जुहुयात्तस्मै गणेशाय तथाहुतीः ॥२३॥**

अशीं पराशरस्मृतींतील दुसऱ्या अध्यायात वैश्वदेवप्रकरणीं वचनं आहेत. त्यांचा अर्थ येणेंप्रमाणे —

विनायकाच्या उद्देशाने आज्याहुति घालाव्या आणि सर्व विघ्नाचा नाश व्हावा एतदर्थ प्रयत्नपूर्वक त्याचें पूजन करावें २२. ' **गणानां त्वा** ह्या स्वाहाकारांत मत्रानें आदरपूर्वक त्या गणेशाला उद्देशून चार आहुति घालाव्या २३. ' **गणानां त्वा** ' ह्या मंत्राचा उपयोग गणपतीच्या पूजनाकडे होत असतो ह्याला धर्मशास्त्राचीं प्रमाण आणखीं हवीं तितकीं देता येतील; परंतु, ' **गणानां त्वा** ह्या सदराखाली व्याख्यात्यांनीं सध्याच्या ब्राह्मणावर जे आरोप केलेले आहेत ते व्यर्थ आहेत हें पूर्णपणें ह्या दिलेल्या प्रमाणावरून सिद्ध होत असल्यामुळे आणखी प्रमाणें देण्यात मला काहीं अर्थ दिसत नाहीं " लंबोदर व वक्रतुंड ही देवता वेदाच्या बाहेरची आहे. " अशा अर्थाचें एक विधान व्याख्यात्यांनीं केलेले आहे ते चुकीचें आहे. यजुर्वेदामध्ये—

**तत्पुरुषाय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्तिः प्रचोदयात् ।**

असा गणपतीचा गायत्रीमंत्र पठित आहे आणि ह्यात **वक्रतुण्ड** हा शब्द स्पष्ट आहे. गणपतिअथर्वशीर्षांतही

एकदन्ताय विद्महे। वक्रतुण्डाय धीमहि। तन्नो दन्तिः प्रचोदयात् ।

असा गणपतीचा मंत्र आहे 'गणानां त्वा' हा मंत्र उघड ब्रह्मणस्पतीस उद्देशून आहे व ह्या मंत्रांतला गणपति शब्द 'गणाचा पति ह्मणजे समुदायाचा स्वामी ह्या अर्थी वापरिला आहे " असें व्याख्यात्यानीं ह्मटलें आहे तें खरें आहे; परतु, ब्रह्मणस्पति ह्मणजे गणपति हेंही 'गणानां त्वा' ह्या मंत्रावरूनच सिद्ध होत असून गणपति = गणाचा पति=समुदायाचा स्वामी अशीच समज साम्प्रतच्या ब्राह्मणाचीच नव्हे, परतु, यच्चयावत् हिंदूंची असून ह्या समजुतीप्रमाणें त्याचें प्रत्यक्ष वर्तनही दृष्टीं पडत आहे.

सुमुखश्चैकदन्तश्च कपिलो गजकर्णकः । लम्बोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः। धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचन्द्रो गजाननः ॥

उच्चारण्याचा सशास्त्र प्रघात आहे. हीं बारा नावें गणपतीचीं असून 'गणाधिप' आणि 'गणाध्यक्ष' हीं ह्यातील दोन नावें तर गणाचा पति, समुदायाचा स्वामी, मेळ्याचा अधिपति वगैरे प्रकारचा अर्थ स्पष्ट दर्शविणारीं आहेत. तेव्हां 'गणानां त्वा' ह्या मन्त्राचा विनियोग गणपतीच्या पूजेकडे होत असल्याबद्दल व्याख्यात्याना अचंबा का वाटावा हें मला समजत नाहीं गणपतीच्या स्वरूपा बद्दल लोकाची जी समजूत आहे ती अगदीं 'गणानां त्वा' ह्या मन्त्राला अनुसरूनच आहे "गणाचा = समुदायाचा = मेळ्याचा पति तो गणपति हा 'गणानां त्वा' ह्या मंत्रातील गणपति शब्दाचा अर्थ आहे व तसाच अर्थ गणपतीचे मेळे वगैरे करणारी मुलेंही समजत असल्याचें त्याच्या वर्तनावरून सिद्ध होत आहे 'गणानां त्वा' ह्या मन्त्रांत "कवीनां कविम्" असें ह्मटलें आहे आणि गणपति हाच सर्व विद्यादाता अशी लोकाची समजूत आहे. "ब्रह्मणां ज्येष्ठराजम्" असें 'गणानां त्वा' मन्त्रात आहे ब्रह्म ह्मणजे वेद=विद्या. विद्याचा मुख्य अधिपति असा 'ज्येष्ठराजं ब्रह्मणाम्' ह्या पदाचा अर्थ होत आहे आणि गणपति हाच सर्व विद्याचा अधिपति व ह्याच्या पूजनानेच विद्या प्राप्त होते, असा समज थोराचाच नव्हे परतु, लहान पोराचाही आहे. हिंदुस्थानामध्यें गणपतीचे मेळे करण्याचा जो प्रघात आहे त्यालाही 'गणानां त्वा' ह्या मन्त्राचा आधार आहे, असें ह्मणता येईल.

ब्राह्मणस्पत्यमेकादशकपालं निर्वपेद्ग्रामकामो ब्रह्मणस्पतिमेव स्वेन भागधेयेनोप धावति स एवास्मै सजातान्प्रयच्छति ग्राम्येव भवति गणवती याज्यानुवाक्ये भवतः सजातैरेवैनं गणवन्तं करोति ।

असें तैत्तिरीयसंहितेंतील दुसऱ्या काडाच्या तिसऱ्या प्रपाठकात सांगितलें आहे त्याचा अर्थ गणपतींच्या मेळ्यासबंधानें विशेष लक्ष्यात ठेवण्यासारिखा असल्यामुळे तो येथें देतो.

" ग्रामकाम जो असेल त्यानें ब्राह्मणस्पत्य

इष्टि करावी. ह्मणजे ब्रह्मणस्पतीला त्याच्याकडून हविर्भाग मिळतो आणि असें झालें असता तो ब्रह्मणस्पति त्या यजमानाला सजात देतो आणि ब्रह्मणस्पतीनें सजात दिले ह्मणजे यजमान ग्रामी होतो. ह्या इष्टीला याज्या पुरोनुवाक्या गणवती घ्याव्यात. ही इष्टि केली ह्मणजे यजमानाला सजाताच्या योगानें ब्रह्मणस्पति गणवान् ह्मणजे समाजाधिपति करितो.

वरील श्रुतीचा ह्याप्रमाणें अर्थ होतो. परंतु, ग्रामकाम, सजात व ग्रामी ह्या शब्दांचा खुलासा झाल्यावाचून श्रुतीचें तात्पर्य नीट लक्ष्यांत येणार नाहीं. ग्राम ह्मणजे समाज=समुदाय उदाहरणार्थ.— गुणग्राम, इंद्रियग्राम वगैरे. लोकांचा समाज अथवा समुदाय जेथें रहातो त्याला ग्राम ह्मणत असतात, हें तर प्रसिद्धच आहे ग्रामाधिपति ह्मणजे गावाचा अधिपति= अर्थात् गावांत रहाणाऱ्या लोकांचा स्वामी देशाधिपति ह्मणजे देशाचा अधिपति= अर्थात् देशांत रहाणाऱ्या लोकांचा अध्यक्ष जात = समानजातीय = एकाच जातींतील. एकाच धर्मांतील ग्रामी = गावचा अथवा लोकसमुदायाचा अधिपति = लोकाग्रणी = लोकांचा पुढारी, असे ग्राम, सजात आणि ग्रामी ह्या शब्दांचे अर्थ होतात. तेव्हां लोकांचा समुदाय अथवा गाव आपल्या हातीं असावा किंवा लोकसमाजानें आपल्या मतानें वागावे अशी इच्छा असणारा पुरुष हा ग्रामकाम ह्या शब्दाचा अर्थ होतो " लोकांचा पुढारी होण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें ब्राह्मणस्पत्य इष्टि करून ब्रह्मणस्पतीला ह्मणजे गणपतीला हविर्भाग द्यावा ह्मणजे तो ब्रह्मणस्पति अथवा गणपति सजातीय=समानधर्मी लोक त्याच्या स्वाधीन करितो आणि असें झालें ह्मणजे तो यजमान ग्रामी ह्मणजे लोकाग्रणी होतो. ह्या इष्टीमध्यें ,पुरोनुवाक्या आणि याज्या गणवती घ्याव्यात. गण हा शब्द ज्या ऋचेमध्यें असतो त्या ऋचेला गणवती असें ह्मणतात. '**गणानां त्वा**' ही ऋचा गणवती आहे आणि ह्याच ऋचेनें हवन करण्याचा याज्ञिकांचा संप्रदाय आहे. याज्या ह्मणजे हवन करण्याचा मंत्र पुरोनुवाक्या ह्मणजे हवन करण्याचे पूर्वी ह्मणावयाचा मंत्र '**दधिक्राव्णो अकारिषं**' ह्या ऋचेला सुरभिमती असे नाव आहे कारण ह्यांत '**सुरभि**' असें पद आहे "

**दधिक्राव्णो अकारिषमिति सुरभिमतीमृचं वदन्ति** ('दधिक्राव्णो अकारिषं' ही सुरभिमती ऋचा ह्मणावी )

अशी यजुर्वेदामध्यें श्रुति आहे. सारांश, **सुरभि** हें पद असल्यामुळें '**दधिक्राव्णो अकारिषं**' ह्या ऋचेला ज्याप्रमाणें सुरभिमती असे नाव आहे त्याचप्रमाणें गण हें पद जिच्यामध्यें आहे त्या ऋचेला गणवती असे नाव आहे असो. '**गणानां त्वा**' प्रभृति मंत्राचा विनियोग ब्राह्मणस्पत्य इष्टीमध्यें आहे आणि त्या इष्टीचें फल गावाचें अथवा लोकसमाजाचें अग्रणीत्व प्राप्त होणें हें आहे. तेव्हां '**गणानां त्वा**' ह्या मंत्रांत ज्या देवतेचा उल्लेख केलेला आहे त्या देवतेचें यजन अथवा पूजन केलें असतां लोकाग्रणीत्व अथवा समाजाचा पुढारी-

पणा मिळत असतो असें श्रुतीचे तात्पर्य अर्थाची विशेष ओढाताण न करितां गणपतींच्या मेळ्यासंबंधानें निघत आहे, असें ह्मणण्यास चिंता नाहीं आणि गणपतीचे पूजन वगैरेसंबंधानें जे पुढाकार घेत असतात ते त्या मानानें लोकाग्रणी होत असतात असें प्रत्यक्ष प्रमाणावरून स्पष्टपणें सांगण्यासही मला विशेषशी हरकत दिसत नाहीं. असो. **आप्यायस्व** ह्या मंत्राचा विनियोग दुधाचा संबंध आला असता आणि **दधिक्राव्णो अकारिषं**' ह्या मंत्राचा विनियोग दह्याचा संबंध आला असता करावा असे स्मृतिप्रणेत्या महर्षींनी लिहून ठेविलें असल्यावरून ब्राह्मण करीत असतात बृहत्पाराशरधर्मशास्त्राच्या सातव्या अध्यायांत पंचगव्य कोणत्या मंत्रानी मिश्र करावं हें सांगितलें आहे.

**गायत्र्या चैव गोमूत्रं गन्धद्वारेति गोमयम् । आप्यायस्वेति वै क्षीरं दधिक्राव्णा दधि स्मृतम् ।**

ह्या पराशरमुनींच्या वचनांत ' **आप्यायस्व** ' ह्या मंत्राचा विनियोग दुधाकडे आणि ' **दधिक्राव्णो** ' ह्या मंत्राचा विनियोग दह्याकडे करावा असें स्पष्ट सांगितलें आहे.

'**शं नो देवी**' ह्या मंत्राचा विनियोग शनीचा संबंध आला असता करावा असे स्मृतिसूत्रप्रणेत्या महर्षींनीं सांगून ठेविलें आहे.

**आकृष्णेन इमं देवा अग्निर्मूर्धा दिवः ककुत् । उद्बुध्यस्वेति च ऋचो यथासंख्यं प्रकीर्तिताः । बृहस्पते अतियदर्यस्तथैवान्नात्परिस्रुतः । शं नो देवीस्तथा काण्डात्केतुं कृण्वन्निमास्तथा ।**

अशीं वचनें याज्ञवल्क्यमुनींनीं लिहून ठेविलीं आहेत आणि त्या वचनांत नवग्रहांचे मंत्र सांगितलेले असून ' **शं नो देवी** ' हा शनीचा मंत्र असें स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां ह्याबद्दल अलीकडल्या ब्राह्मणाची ' अर्थशून्य भटें ' ह्मणून निंदा करणें ह्मणजे पर्यायानें याज्ञवल्क्य, आश्वलायन वगैरे स्मृतिसूत्रप्रणेत्या मुनींचीच निंदा करणें आहे. तेव्हां " ज्यास श्रुतिस्मृतींतला धर्म हवासा वाटतो त्यास ब्राह्मण ह्मणवून घेण्याचा अधिकार कीं ज्यास श्रुतिस्मृतींची निव्वळ मस्करी.... हवीशी वाटते त्यास ब्राह्मण ह्मणवून घेण्याचा अधिकार ?" असा जो प्रश्न व्याख्यात्यांनीं ' **गणानां त्वा** ' ह्या विषयाचे शेवटीं केला आहे त्याचें उत्तर मंत्राच्या विनियोगासंबंधानें मुनिवचनांचे दिलेले आधार लक्ष्यांत घेऊन काय तें समंजस व धर्मशील गृहस्थांनींच द्यावें अशी माझी त्यास विनंति आहे.

मंत्रांतील शक्ति विशेषतः अर्थावर अवलंबून नसून मंत्रांतील वर्णांच्या आनुपूर्वीवरच अवलंबून आहे हें जर ह्या व्याख्यात्यांना ठाऊक असतें आणि जगत्प्रसिद्ध असलेले धर्मशास्त्रग्रंथ जर ह्यांना माहीत असते तर असला प्रश्न ह्यांनीं केला नसता. ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र वगैरे अस्त्रांचे जे मंत्र धनुर्वेदांत सांगितले आहेत त्या मंत्राचा अर्थ सांप्रतच्या कोणत्याही शास्त्र्याला करितां येईल असें मला वाटत नाहीं. त्रैवर्णिकांना ज्या मंत्राच्या योगानें

द्विजत्व प्राप्त होत ताच मंत्र उलटा ह्मटला ह्मणजे ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र वगैरेची सिद्धि होते असे धनुर्वेदात सांगितलें आहे हा मंत्र प्रत्येक द्विजाला येत असल्यामुळें त्याचा उल्लेख करण्याचें कारण मला दिसत नाहीं शेवटापासून आरंभ करून ह्या मंत्रातील अक्षरांचा जर उच्चार केला तर ह्याचा अर्थ काय होतो हें निदान मनुष्य-बुद्धीला तरी खचित अगम्य आहे असें निदान मला वाटतें.

मंत्राचा विनियोग श्रुतिनिर्दिष्ट असतो आणि अर्थदृष्ट्या त्याचा सर्वस्वीं मेळ बसणें हें मानवबुद्धीच्या आटोक्यांतलें नाहीं, ही गोष्ट प्रसिद्ध आहे आणि पूर्वमीमांसेमध्यें जैमिनिमहर्षींनीं ह्यासंबधानें एक अधिकरणही लिहून ठेविलें असून तें अधिकरण **ऐन्द्रीन्याय** ह्या नावानें प्रसिद्ध आहे

**निवेशन संगमनो वसूनामित्यैन्द्र्या गार्हपत्यमुपतिष्ठते ।**

अशी श्रुति आहे आणि '**निवेशनः संगमनो वसूनाम्**' ह्या ऐंद्री ऋचेनें गार्हपत्यसंज्ञक अग्नीचें उपस्थान करावें ' असा ह्या श्रुतीचा अर्थ आहे. मंत्राचा अर्थ लक्ष्यात घेतला असता तो इंद्रपर लागत असून ह्याचा विनियोग त्याअर्थी गार्हपत्याच्या उपस्थानाकडे सांगितला आहे त्याअर्थी गार्हपत्य शब्दाचा अर्थ इंद्र समजावा इत्यादि प्रकारचा पूर्वपक्ष ह्या अधिकरणात केलेला आहे; परंतु, तो सिद्धांतामध्यें खोडून काढिलेला आहे आणि '**ऐन्द्र्या गार्हपत्यमुपतिष्ठते**' ही श्रुतिच तो खोडून काढण्याला प्रमाण दिलेली आहे. निर्णयसिंधुकार कमलाकरभट्ट ह्यांनीं आपल्या ग्रंथात नवग्रहांचे मंत्र याज्ञवल्क्यप्रभृतिमुनींनीं सांगितलेले घेतले आहेत व अर्थदृष्ट्या मंत्राचा विनियोगाशीं मेळ बसत नाहीं अशी एकाद्याला शंका येण्याचा संभव असल्यामुळें

**अन्यार्थानामपि मन्त्राणां वचनात्त्वयथार्थमैन्द्री स्यादिति न्यायेन विनियोगः।**

असा पूर्वमीमांसेंतील अधिकरणावर हवाला दिला आहे सारांश, '**आप्यायस्व**', '**दधिक्राव्णो**, '**शं नो देवी**' वगैरे मंत्राचा जो विनियोग दूध, दहीं, शनि वगैरेकडे ब्राह्मणाकडून करण्यात येतो तो पराशर, आश्वलायन वगैरे स्मृतिप्रणेत्याच्या वचनावरून आणि ऐन्द्रीन्यायविषयक श्रुतीच्या आधारावरून करण्यात येतो.

# ५ अष्टका.

'अष्टका' ह्या सदराखालीं सुमारें वीस ओळी मजकूर व्याख्यात्यानीं लिहिलेला आहे त्यांत त्यानीं "पूर्वीचे ब्राह्मण वर्षांतून पांचदां आपल्या पुरुषपितरांस बकऱ्याची वपा देत व स्त्रीपितराच्या पिंडावर सुरा ओतीत." ही गोष्ट आपल्या वाचकाच्या विशेष नजरेपुढें आणिली आहे ती आणण्यांत व्याख्यात्याचा काय मतलब आहे तो येथें स्पष्ट दिसत नसून शेवटल्या ब्राह्मण ह्या सदराखालीं त्यानीं तो कांहींसा स्पष्ट केला आहे तेव्हां ह्या अष्टका-प्रकरणांत आलेला सुरेचा व वपेचा विचारही ह्याच्या पुढल्या विषयाच्या विचाराबरोबरच करूं "बकऱ्याची सागुती व सुरा" ह्याचा उल्लेख केल्यानंतर व्याख्यात्यानीं "आज अष्टकेचें नाव तरी कितीशा आश्वलायनाच्या कानावरून गेलें असेल ?" असा एक प्रश्न आश्वलायनशाखीय ब्राह्मणांना उद्देशून केला आहे आणि नंतर "स्मृतींतील माध्या वर्ष गेलें व त्याच्या ठिकाणीं स्मृतिबाहेरच्या महाळानें बैठक मारिली आहे." असें एक विधान ठोकून दिलें आहे हें विधान नुसतें ठोकून देऊनच व्याख्याते स्वस्थ राहिले नाहींत, त्यानीं आणखी दोन तीन सवालही ब्राह्मणांना टाकिले आहेत "जे माध्यावर्षा-सारिख्या स्मार्त कर्मास आचवले आहेत व व महाळासारिख्या अस्मार्त कर्मास मिठी मारून बसले आहेत त्यास स्मृतीचें नाव घेण्याचा अधिकार कितीसा बरें मानिला येईल ?" हा व्याख्यात्याचा पहिला सवाल होय हा सवाल महालयश्राद्ध धर्मशास्त्राबाहेरचें आहे, स्मृतीमध्यें त्याला कोठें आधार नाहीं, असें समजून व्याख्यात्यानीं केलेला आहे; परंतु, धर्मशास्त्राची गरज बाळगणाराच्या दृष्टीनें व्याख्यात्याचें म्हणणें कधींही खरें ठरणार नाहीं. महालयश्राद्धाला स्मृतींतून कांहीं आधार सापडतात किंवा काय तें पाहूं

**१ आषाढीमवधिं कृत्वा पञ्चमं पक्षमाश्रिताः । काङ्क्षन्ति पितरः क्लिष्टा अन्नमप्यन्वहं जलम् ॥**

असें वृद्धमनुस्मृतींतील वचन पृथ्वीचंद्रोदयनामक ग्रंथांत दिलें आहे ह्या वचनांत भाद्रपदकृष्णपक्षामध्यें पितर प्रत्यहीं अन्नपानाची इच्छा करीत असतात, असें सांगितलें आहे.

**२ अथापरपक्षे श्राद्धं पितृभ्यो दद्यात्।**

असें गौतमस्मृतींत सांगितलें आहे व भाद्रपदकृष्णपक्षामध्यें पितरांना उद्देशून श्राद्ध करावें असा त्याचा अर्थ आहे.

**३ नभस्यस्यापरे पक्षे श्राद्धं कार्यं दिने दिने ।**

(भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या पक्षांत प्रत्यहीं श्राद्ध करीत जावें) असें कार्ष्णाजिनिस्मृतींत सांगितलें आहे व हें स्मृतिवचन पराशरमाधवीय, निर्णयसिंधु वगैरे ग्रंथांत घेतलेलें आहे

**४ महालये क्षयाहे च दर्शे पुत्रस्य जन्मनि । तीर्थेपि निर्वपेत्पिण्डाञ्श्राविवाहिकेष्वपि ॥**

असें अत्रिस्मृतींत सांगितलें आहे ह्यावरूनही महालयश्राद्ध स्मृतीत असल्याचें सिद्ध होत आहे.

**५ महालयं गयाश्राद्धं मातापित्रोः क्षयेहनि । कृतोद्वाहोपि कुर्वीत पिण्डनिर्वपणं सदा ॥**

असें बृहस्पतिस्मृतींत सांगितलें आहे

**६ हंसे कन्यासुवर्षासु शाकेनापि गृहे वसन् । पञ्चम्योरन्तरं दद्यादुभयोरपि पक्षयोः ॥**

ह्या यमस्मृतीतील वचनावरूनही महालयश्राद्ध असल्याचें सिद्ध होत आहे हें यमस्मृतीतील वचन चतुर्वर्गचिंतामणि, निर्णयसिंधु वगैरे ग्रंथातून घेतलेलें आहे.

**७ यावच्च कन्यातुलयोः क्रमादास्ते दिवाकरः । शून्यं प्रेतपुरं तावद्वृश्चिको यावदागतः ॥**

ह्या महाभारतातील वचनात महालयाची मुदत कोठपर्यंत तें सांगितलें आहे.

**८ आकाङ्क्षन्ति स्म पितरः पञ्चमं पक्षमाश्रिताः । तस्मात्तत्रैव दातव्यं दत्तमन्यत्र निष्फलम् ।**

अशी जातूकर्ण्यस्मृति आहे व ह्या स्मृतिवचनात भाद्रपदकृष्णपक्षातच महालय करणें उत्तम असें दर्शविलें आहे

**९ मृताहं च सपिण्डं च गयाश्राद्धं महालयम् । आपन्नोपि न कुर्वीत श्राद्धमामेन कर्हिचित् ॥**

अशी गालवस्मृति असून ह्या स्मृतींत महालयश्राद्ध आमान्नानें करण्याचा निषेध सांगितला आहे हें वचन स्मृतिदर्पण, निर्णयसिंधु वगैरे ग्रंथांतून आहे

**१० पक्षश्राद्धं यदा कुर्यात्तर्पणं तु दिने दिने । सकृन्महालये चैव परेहनि तिलोदकम् ॥**

असें नारदमुनीचें वचन आहे ह्यावरूनही महालयश्राद्ध असल्याचें सिद्ध होत आहे.

**११ कृष्णे भाद्रपदे मासि श्राद्धं प्रतिदिनं भवेत् । पितॄणां प्रत्यहं कार्यं निषिद्धेहपि तर्पणम् । सकृन्महालयेश्वः स्यादष्टकास्वन्त एव हि ॥**

असें गर्गस्मृतींत सांगितलें आहे.

**१२ वृद्धिश्राद्धं तथा सोमसंस्थाधेयं महालयम् । राजाभिषेकं काम्यं च न कुर्याद्भानुलङ्घिते ॥**

ह्या भृगुस्मृतीतील वचनात महालयश्राद्धाला मलमास निषिद्ध सांगितला आहे

**१३ पुत्रानायुस्तथारोग्यमैश्वर्यमतुलं तथा । प्राप्नोति पञ्चमे दत्त्वा श्राद्धं कामान्सुपुष्कलान् ॥**

असें जाबालिस्मृतींत वचन असून ह्या वचनात भाद्रपदकृष्णपक्षात महालय केला असता मोठें फल सांगितलें आहे

१४ महालय श्राद्ध न झाल्यास ऋग्विधानग्रंथात प्रायश्चित सांगितलें आहे असो.

महालयासंबधानें स्मृतींचे आधार शेंकडो देता येतील; परंतु, दहा पधरा दिले आहेत येवढ्यावरून व्याख्यात्याचें महालयासंबधीं विधान बरोबर नाहीं, ह्याविषयीं सामान्यलोकाचीही खात्री होणारी असल्यामुळें आणखी जास्त आधार देण्यात मला कांहीं अर्थ दिसत नाहीं.

# ६ ब्राह्मण.

ब्राह्मण हा व्याख्यात्याचा सहावा विषय होय " अंगचे शमोदम: " असणारा ब्राह्मण; अगचीं शौर्य तेजो असणारा क्षत्रिय; शेतकी, गुराखीपणा, व्यापार ह्या तीन धंद्याकडे अग-स्वभाव असणारा वैश्य; तीन वर्णांची नोकरी करून रहाणारा शूद्र. ह्याप्रमाणे उपजत प्रवृत्ती-वर व धंद्यावर चातुर्वर्ण्याची इमारत उभारली गेली आहे. जन्माच्या पायावर चातुर्वर्ण्याची इमारत मुळची उभारलेली नव्हे जर जन्मावर चातुर्वर्ण्याची इमारत उभारली गेली असती तर आत्यासारख्या विधर्म्यांचा प्रवेश सनातन धर्मांत होऊ न शकता. " असें व्याख्यात्याचें ह्मणणें आहे. ह्या त्याच्या ह्मणण्याला उत्तर " **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं** " ह्या गीतेवरील निबंधात येऊन गेल असल्यामुळें वेगळें देण्याचे कारण मला दिसत नाहीं तथापि काहीं वाटाघाट ह्या ठिकाणीं करूं.

**शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥**

गीता अ० १८

ह्या गीतेतील वचनात ब्राह्मणजातीमध्यें उत्पन्न झालल्या पुरुषानें कोणते गुण अंगीं आणिले पाहिजेत हें सांगितल आहे; परंतु, हे गुण अगचेच ज्याच्या अंगीं असतील ह्मणजे ह्या गुणाकडे ज्याची उपजत प्रवृत्ति असेल तो ब्राह्मण, असें जे काहीं आधुनिकाचें ह्मणणे आहे तें कितपत योग्य ठरतें ते पाहू.

शम ह्मणजे मन.संयमन, दम ह्मणजे इंद्रियदमन, तप ह्या शब्दाचें स्पष्टीकरण भाष्यकारांनी **तपो यथोक्तं शरीरादि** ( तप ह्मणजे पूर्वीं सतराव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणें शारीरिक वगैरे तप ) असें केले आहे ह्यास्तव, तेथील तपः शब्दाचा अर्थ समजण्याकरितां शारीर तप, वाङ्मय तप आणि मानस तप ह्याची जी व्याख्या सतराव्या अध्यायात केलेली आहे ती पाहिली पाहिजे.

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् । ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥** अ० १७.

देव, द्विज, गुरु व प्राज्ञ ह्याचें पूजन, शौच, आर्जव, ब्रह्मचर्य आणि अहिंसा हें शारीरिक तप होय. ह्यातील शौच ह्या शब्दाचा अर्थ भाष्यकारानीं

**कायमलानां मृज्जलाभ्यां प्रक्षालनम् ।** ( माती व उदक ह्याच्या योगानें शरीरसंबंधी मल धुवून काढणं ) असा केला आहे.

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् । स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥**

ह्या वचनात वाङ्मय तपाची व्याख्या केलेली आहे. ह्या वचनाचा अर्थ येणेंप्रमाणें:—

दुसऱ्याच्या मनाला उद्वेग न होईल अशा प्रकारचें प्रिय, हितावह आणि सत्य भाषण व त्याचप्रमाणें वेदाध्ययनाचा अभ्यास हे वाङ्मय तप होय.

**मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः । भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥**

ह्या वचनांत मानसिक तपाची व्याख्या केलेली आहे. मनःप्रसाद ह्मणजे मन स्वच्छ करणें. सौम्यत्व ह्मणजे मुखादिकावर प्रसन्नता आणणारी अंतःकरणाची प्रवृत्ति. मौन ह्मणजे वाणीच्या संबंधानें मनाचें संयमन. आत्मविनिग्रह ह्मणजे सामान्यतः सर्व प्रकारचें मनःसंयमन आणि भावसंशुद्धि ह्मणजे दुसऱ्याशीं वागण्याचा प्रसंग आला असता मन निष्कपट राखणें. क्षांति ह्मणजे दुसऱ्यानें अपराध केला असताही आपले ठिकाणीं विकार उत्पन्न होऊं न देणें, असें भाष्यकार ह्मणतात. आर्जव ह्मणजे सरळपणा. ज्ञान ह्या शब्दाची व्याख्या तेराव्या अध्यायामध्यें

**अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्।** वगैरे पांच श्लोकांत मिळून केलेली आहे आणि आचार्यांनीं ज्ञान शब्दाचें व्याख्यान संक्षेपतः **ज्ञानं शास्त्रत आचार्यतश्चात्मादीनामवबोधः** ( वेदांतशास्त्र आणि गुरु ह्यांच्या योगानें प्राप्त झालेलें आत्म्यादिकाचें ज्ञान ) असें केलें असून विज्ञानशब्दाचें व्याख्यान वेदांतशास्त्र आणि गुरु ह्यांच्या योगानें झालेल्या ज्ञानाचा विशेष अनुभव ( **विज्ञानं विशेषतस्तदनुभवः** ) असें केलें आहे. आस्तिक्य ह्मणजे शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास. तेव्हां "जन्माच्या पायावर चातुर्वर्ण्याची इमारत उभारलेली नाहीं, **उपजत प्रवृत्तीवर व धंद्यावर** ती उभारली गेली आहे" असें जे प्रतिपादन करीत असतात त्यांच्या मतानें **शमो दमस्तपः शौचं** ह्या गीतेंतील वचनाचा अर्थ सरळ रीतीनें असा होतो:—इंद्रियदमन, मनःसंयमन, देवपूजा, द्विजाचा आदर, वडिलांचा मान, विद्वानाचा समान, ब्रह्मचर्य, अहिंसा, दुसऱ्याचें मन न दुखविणारें असें सत्य, प्रिय व हितकारक भाषण, वेदाध्ययनाचा अभ्यास, मनाची शुद्धता, दुसऱ्याशीं होणाऱ्या व्यवहारांत निष्कपटपणा, शेंबूड आला असता तो काढून टाकून नाक व हात धुवून टाकणें, मूत्रोत्सर्ग व पुरीषोत्सर्ग करिताक्षणीं शरीराचे ते ते भाग शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें माती वगैरे लावून धुवून काढणें, व्यवहारांत सरळपणा राखणें, वेदांतशास्त्र व आचार्य ह्यांपासून आत्मादिविषयकज्ञान प्राप्त करून घेणें व त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव असणें आणि शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टींवर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणें वागणें; ह्या गुणांकडे ज्या मुलाची उपजत प्रवृत्ति असेल त्याला ब्राह्मण ह्मणावें, असा **शमोदमस्तपः शौचं** ह्या वचनाचा अर्थ सुधारकाच्या मतानें होतो खरा, परंतु, हा अर्थ सृष्टिनियमांच्या विरुद्ध आहे असें ह्मणणें

भाग पडतें. जन्मास येताक्षणीं इंद्रियदमन तें कसें करावयाचें ? जन्मास येण्यापूर्वी गर्भावस्थेंत मनुष्य विषयलंपट असतो असें जेव्हा सिद्ध होईल तेव्हा जन्मास आल्यावर अवश्य जें इंद्रियदमन त्याची सार्थकता होईल. मनःसंयमनाचीही गोष्ट त्याचप्रमाणें. देवपूजेकडे उपजताक्षणीं प्रवृत्ति असलेली व्यक्ति कोठें असल्याचें माझ्या ऐकण्यात नाहीं. द्विजाचा आदर करण्याकडे उपजत प्रवृत्ति असलेला मनुष्य जगतामध्ये आढळण्याचा संभव नाहीं. वडिलाच्या मानासंबंधानेंही असाच प्रकार आहे. लहानपणीं मातेवर संतापानें लाथा न झाडलेला मनुष्य जगतात सापडणें कठीण आहे विद्वानाची मानमान्यता उपजताक्षणीं राखण्याचा यत्न करणारा प्राणी मनुष्यकोटींत सांपडणें अशक्य आहे. ब्रह्मचर्य हें शारीरिक तप होय. स्त्रियांच्या उपभोगाकडे मनाची प्रवृत्ति जन्मतःच होणें मनुष्यकोटींत अशक्य असल्यामुळे जन्मतः ब्रह्मचर्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे तो ब्राह्मण असें ह्मणण्यातही कांहीं अर्थ नाहीं. अहिंसेचीही वाट त्याचप्रमाणें **एकहायना मनुष्या वाचं वदन्ति** ( मनुष्य एक वर्षाचीं झाल्यावर बोलू लागतात ) अशी श्रुति व अनुभव असल्यामुळे आणि दुसऱ्याच्या मनाला लागणारें कोणतें, दुसऱ्याला प्रिय होणारें कोणतें, दुसऱ्याला हितकारक होणारें भाषण कोणतें आणि सत्य भाषण कोणतें, हें समजण्याला प्रौढ वय वगैरे बऱ्याच गोष्टींची अवश्यकता असल्यामुळें उपजताक्षणीं सत्य, प्रिय, हितकारक व दुसऱ्याच्या मनाला न लागणारें असें भाषण करण्याकडे ज्याची प्रवृत्ति असेल तो ब्राह्मण, ह्याही ह्मणण्यात कांहीं अर्थ नाहीं वेदाध्ययनाचा अभ्यास उपजताक्षणीं करणारा जीवकोटींत सापडणें नाहीं. वेदाध्ययनाचा अधिकार वैदिकमंत्रांनीं उपनयनसंस्कार झाल्यावांचून येत नाहीं व द्विजजातीय विवाहित आणि सवर्ण मातापितरापासून ज्याची उत्पत्ति झालेली नसेल त्याचे कोणतेच संस्कार वैदिक मंत्रानीं होत नाहींत हें

## जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।

ह्या वचनाच्या स्पष्टीकरणात पूर्वी सिद्ध झालेंच आहे. मन हें शुद्ध कसें समजावें आणि अशुद्ध कसें समजावें हें उपजत कळण्याचा संभवच नाहीं. परकीय मनुष्याशीं होणाऱ्या व्यवहारात जो जन्मास येताक्षणीं कपट ठेवीत नाहीं तो ब्राह्मण ह्या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शेंबूड आला असता तो काढून टाकून नाक व हात धुणें, मूत्रोत्सर्ग व पुरीषोत्सर्ग करिताक्षणीं अनेक वेळा माती लावून लावून शरीराचे ते ते भाग स्वच्छ धुवून काढणे, ह्या गोष्टींकडे उपजत प्रवृत्ति असणारा प्राणी ह्या नश्वर जगतात सापडण्याचा संभव नाहीं. वेदांतशास्त्र व आचार्य ह्यापासून आत्मादिविषयक ज्ञान प्राप्त करून घेणें व त्याचा अनुभव घेणें इकडे उपजत प्रवृत्ति असणारा प्राणी मानवकोटींत सापडणें शक्य नाहीं आणि शास्त्रच जर मुळीं उपजताक्षणीं समजण्याचा संभव नाहीं तर शास्त्रात सांगितलेल्या गोष्टींवर श्रद्धा ठेवण्याची उपजत प्रवृत्ति असेल तो

ब्राह्मण, ह्या ह्मणण्यातही कांहीं अर्थ नाही. साराश, व्याख्यात्याच्या अथवा सुधारकाच्या मताप्रमाणें ह्या श्लोकाचा अर्थ करिताच येत नाहीं ब्राह्मणानें शम, दम वगैरे गुण संपादन करावे हें त्याचें कर्तव्य आहे असा अर्थ ह्या श्लोकाचा केल्यावाचून गत्यंतरच नाहीं. असो.

वर्णव्यवस्था उत्पत्तिसिद्धच आहे, ह्याचा अधिक खुलासा ज्याना हवा असेल त्यानीं 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्' ह्या गीतावचनावर ब्राह्मणसभेमध्ये मी सांगितलेलें चार शब्द पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले आहेत ते अवलोकन करावे.

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।**

इत्यादि वचनाचा अर्थ:—शौर्य, प्रगल्भता, धैर्य, दक्षता, युद्धामध्ये पाठ न दाखविणें वगैरे गुण संपादन करणें हें क्षत्रियाचें कर्तव्य आहे, असाच केला पाहिजे. वैश्य व शूद्र यांचीही गोष्ट याचप्रमाणें मानिल्यावाचून गत्यंतर नाहीं.

"जर जन्मावर चातुर्वर्ण्याची इमारत उभारिली गेली असती तर व्रात्यासारख्या विधर्म्यांचा प्रवेश सनातनधर्मात होऊं न शकता." असें एक कारण व्याख्यात्यांनीं जन्मावर चातुर्वर्ण्याची इमारत अवलंबून नाहीं, ह्या आपल्या काल्पनिक मताला दिलें आहे, परंतु, हें कारण देताना विधर्म्यांचा प्रवेश सनातनधर्मात होतो असें जें ह्यांनी विधान केलेलें आहे तें बरोबर नाहीं.

**द्विजातयः सवर्णासु जनयन्त्यव्रतांस्तु यान् । तान्सावित्रीपरिभ्रष्टान्व्रात्यानिति विनिर्दिशेत् ॥ २० ॥**

अशी व्रात्य शब्दाची व्याख्या मनुस्मृतींतील दहाव्या अध्यायात केलेली आहे आणि "सवर्ण विवाहित स्त्रियांचे ठिकाणीं द्विजपतीपासून उत्पन्न झालेले पुत्र उपनयनरहित राहिल्यास त्यांना व्रात्य असें ह्मणावे" असा ह्या वचनाचा अर्थ आहे. तेव्हां उपनयनसंस्काराच्या कालातिक्रमाशिवाय दुसरें कोणतेंही जातिभ्रंशकारक कर्म हातून न घडलेल्या पुरुषाचा प्रायश्चित्तपूर्वक उपनयनसंस्कार झाल्यानंतर त्याला द्विजत्वप्राप्ति होते, असें जें धर्मशास्त्रात सांगितलें आहे तें लक्ष्यात ठेवण्यासारिखें आहे. विधर्म्यांचा प्रवेश सनातनधर्मात होतो असें मानण्याला व्याख्यात्यांनीं कांहीं एक प्रमाण दिलेलें नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या जशा द्विजांमध्ये तीन जाति भिन्न भिन्न आहेत त्याचप्रमाणें उपनयनसंस्कार न झाल्यामुळें व्रात्य बनणाऱ्या जातिही तीन आहेत. विप्रव्रात्य, राजन्यव्रात्य, आणि वैश्यव्रात्य. जो विप्रव्रात्य असेल त्याचें गेलेलें विप्रत्व प्रायश्चित्तपूर्वक उपनयनसंस्कारानें कायम रहातें. जो क्षत्रियव्रात्य असेल त्याचें गेलेलें क्षत्रियत्व प्रायश्चित्तपूर्वक उपनयनसंस्कारानें कायम रहातें. आणि वैश्यव्रात्याला प्रायश्चित्तपूर्वक उपनयनसंस्कारानें वैश्यत्व प्राप्त होतें. विप्रादि व्रात्याचें प्रायश्चित्तपूर्वक उपनयन न होता विवाहित सवर्ण स्त्रियांचे ठिकाणीं जरी त्याच्यापासून संतति झाली तरी ती संतति विप्रव्रात्य रहात नाहीं. भूर्जकटक.

वगैरे नावाची ती वेगळीच जात बनते. क्षत्रियव्रात्य आणि वैश्यव्रात्य ह्यापासून विवाहित सवर्ण स्त्रियांचे ठिकाणीं झालेली संततिही क्षत्रियव्रात्य अथवा वैश्यव्रात्य कायम रहात नसून अनुक्रमें झल्ल, मल्ल इत्यादि नावानीं आणि सुधन्वाचार्य, कारुष इत्यादि नावानीं प्रसिद्ध असलेली एक वेगळीच जाति बनत. सारांश, विप्रादिव्रात्यापासून झालेल्या संततीचे ठिकाणींही विप्रादिव्रात्यत्त्व कायम न रहाता त्यांपेक्षांही नीच जातित्व येत असल्याचें जर सिद्ध आहे आणि विप्रादिव्रात्यांना प्रायश्चित्तपूर्वक उपनयसंस्कारानें पुनरपि सवर्णत्वच कायम रहातें हें जर निर्विवाद आहे तर विधर्म्यांचा प्रवेश सनातन धर्मांत होणार कोठून ? असो.

जातींचा व पोटजातींचा उल्लेख वेदांमध्यें असल्याबद्दल पूर्वी सिद्ध झालेंच आहे. देशस्थ, कोंकणस्थ इत्यादि ब्राह्मणामध्येंच भिन्न भिन्न प्रकार जे आहेत तेही शास्त्राला अनुसरूनच आहेत. मातुलकन्यापरिणयाचा आचार ज्यांच्यांत आहे तो प्रकार भिन्न आणि ज्यांच्यांत नाहीं तो प्रकार भिन्न, असें होणें शास्त्रदृष्ट्या योग्यच आहे इतकेंच नव्हे, परंतु, व्याख्यात्यांच्या विचारपद्धतीनेंही ही गोष्ट सिद्ध होत आहे. "कोणी आक्षेप घेईल कीं --कात्यायन ग्रंथकारानं लग्नच मुंजीचे ठिकाणीं मानिलें आहे-- ..याम शास्त्राच्या वाटेनें उजू जबाब इतकाच कीं, ज्या शाखेचा तो ग्रंथकार असेल त्या शाखेस त्या ग्रंथकाराचें ह्मणणें मान्य होईल, परशाखेस तें ह्मणणें मान्य होण्याचा संभव नाहीं व मान्य होण्याची जरूरही नाहीं "असें व्याख्यात्यांनीं 'नायकाची मुंज' ह्या सदराखालीं लिहिलें आहे आणि ह्याच त्यांच्या विचारपद्धतीवरून प्रत्येक जातींत आणखी हव तितके पोटभेद झाले तरी शास्त्राच्या मार्गानें ते योग्य ठरणार आहेत. अर्थात्, मातुलकन्यापरिणय करण दोषावह आहे, अशा अर्थाचें स्मृतिवचन ज्यांना उद्देशून असेल त्यांनींच तें पाळिलें पाहिजे; इतरांना तें पाळण्याची जरूरी नाहीं असें ह्या व्याख्यात्याच्याच मतानें ठरणार आणि त्याचप्रमाणें मातुलकन्यापरिणयाचा आचार ज्यांच्यामध्यें अमल त्यांच्याशीं इतरांना शरीरसंबंध करितां यणारच नाहीं, हेंही व्याख्यात्याच्याच विचारपद्धतीनें सिद्ध होणार. सारांश, देशस्थ, चित्तपावन, कऱ्हाडे, देवरुखे, गुजराथी, तलंगी, बारघरे, गोंवकर, कुडाळे, जुन्नर वगैरे ब्राह्मणादिकांत आणि नापिकादिकांत भिन्न भिन्न जाति दृष्टीं पडत असल्याबद्दल व्याख्यात्यानीं जी दुसऱ्यावर अपशब्दाची वृष्टि केलेली आहे तीही त्यांच्याच विचारपद्धतीनें अयोग्य ठरते. ज्यांच्यांत रोटीव्यवहार होतो त्यांच्यांत बेटीव्यवहार होत नाहीं ह्मणून व्याख्यात्यास मोठा अचंबा वाटत आहे आणि एकंदर सुधारकांनाही ह्या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत असून तिवर्षीं कोठें तरी मारून मुटकून जमा केलेल्या मंडळींत रोटीव्यवहार ज्यांत होतो त्यांत बेटीव्यवहार होण्याचें कागदी ठरावही ते करीत असतात. एका गोत्रातील पुरुषांना एका स्त्रीला वसण्यास शास्त्राची हरकत नाहीं; परंतु, एका गोत्रातील लोकांचा रोटीव्यवहार

होता ह्मणून एकाच गोत्रांतील लोकांचा जर बेटीव्यवहार होऊं लागेल तर त्या व्यवहारानें बद्ध होणारे स्त्रीपुरुष व त्यांची संतति शास्त्र दृष्ट्या चांडाळ होईल देशस्थ, कोंकणस्थ वगैरेंमध्यें रोटीव्यवहार होत असून बेटीव्यवहार न होण्याचीं कारणेंही अशाच प्रकारचीं आहेत. असो.

रोटीव्यवहार ज्या जातींत होतो त्या जातींत बेटीव्यवहार होणें इष्ट आहे किंवा नाहीं, ह्या प्रश्नाची शास्त्रदृष्ट्या वाटाघाट करणें घटकाभर बाजूला ठेवून व्यावहारिक दृष्टीनें जरी ह्या प्रश्नाचा विचार केला तरी सुद्धां रोटीव्यवहार करणाऱ्यांमध्यें बेटीव्यवहार होणें योग्य ठरलेंच असें ह्मणतां येणार नाहीं. शेळ्या, मेंढ्या, उंट, गाई, ह्मशी, घोडीं, हरणें, गाढव, खेचरें वगैरे भिन्न भिन्न जातींचे पशु शेजारीं शेजारीं असतांना वैरण खातात. असें दृष्टीं पडतें इतकेंच नव्हे; तर एकमेकांपुढील उष्टी वैरणही ह्यापैकीं कित्येकांना चालते. परंतु, ह्यांच्यामध्यें रोटीव्यवहार ज्याअर्थीं होत आहे त्याअर्थीं बेटीव्यवहार होण्यास काहीं एक हरकत नाहीं अशा प्रकारचें तर्कशास्त्र लढवून जर आमच पश्चिमेकडे उगवलेल्या ज्ञानरवीच्या योगानें डोळस झालेले सुधारक ह्यांच्यांत परस्पर बेटीव्यवहार होण्याना ठराव करूं लागतील तर तें त्यांचें करणें इतरांना तर नव्हेच, परंतु, त्यांच्या घरीं तुकडा खाऊन पडल्या रहाणाऱ्या श्वानालाही कबूल होणार नाहीं. असो जी गोष्ट करण्यास सूकर, श्वान, गर्दभ वगैरे पशु आणि त्याचप्रमाणें कावळे, पारवे, गिधाडें वगैरे पक्षीही प्रवृत्त होत नाहींत ती गोष्टही अवश्य घडवून आणण्याचा प्रयत्न जे मनुष्यकोटींतील प्राणि करीत असतात त्यांच्या अक्कलहुशारीची तारीफ जितकी करावी तितकी थोडीच होणार असल्यामुळें ती करण्याच्या भानगडींत पडण्याचें कारण मला दिसत नाहीं.

" आर्यसमाजात जीव नाहीं, प्रार्थनासमाजातही जीव नाहीं, असें ह्मटल्याशिवाय रहावत नाहीं. " ह्मणून जें व्याख्यात्यांनीं ह्मटलें आहे त्याला अमान्यता दर्शविण्याचें कारण मला दिसत नाहीं.

" विशेष ध्यानांत ठेवण्यासारिखी गोष्ट इतकीच कीं, भक्ष्याभक्ष्याच्या प्रकरणांत बकऱ्यामेंढ्याची सागुती ब्राह्मणास भक्ष्य मानिलेली असून कांदा--लसूण अभक्ष्यांतली आहेत. मांस तितकें अभक्ष्य, वानस्पत्य तितकें भक्ष्य हा ब्राह्मणाचा सिद्धान्त नव्हे " अशीं विधानें व्याख्यात्यांनीं केलेलीं आहेत. ह्यांत बकऱ्या--मेंढ्याची सागुती ब्राह्मणांना भक्ष्य मानिलेली आहे असें जें विधान व्याख्यात्यांनीं केलेलें आहे त्याचा संबंध मागल्या ' अष्टका ' ह्या सदरांतील मजकुराशीं आहे. आश्वलायनगृह्यसूत्रांत मार्गशीर्ष, पौष, माघ आणि फाल्गुन ह्या चार महिन्यांतील वद्यपक्षाच्या अष्टमी तिथीस अष्टकाश्राद्ध करण्यास सांगितलें आहे. अष्टमीचे पूर्वीं वद्यसप्तमीस पूर्वेद्यु श्राद्ध करावयास सांगितलें आहे आणि अष्टमीचे नंतर वद्य नवमीस अन्वष्टकाश्राद्ध सांगितलेलें आहे. ह्या तीन श्राद्धांपैकीं अष्टका हें श्राद्ध पशूनें अथवा

स्थालीपाकानें करावें, असें सांगितलेलें आहे. पशूनें ह्मणजे पशूच्या मासानें आणि स्थालीपाकानें ह्मणजे यथाविधि चरु सिद्ध करून आश्वलायनसूत्रात पशु व स्थालीपाक असा विकल्प सांगितला आहे. तथापि पशूच्या योगानें अष्टका श्राद्ध करण्यास सांगितलें ही गोष्ट नाकारिता येणार नाहीं. आहे ह्या अष्टकाश्राद्धानंतर वद्य नवमीस होणाऱ्या अन्वष्टक्यश्राद्धात पशूचें मांस ब्राह्मणभोजनार्थ तयार करावें असें आश्वलायनसूत्राचें तात्पर्य वृत्तिकारांनीं काढिलेलें आहे, हेंही नाहीं ह्मणता येणार नाहीं. परंतु, येवढ्यावरून ब्राह्मणाना मास भक्ष्य मानिलें आहे, असा सार्वत्रिक सिद्धांत समजता येणार नाहीं.

**मधुपर्के च यज्ञे च पितृदैवतकर्मणि। अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्यब्रवीन्मनुः ॥ १ ॥**

असें वचन मनुस्मृतींतील पांचव्या अध्यायांत आहे आणि ह्या वचनाचा अर्थ—मधुपर्क, यज्ञ व श्राद्धादिक इतक्याच ठिकाणीं पशूची हिंसा करावी; ह्यावाचून करूं नये—असा आहे. शिवाय, ह्या ठिकाणीं देखील जी पशुहिंसा सांगितलेली आहे ती कलियुगात वर्ज्य आहे. कारण,

**वरातिथिपितृभ्यश्च पशूपाकरणक्रिया।**

असें वचन कलिवर्ज्यप्रकरणांत आहे. हें वचन पराशरमाधवीय ग्रंथातून घेतलेलें आहे तऱ्हा श्राद्धादि कर्मांतच आश्वलायनप्रभृति मुनींच्या सूत्रात सांगितलेली जी पशूची हिंसा ती कलियुगात नाहीं हें सिद्ध आहे शिवाय, कलिव्यतिरिक्त इतर तीन युगात जी श्राद्धामध्यें हिंसा सांगितलेली आहे ती सर्वांनीच अवश्य केली पाहिजे, असें मानिता येणार नाहीं. कारण, असें जर मानिलें तर

**यस्तु प्राणिवधं कृत्वा मांसैस्तर्पयते पितॄन्। स विद्वांश्चन्दनं दग्ध्वा कुर्यादङ्गारविक्रयम् ॥ क्षिप्त्वा कूपे यथा किंचिद्बाल आदातुमिच्छति। पतत्यज्ञानतः सोपि मांसेन श्राद्धकृत्तथा ॥**

ह्या बृहत्पाराशर स्मृतींतील वचनाची वाट काय? ह्या वचनांचा अर्थ असा होतो:—प्राणिवध करून मांसाच्या योगानें जो पितराना तृप्त करूं पहातो तो कोळसे विकून पैसे उत्पन्न करण्याकरिताच चंदन जाळणारा महाविद्वानच समजला पाहिजे. ज्याप्रमाणें एखादा बालक विहिरीमध्यें एखादी वस्तु टाकून ती घेण्याची इच्छा करितो आणि त्या प्रयत्नात आपणही अज्ञानामुळें विहिरींत पडतो त्याचप्रमाणें मासाच्या योगानें श्राद्ध करणाऱ्याची स्थिति होते.

**न दद्यादामिषं श्राद्धे न चाद्याद्धर्मतत्त्ववित्। मुन्यन्नैः स्यात्परा प्रीतिर्यथा न पशुहिंसया ॥**

असें भागवतातील वचन निर्णयसिंधुप्रभृति ग्रंथात घेतलेलें आहे व त्या वचनाचा अर्थ "धर्मतत्त्ववेत्त्या पुरुषानें श्राद्धामध्यें मास देऊं नये व स्वतःही भक्षण करूं नये. कारण, मुनींच्या अन्नानीं जशी पितराची पराकाष्ठेची तृप्ति होते तशी पशुहिंसेच्या योगानें होते

नाहीं. " असा आहे. तेव्हां आश्वलायनप्रभृति मुनींनीं अन्वष्टकाप्रभृति श्राद्धात सांगितलेली हिंसा जर सर्वसामान्य अवश्य मानिली तर ह्या वचनाचीही वाट काय लावावयाची ? श्राद्धप्रकरणामध्यें ( कलियुगव्यतिरिक्त इतर तीन युगात ) जी पशुहिंसा सांगितलेली आहे ती ब्राह्मणयजमानानें अवश्य केलीच पाहिजे, असेंही आश्वलायन सूत्रावरून मानितां येणार नाहीं. कारण,

**मुन्यन्नं ब्राह्मणस्योक्तं मांसं क्षत्रियवैश्ययोः । मधुप्रदानं शूद्रस्य सर्वेषां वाऽविरोधि यत् ॥**

असें वचन पुलस्त्यस्मृतीमध्ये असून तें चतुर्वर्गचिंतामणींत घेतलेलें आहे. " यजमान ब्राह्मण असल्यास मुनीचें अन्न श्राद्धाला उक्त असून यजमान क्षत्रिय अथवा वैश्य असल्यास मांस उक्त आहे आणि यजमान शूद्र असल्यास मधुप्रदान उक्त आहे आणि ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य अथवा शूद्र ह्यांपैकीं वर्णधर्मदृष्ट्या ज्याचा कोणालाच प्रत्यवाय नाहीं ते कोणत्याही वर्णाचा यजमान असला तरी श्राद्धाला युक्त आहे. " असा ह्या पुलस्त्यस्मृतींतील वचनाचा अर्थ होतो. तेव्हा ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य अशा त्रैवर्णिकासंबधाने आश्वलायनसूत्रांत श्राद्धप्रकरणीं उक्त असलेलीही पशूची हिंसा ब्राह्मण यजमान असल्यास त्यानें अवश्य केलीच पाहिजे, असें ह्मणता येणार नाहीं. असो. आश्वलायनसूत्रातील अष्टकाश्राद्धप्रकरणींही **यजमानानें** मांस भक्षण करावें, असें कोठें सांगितलें नाहीं ही गोष्ट विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी आहे.

**यक्षरक्षःपिशाचान्नं मद्यं मांसं सुरासवम् । तद्ब्राह्मणेन नात्तव्यं देवानामश्नता हविः ॥**

